शनिवार । २० ऑगस्ट १९७७

७५ पैसे

# माणूस

‘ व्हिटॅमिन सी ’चा प्रयोग फसला.
हेमायसिनचा प्रयोग फसला.
कोट्यवधी रुपयांची यंत्रसामग्री
पडून आहे.

ओव्हरटाइमचा भस्मासूर....
वशिलेबाजी, दिरंगाई....
निकृष्ट व्यवस्थापन....

पुण्याजवळच्या एका
सरकारी कारखान्याची
शोकांतिका....

( पृष्ठ : १३ )

# ' टॉलस्टॉय ' पुस्तक योजना

## पाच पुस्तके । प्रत्येकी सात रुपये । नोंदणी शुल्क पंधरा रुपये

### या योजनेत उपलब्ध होणारी पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | मूल्य ( अंदाजे ) |
|---|---|---|
| १ : टॉलस्टॉय-एक माणूस | सुमती देवस्थळे | पन्नास रुपये |
| २ : महाडचा मुक्तिसंग्राम | प्रा. रा. म. बिवलकर<br>प्रा. झुंबरलाल कांबळे | वीस रुपये |
| ३ : पश्चिमेचे पुत्र | रवींद्र पिंगे | पंधरा रुपये |
| ४ : दि टच् | अशोक प्रभाकर डांगे | पंधरा रुपये |
| ५ : आर डॉक्युमेंट | अशोक जैन | दहा रुपये |

**वरील सुमारे १०० रुपये दर्शनी किंमतीची ५ पुस्तके फक्त ५० रुपयात**

### योजनेसंबंधी थोडे अधिक

* योजनेतील ' महाडचा मुक्तिसंग्राम ' व ' आर डॉक्युमेंट ' ही दोन पुस्तके सभासदानी संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावीत.
* ' पश्चिमेचे पुत्र ' व ' दि टच् ' ही दोन पुस्तके सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मिळू शकतील.
* ' टॉलस्टॉय-एक माणूस ' हे पुस्तक डिसेम्बर ७७च्या शेवटच्या आठवड्यात मिळू शकेल.
* नोदणी शुल्क पंधरा रुपये त्वरित पाठवावे. पाचही पुस्तकाची सवलतीची किंमत + नोदणी-शुल्क असे मिळून होणारे रुपये पन्नास एकदम पाठवले तरी चालू शकेल
* ज्यांना पुस्तके रजि पोस्टाने घरपोच हवी असतील त्यांना ती जानेवारी ७८ पूर्वी एक, दोन किंवा तीन हप्त्यात सोयीप्रमाणे पाठविली जातील टपाल पाठवणी खर्च + सवलतीची न भरलेली किंमत इतक्या रकमेची व्ही. पी. सभासदाला केली जाईल. ती त्याने सोडवून घ्यायची आहे
* व्यक्तिगत ग्रंथसंग्रह हा योजनेचा मूळ हेतु असल्याने ग्रंथ-विक्रेत्यांना या योजनेत सहभागी होता येणार नाही.
* रक्कम शक्यतो म. ऑ. ने पाठवावी. चेक असल्यास वटणावळ रुपये दोन अधिक.
* चेक, ड्राफ्ट, म. ऑ. ' राजहंस प्रकाशन ' या नावे पाठवावीं सोबत नाव, पत्ता सपूर्ण असावा.

# किंवा

**१०० रुपये ठेव राजहंस प्रकाशनाकडे पाच वर्षे ठेवणारास व्याजाच्या मोबदल्यात वरील पाचही पुस्तके विनामूल्य मिळतील.**

( टपाल + पाठवणी-खर्च ठेवीदाराकडे )

' राजहंस प्रकाशन ', १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.

## साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे–अंक बारावा**

२० ऑगस्ट १९७७

**मूल्य पंचाहत्तर पैसे**



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरदरे

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी . ४३८५९

¤


# भावनगर शिबिर

**दादुमिया**

भावनगरला ‘गुजराथचे पुणे’ म्हणतात. या भावनगरमध्ये दिनांक १८–१९ जून ७७ या दोन दिवशी एक मोठे शिबिर भरले होते. संयोजक होते ‘लोकशक्तीसंघटन’वाले विचारवत. चार बैठका झाल्या व त्यात पुढील विषयांवर चर्चा झाल्या .

१. लोकशाही : सिद्धात व मूल्ये.

२. भारतीय लोकशाही : स्वरूप व मूल्ये

३. आणीबाणीने शिकविलेले धडे व

४. लोकसमितीची रचना

प्रमुख होते मूळशकर मो. भट्ट. भाग घेतला राज्यशास्त्राचे प्राध्यापक व नावाजलेले राजकीय विचारवत कीर्तिदेव देसाई, आणीबाणीत शूर व निर्भीड म्हणून गाजलेले वकील चंद्रकांत दरू, ‘भूमिपुत्र’ या सर्वोदयी (‘साधना’ वा ‘माणूस’सारख्या) साप्ताहिकाचे संपादक चुनीभाई वैद्य व गुजराथ विद्यापीठाचे पोलिटिकल सायन्सचे प्राध्यापक दिनेश शुक्ल. सुमारे ७५ विचारवंतांनी उपस्थित राहून चर्चेत भाग घेतला या लोकात शिक्षक, पत्रकार, प्राध्यापक, नोकरीवाले वगैरे लोक होते अत्यंत रमणीय अशा दक्षिणामूर्ति संस्थेत शिबिराचे संचालन करण्यात आले होते. आणीबाणीच्या काळरात्रीनतर सारे कार्यकर्ते स्वातंत्र्याच्या पहाटे उत्साहाने पुढील कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी जणू जमले आहेत असे वाटत होते. (महाराष्ट्रातील काही प्रतिनिधी तेथे हजर राहिले असते तर काय बहार झाली असती असे सारखे मनात येत होते )

पहिल्या बैठकीत ‘लोकशाही–सिद्धात व मूल्ये’ या विषयावर चर्चा झाली.

लोकशाही म्हणजे राज्यकारभाराची एक पद्धत. ती जास्त उचित, जास्त वास्तविक आहे. ‘राज्यविहीन समाज’ ही सुदर व आदर्श कल्पना जरी असली तरी त्यासाठी अजून आपला समाज ‘तयार’ झाला नाही, सज्ज नाही. या आदर्शाच्या पर्यायात व्यक्तिस्वातंत्र्य व राज्यसत्तेचा कमीत कमी अकुश असणारी प्रथा म्हणजे लोकशाही ! त्यावर नियमन राहू शकते. म्हणून १९४७ साली आपण या पद्धतीचा स्वीकार केला मात्र या पद्धतीत काही मूलभूत सत्ये आपोआप येतात

कोणत्याही विचारात चूक होऊ शकते. हा विचार कोणा व्यक्तीचा वा गटाचा असू शकेल; अल्पसंख्याकांचा किंवा बहुसंख्यांकाचा असू शकेल, पण जर चूक राहून गेली असेल तर ती बरोबर सुधारणे हा लोकांचा हक्क आहे. लोकशाहीत ह्या मूलभूत सत्यास फार मोठे महत्त्व आहे. सत्य हेच अंतिम मानले गेले पाहिजे, असत्यास थारा मिळू शकणार नाही. प्रत्येकास आपले मत मांडण्याचा

अधिकार आहे. त्या विचाराशी सर्वांनी सहमत असलेच पाहिजे असे नाही; पण सहिष्णुता दाखवून त्या विचाराची योग्य ती दखल घेतली गेली पाहिजे.

बहुसंख्याकांचे राज्य म्हणजे केवळ लोकशाही नाही. बहुमत हे साधन आहे एक व्यवहारी पद्धत म्हणून तिचा स्वीकार केला गेला. बहुमती राज्य बिनलोकशाही असू शकेल! लोकशाही हे साध्य, बहुमत हे केवळ साधन. लोकशाहीच्या साध्याची सिद्धी जर यशस्वी करावयाची असेल तर त्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याची फार मोठी आवश्यकता आहे.

हे मूलगामी विचार स्पष्ट केल्यावर प्रा. के डी. देसाई यांनी भारतीय लोकशाहीच्या संदर्भात अज्ञानता, निरक्षरता, गरिबी व जलद विकासाची गती लोकशाहीच्या यशस्वितेवर कोणकोणती दडपणे आणू शकतात याचा विचार केला.

'भारतीय लोकशाही स्वरूप व मूल्ये' या विषयावर याच बैठकीत चर्चा झाली. प्रा. दिनेश शुक्ल याचे भाषण रंगले.

आणीबाणीमुळे स्वातंत्र्याचे खरे मूल्य आपणास चांगले कळले. स्वातंत्र्याची गरज खरोखर किती खोल, तीव्र आहे ते आपल्याला समजले. लोकशाही संकटात आहे हे सत्य १९६७ ते १९७१ या काळातच आपल्यापैकी अनेकांना उमगले होते (१९६८ सालीच श्री. भोगीलाल गांधी यांचे 'इंदिरा गांधी–कोणत्या मार्गावर?' हे गुजराती पुस्तक प्रसिद्ध झाले.) १९७३ साली आपल्या मनातील इंदिरेविषयीचा गोंधळ संपला, शंका खऱ्या ठरू लागल्या. १९७५ साली आणीबाणी येताच आपल्या मनातील शंका दूर झाल्या हुकुमशाही आपल्यावर लादली जात आहे, हे सत्य स्पष्ट झाले.

दिनेशभाईंनी निरक्षर प्रजेचे प्रमाण वाढत आहे अशा समाजात लोकशाही टिकून राहील काय, गरीब समाजात लोकशाही स्थिर होईल काय, जलद विकास लोकशाहीस पोषक आहे का मारक वगैरे मुद्दे मध्यबिंदू समजून त्या संदर्भात चर्चा केली. जातपात, प्रादेशिकता, विभिन्न धर्मव्यवस्था, भाषाची रेलचेल–या कारणामुळे आपला समाज आधीच खंडित झाला आहे. अशा समाजाचे दारिद्र्य केवळ आर्थिक कारणात नाही, हे त्यांनी स्पष्ट केले. कायद्याने स्वातंत्र्य भले दिले; पण ते स्वातंत्र्य भोगण्याची क्षमता आपल्या समाजात आली आहे का? स्वतंत्रता, समानता, बंधुत्व, उदारमतवाद वगैरे मूल्ये आपण स्वीकारली खरी; पण भारतीय लोकशाहीच्या संदर्भात वास्तवता काय हे आपण विसरले न पाहिजे, असे प्रा. दिनेश शुक्ल यांनी बजावले.

निरक्षरता आपण खूप प्रयत्न केला तरी वाढणाऱ्या लोकवस्तीमुळे वाढतच आहे, कमी होत नाही. निरक्षर समाजामुळे लोकशाहीच्या संचालनेत खूप अडथळे निर्माण होतात; पण त्यामुळे लोकशाही येथे रुजणारच नाही असा निराशावादी सूर काढण्यात काहीच अर्थ नाही. निवडणुकांचे निकाल पहा निरक्षर मतदारगटाची वर्तणूक मोठ्या प्रमाणावर राजकीय जागृतीची साक्ष देईल. या निरक्षर लोकात नागरी चळवळीद्वारा तसेच 'मास मीडिया'चा उपयोग करून त्यांच्यात राजकीय शिक्षण व जागृती याचे प्रमाण आपण सुशिक्षित सहज वाढवू शकू–नव्हे, ते आपले कर्तव्यच आहे. अशिक्षित समाजात लोकशाही स्थिर होणार नाही अशी व्यर्थ चिंता करण्याचे काहीच कारण नाही

गरिबी व लोकशाही याचा अन्योन्यसंबंध काय? गरिबी दूर करण्याचे केवळ वचन–कृती नाही–चमत्कार घडवून आणू शकते. त्यासाठी सोपे 'शॉर्ट कट्स्' विचारात घेतले जातात व लोकशाही धोक्यात येते. म्हणून लोकांना पुनःपुन्हा समजावून सांगितले पाहिजे की, गरिबी दूर होऊ शकेल; पण लोकशाही मार्गानेच असमानता दूर करण्याची गुरुकिल्ली म्हणजे स्वतंत्रता. स्वतंत्रता व समानता परस्परपूरक मूल्ये होत. शोषणातून निर्माण होणारी असमानता दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

यावर बरीच चर्चा झाली. लोकशाहीत अतिकेंद्री राज्यव्यवस्था वदतो व्याघातासारखी परस्परविरोधी आहे का पूरक आहे? लोकशाहीसाठी पक्षपद्धती साधक किती? संसदीय लोकशाही लोकशाहीची मूलभूत तत्त्वे किती पाळू शकते? या प्रश्नावरही बराच खल झाला.

लोकांची प्रतिकारशक्ती जर प्रशिक्षणाने विकसित करू शकलो तर काय होईल? प्रजेचा बिनलोकशाही व्यवहार वाढेल का?

भारतीय समाजाच्या समानतेची जीवनमूल्ये व चरितार्थ चालविण्यासाठी सामान्य माणसाची गेल्या ३० वर्षांतील मेहनत याच्यात सांगड आहे काय? त्या संदर्भात व्यक्तिस्वातंत्र्यावर नियमन घालण्याची आवश्यकता आहे काय?

मोरारजीभाई 'अभय व्हा,' अशी घोषणा करतात.

पण सत्तेची सूत्रे तर धनिकांच्या हाती आहेत व त्यामुळे लोकशाही धोक्यात आली आहे, असाही बऱ्याच जणांनी सूर काढला.

व्यक्तिस्वातंत्र्याची मूल्ये मानवी मूलगामी वृत्तीची गमक आहेत. जर सर्वांना समान संधी मिळाली तर संपूर्ण समानतेच्या आदर्शात जी अव्यवहाराची त्रुटी आढळते त्याचे काय? □

---

# पुढील अंकी

* या अंकात जागेअभावी जाऊ न शकलेला 'नक्षलवादाच्या शोधात' या लेखमालेचा सातवा लेखांक
* 'माहितगार' यांचा 'एकाधिकार कापूस खरेदी' या विषयावरील लेख.

# अवती–भवती

शरद कृष्णन्

## बन्सीलाल....एक लोकशाही चमत्कार

भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये लोकशाही राज्यपद्धतीच्या पायघड्या कोणाला कोठे नेऊन बसवतील याचा काही म्हणता काही नेम नाही. बन्सीलालसारखा रानगट देहाती मनुष्य देशाच्या संरक्षणमंत्रिपदापर्यंत झेपावतो आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे स्वरूप तो सत्तेवरून दूर झाल्यावरच स्पष्ट होऊ शकते हा एक लोकशाही चमत्कारच मानावा लागल ! 'ऑल द प्राइममिनिस्टर्स मेन' नावाचे जे पुस्तक जनार्दन ठाकूर यानी लिहिले आहे त्यामध्ये भारताच्या या माजी संरक्षणमंत्र्याचे चरित्र अर्थातच विस्ताराने आले आहे. त्याच्या अजब राजकीय वाटचालीपैकी त्याच्या वाट्याला आलेली राज्यसभेची खासदारकी आणि हरियानाचे मुख्य मंत्रिपद या दोन्ही गोष्टी सुरस आणि चमत्कारिक कथेमध्ये शोभण्यासारख्या आहेत. आनंदबझारपत्रिकेच्या 'सन्डे' या साप्ताहिक आवृत्तीमधील या बन्सीलाल रामायणाची झलक पाहण्यासारखी आहे.

बन्सीलालजीचे वडील मोहरसिंग हे एक सर्वसाधारण शेतकरी. थापाथापी करून स्वत:चा बडेजाव माजविण्याची त्याना भारी आवड. त्यांच्या गावच्या पोलिसचौकीमध्ये असलेली त्याच्यासंबंधीची एक नोंद पाहण्यासारखी आहे: 'मोहरसिंग जाठ या गृहस्थाला बाहेरून दबाव आणून स्वत.चे वजन वाढविण्याची दांडगी हौस आहे. हा गृहस्थ ढोंगी व संपूर्ण अविश्वासार्ह आहे' अशा या मोहरसिंगचे बन्सीलालजी चिरंजीव. बन्सीलाल पहिल्यापासूनच रानगट, काहीसा तापट; परंतु स्वार्थासाठी काहीही करण्यास सिद्ध असलेला. स्वारीने कित्येक वर्षे धान्याच्या गोदामामध्ये मुनीम म्हणून काम केले. धान्याची पोती चढवून–उतरवून घेणे, वजन करणे, हिशेबठिशेब ठेवणे अशा स्वरूपाचे ते काम होते. या कामामध्ये काही वर्षांनी रस वाटेनासा झाल्यावर बन्सीने काही नातेवाइकांच्या मदतीने बस–सर्व्हिस सुरू केली आणि कित्येक वेळा स्वत.च कंडक्टर म्हणून तसेच गरज भासल्यास काही वेळा ड्रायव्हर म्हणूनही काम पाहिले. त्या भागातले काही लोक एक अतिउद्धट मुखांड कंडक्टर म्हणून बन्सीलालची आठवण काढतात. इतकेच नाही तर गरीब, अडाणी उतारूंची फसवणूक करून त्यांच्याकडून जास्त पैसे उकळण्याचे कामही बन्सी चोख बजावीत असे. एक गोष्ट मात्र नक्की की, बन्सीलाल जबर महत्त्वाकांक्षी होता. त्या भागात असलेली 'प्रभाकर' या नावाने ओळखली जाणारी परीक्षा दिल्यास बी. ए. ला बसण्याचा रस्ता मोकळा होत असे. (भोपाळ इंटरसारखा हा प्रकार असावा) ही प्रभाकरची परीक्षा देऊन बन्सीलालने बी. ए. ची वाट मोकळी करून घेतली आणि जवळच्या वाटेने जाऊन पदवी संपादन केली. तो काळ साधारणपणे १९४० चा. त्या वेळच्या पंजाबच्या राजकारणामध्ये देवीलाल यांना महत्त्वपूर्ण स्थान होते. याच देवीलालजींकडे बन्सीलाल यांनी उमेदवारी सुरू केली. बन्सीलाल यांना प्रारंभीच्या काळामध्ये ज्यांनी हात दिला त्यांपैकी देवीलाल व शेरसिंग यासारख्या नेत्यांचे एका बाबतीत अगदी एकमत आहे आणि ती बाब म्हणजे बन्सीलाल हा अगदी एक नंबरचा उत्तम चमचा होता. या बन्सीच्या जुन्या आठवणी सांगताना आज देवीलाल सांगतात–१९४० च्या सुमारास बन्सीलाल जालंदर येथे वकिलीचा अभ्यास करीत होते. त्याच वेळी पंजाब काँग्रेसच्या राजकारणामध्ये महत्त्वपूर्ण स्थान असलेल्या देवीलाल याना कोणा सुशिक्षित तरुणाची सहाय्यक म्हणून गरज होती. विशेषत: हिस्सार जिल्ह्याच्या राजकारणामध्ये मदत करू शकेल असा तरुण त्याना हवा होता. त्याच वेळी बन्सीलाल त्यांच्याभोवती पिंगा घालीत होता. देवीलालजींनी त्यालाच हाताशी धरला आणि राजकारणामध्ये नाव देण्यास प्रारंभ केला. प्रथम त्याला मंडळ काँग्रेस समितीवर आणि नंतर जिल्हा काँग्रेससमितीवर घेण्यात आले. बन्सीलाल आपण अत्यंत विश्वासू असल्याचे सतत दाखवीत असे असे सांगून देवीलालजी पुढे म्हणतात की, तरीही त्याने एकदा पैशाच्या हिशेबामध्ये काही गडबडघोटाळा केलाच आणि जेव्हा मी त्याला त्यासंबंधी दटावले तेव्हा त्याने रडून क्षमा मागितली. मीही तो विषय मग पुढे ताणला नाही. स्वातंत्र्योत्तरकाळातही बन्सीलालची गाडी राजकारणामध्ये पुढे सरकत नव्हती.

### अजब खासदारकी

१९६० साली मोठ्या अजब पद्धतीने आणि त्याला स्वत.लाही कोणतीही कल्पना नसताना राज्यसभेची खासदारकी बन्सीलालच्या वाट्याला आली. १९६० साली द्वैवार्षिक निवडपद्धतीप्रमाणे पंजाब–राज्यसभेच्या चार जागा खाली झाल्या आणि त्या वेळचे काँग्रेसचे अध्यक्ष यु. एन. ढेबर यांच्याकडे मान्यतेसाठी चार नावे पाठविण्यात आली. राजकीय सत्तास्थानाचा विचार करताना ढेबरजींची नजर सरळसरळ जातीय असे. त्यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या नावांमध्ये हुकुमसिंग यांचे नाव होते. नावावरून हे गृहस्थ जाठ असावेत असा ढेबर यांचा ग्रह झाला आणि त्यांना जाठ उमेदवार तर अजिबात नको होता. त्यांनी ते नाव नाकारले; परंतु जाठ ढेबरजींच्यापेक्षा हुशार. नावावरून जाठ वाटणार नाही, परंतु प्रत्यक्षामध्ये जाठ असेल अशा उमेदवाराचे नाव पाठविण्याचे ठरविल्यावर मला बन्सीलाल हे नाव आठवले असे आज १७ वर्षांनतर देवीलाल सांगतात. बनियासारखे वाटणारे हे नाव ढेबर यांना निश्चित आवडेल असे वाटल्यावरून बन्सीलालच्या नावाची शिफारस करण्यात आली. खुद्द

बन्सीलाल याना या शिफारशीची अपेक्षाही नव्हती आणि आपली शिफारस केली जाईल अशी जराशी कल्पनासुद्धा नव्हती. ज्या वेळी शिफारस करण्यात आलेल्या नावामध्ये बन्सीलाल हे नाव आढळले त्या वेळी बन्सीलालजींनी देवीलाल यांना विचारले, 'हे बन्सीलाल कोण?' हसतहसत देवीलाल म्हणाले, 'आहेत एक बन्सीलाल मेहता म्हणून!' आपल्याच नावाची शिफारस होत आहे याची जाणीवही यादी ढेबरजींकडे रवाना झाली तरीही बन्सीलाल याना नव्हती. देवीलाल याच्या अपेक्षेप्रमाणे ढेबर याची अनुकूल प्रतिक्रिया आली. बन्सीलाल–बी. ए एलएल. बी. एवढी माहिती ढेबर यांना पुरेशी वाटली आणि आणखी काहीही विचारणा न करता त्यानी या नावाला आपली मजुरी कळविली. देशावर तीन दशके राज्य करणाऱ्या या राजकीय पक्षाचे निर्णय अशा पद्धतीने घेतले जात असत!! ज्या वेळी पक्षातर्फे राज्यसभा उमेदवारांची नावे अधिकृतपणे घोषित करण्यात आली त्या वेळी देवीलाल यानी बन्सीलाल याना बोलावून घेतले व सांगितले की, 'यादीमध्ये घोषित करण्यात आलेले नाव हे त्याचेच नाव आहे!' देवीलाल याच्या खुलाशानंतर बन्सीलाल दिङमूढ होऊन देवीलालजींकडे पहातच राहिले! कुठचा कोण बन्सीलाल जातीय राजकारणाच्या तिरपगड्यावर उपयोगी पडलेल्या नावाचा आधार घेऊन बघता बघता खासदार की हो झाला!!

राज्यसभेमध्ये आल्यावर देवीलालजीना उपकारक ठरेल असे राजकारण बन्सीलालजींनी प्रारंभीच्या काळामध्ये केले. फत्तेबाद येथील एका जाहीर सभेमध्ये तर त्यानी देवीलाल हे 'माझे पिताजी आहेत असे उद्गार काढले! पुढे दिल्लीच्या राजकारणाची हवा लागल्यावर...त्यानी गुलझारीलाल नदा याचा पाठपुरावा सुरू केला.

## स्पर्धेच्या राजकारणामध्ये मुख्य मंत्रिपद

बन्सीलाल हरियानाचे मुख्य मंत्री कसे झाले? – याची कहाणीही मोठी दिलचस्प आहे. १ नोव्हेंबर १९६६ रोजी हरयानाराज्य अस्तित्वात आले आणि अपेक्षेप्रमाणे भगवत दयाळ शर्मा राज्याचे मुख्य मंत्री झाले. या शर्माजीचा कल उघडउघडपणे मोरारजीभाईंच्या बाजूचा होता. त्यामुळे पुढेमागे त्याची हरयानाच्या मुख्य मंत्रीपदावरून हकालपट्टी करावी असे इंदिराजींच्या मनामध्ये होतेच. १९६७ मध्ये ज्या मध्यविध निवडणुका झाल्या त्या वेळी इंदिराजींच्या सल्ल्याप्रमाणे गटाचे नेतृत्व करणाऱ्या मडळीना बाहेर ठेवण्यात आले. ८१ सदस्य असलेल्या सभागृहामध्ये पक्षाला ४८ जागा मिळाल्या. निवडून आलेल्या सदस्यांमध्ये भगवत दयाळ शर्मा नव्हते आणि तरीही नव्याने निवडून आलेल्या ४८ आमदारांपैकी ३५ आमदाराचा शर्मा याना पाठिंबा होता. पुन्हा शर्माचे पक्षाचे नेतृत्व करणार असे दिसून आल्यावर दिल्लीहून पुडी सोडण्यात आली की विधानसभेच्या सदस्यांमधून नवीन पक्षनेता निवडावा. दिल्लीहून देण्यात आलेल्या आदेशाचे पालन केले जातेच. निदान तेव्हा तरी तसा परिपाठ होता. तथापि उगाच काही पळवाट राहू नये म्हणून इंदिराजींच्या विश्वासातले दिनेश सिंग आणि इंद्रकुमार गुजराल यांना निरीक्षक म्हणून पाठविण्यात आले. हरियनाच्या राजकारणामध्ये त्या वेळी गुलझारीलाल नंदा यांना असाधारण महत्त्व होते. निरीक्षकांकडून सांगण्यात आले – भगवत दयाळ शर्मा याना सोडून अन्य कोणाचीही निवड करावी. नंदा म्हणाले ठीक आहे..पण निवड कोणाची करणार? चांगले पर्यायी नाव आहे कुठे? निरीक्षक म्हणाले असे का म्हणता – निवडून आलेल्या आमदारापैकी तुम्ही कुणाचीही निवड करू शकता, तुम्हाला योग्य वाटले तर तुमच्यामागे उभ्या असलेल्या या उंच चष्मिष्टर आमदारालाही तुम्ही नेता निवडू शकता. नंदाजींनी मागे वळून पाहिले. त्याच्या चांगल्या परिचयाचा–सतत त्याच्या भोवतीभोवती करणारा बन्सीलाल मागे नम्रपणे उभा होता. वकिली न करणारा हा भिवनीचा वकील १९६० सालापासून त्याच्या भातल्या वर्तुळामध्ये वावरत होता सहा वर्षांची खासदारकी पूर्ण केलेला बन्सीलाल नवीन विधानसभेमध्ये आमदार म्हणून निवडून आला होता. तथापि स्वप्नातही नंदाजीच्या डोळ्यासमोर या गृहस्थाचे नाव नेतेपदासाठी आले नव्हते. खरे सागायचे तर त्यांना स्वतःलाच हरियानाचे नेतृत्व स्वीकारण्याबाबत विनंती केली जाईल असा त्याचा अंदाज होता; पण तशी कोणाचीच हालचाल दिसत नव्हती. नवीन नेता तातडीने निवडणे आवश्यक होते. आपण नाही तर नाही–आपल्या विश्वासाचे बाहुले म्हणून या बन्सीलाच पुढे करण्यास काय हरकत आहे? खुर्चीवर तो असला तरी अधिकार आपलाच चालेल. मिनटा–दोन मिनिटांमध्ये हे सगळे विचार नंदाजीच्या डोक्यात येऊन गेले. त्यांच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटली. ते म्हणाले, चला होऊन जाऊ दे बन्सीलाल नवीन मुख्य मंत्री! नंदाजीचे एक सोडा पण मुख्य मंत्रिपदासाठी त्या वेळी ज्याचे नाव जोरात घेतले जात होते त्या शर्माजींनी सुद्धा बन्सीलालच्या नावाला होकार भरला. त्यानी विचार केला एखादा मुरलेला जुना नेता मुख्य मंत्रिपदी बसविण्यापेक्षा ज्याला कोणतेही विशेष स्थान अथवा मान्यता नाही असा हा बन्सीलाल बरा! त्यांनीही होकार भरला आणि–हरियानाला इतिहास घडविणारा मुख्य मंत्री मिळाला!

## सरीनसाहेबांचा किस्सा

बन्सीलालजी मुख्य मंत्री झाले त्या वेळी हरियानाची दिल्ली येथील जी प्रसिद्धिकचेरी आहे तिचे प्रसिद्धिप्रमुख म्हणून राजेंद्र सरीन नावाचे गृहस्थ काम करीत होते. हरियाना सरकारची नोकरी स्वीकारण्यापूर्वी सरीन दिल्ली येथील एका नामवंत दैनिकाचे विशेष प्रतिनिधी म्हणून काम करीत होते. वृत्तपत्र–प्रतिनिधी म्हणून काम केलेल्या माणसाने सरकारी नोकरी पत्करली की त्याची अवस्था मोठी विचित्र होते. सरकारी यंत्रणेमध्ये वाढलेल्या अधिकाऱ्याकडून या वार्ताहरअधिकाऱ्याना किंमत दिली जात नाही. मग ते स्वत.च्या पद्धतीने काम करू पाहतात. आणि मग धड वार्ताहरही नाही आणि अधिकारीही नाही अशी त्याची अवस्था होते. त्यातही स्वत.ची अक्कल चालविण्याची अशा अधिकाऱ्यांना दांडगी हौस असते; पण ज्या राजकीय नेत्यांना केवळ होयबा अधिकाऱ्याचे कोंडाळे भोवती लागते त्यांना हे असले अधिकारी अजिबात आवडत नाहीत. वर ज्यांचा उल्लेख केला आहे ते आपले सरीनसाहेब नेमके याच 'पत्रकार अधिकारी' पठडीतले. बन्सीलालजींनी मुख्य मंत्रिपद स्वीकारल्यावर त्यानी दिल्लीमध्ये जी पहिलीच पत्रकारपरिषद घेतली त्या परिषदेमध्ये स्वतंत्र बुद्धीच्या सरीनसाहेबांनी मधेमधे तोंड घातले आणि पहिल्याच भेटीत

पृष्ठ ३१ वर

आर्थिक टिपणे

# महापुराचे तांडवनृत्य!

नारायण वैद्य । सभासद, पुणे महापालिका

यंदाच्या वर्षी उत्तर भारतात विशेषत. गंगेच्या खोऱ्यात सर्वत्र बेसुमार पाऊस झाल्यामुळे पश्चिम राजस्थान सोडला तर बाकीच्या प्रातात महापुराने हाहा कार उडविला आहे या दैवी संकटात बिहारचा नबर अजून लागला नसला तरी तिथल्या नद्या केव्हा फुगून पसरतील त्याचा नेम नाही. गुजराथ, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या प्रातातही काही ठिकाणी नद्यांमुळे आलेल्या महापुराचे थैमान चालू आहे अजून पावसाचा काळ सपलेला नाही, त्यामुळे आताच आलेला पूर ओसरला म्हणजे या मोसमात पुन्हा पूर येणार नाही असे मानायला जागा नाही.

या मोसमात आलेल्या महापुरामुळे देशातला १८ लक्ष एकर प्रदेश पाण्याखाली गेला आणि ६१ लाखाहून अधिक लोकाना पुराचा तडाखा बसला. ८ लक्ष हेक्टर जमिनीवरील सर्व प्रकारची पिके नष्ट झाली व सुमारे ७० हजार घरे एक तर पूर्णपणे वाहून गेली किंवा त्याची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. ज्याचा तपास लागला अशा मृताचा आकडा १४८ झाला आहे. महत्त्वाचे रस्ते आणि अनेक ठिकाणचे लोहमार्ग उखडले तर गेलेच आहेत; परंतु लहानमोठे अनेक पूल निकामी झाले आहेत.

या वर्षीचा सर्वात मोठा तडाखा दिल्ली-प्रदेश आणि हरियानाला बसला. दिल्ली शहर आणि सभोवतालचा परिसर यातला सुमारे १८८ चौरस किलोमीटर प्रदेश पाण्याखाली गेला आणि दिल्लीतल्या सुमारे १०५ वसाहती पुराच्या तडाख्यात सापडल्या दिल्लीच्या एकूण वस्तीपैकी सुमारे एक-तृतियांश लोक ( २० लक्ष ) या महापुराच्या कचाट्यात सापडले. यामध्ये समाजातला आर्थिक दृष्ट्या जो सर्वात तळचा भाग त्याचे जीवन या महापुराने पार उध्वस्त करून टाकले.

पुराचे संकट असे असते की, ते येणार असे कळूनसुद्धा टाळता येत नाही व त्याचा प्रतिकार करणे मानवाच्या ताकदीबाहेरचे ठरते. ही नैसर्गिक आपत्ती कोणीच रोखू शकत नाही आणि प्रजेबरोबर प्रशासनही या प्रश्नातून कशी सुटका करून घ्यावयाची या विचाराच्या महापुरात गटंगळ्या खात वाहून जाते.

## पूरनियंत्रण—थोडा इतिहास

आपल्या देशात सुमारे २ कोटी हेक्टर जमीन या-ना-त्या वर्षी पुराच्या कक्षेत येते. पुरापासून हे क्षेत्र वाचविण्यासाठी १९५४ मध्ये राष्ट्रीय पूरनियत्रण कार्यक्रम सुरू करण्यात आला. पहिल्या दोन वर्षांमध्ये पहाणी, संशोधन, आकडेवारी जमविणे आणि काही तातडीच्या उपाययोजना करणे हे काम करण्यात आले. १९५६ पासून प्रत्यक्ष पूरनियंत्रणकार्याला काही प्रमाणात सुरुवात झाली. महापुराची शक्यता अजमावणे आणि पुराचे बाबतीत धोक्याचा इशारा देणे यासाठी ज्या नद्याना नेहमी महापूर येतो त्या नद्यांच्या आसपास इशारा केंद्र उभारण्यास सुरुवात झाली १९५४ मध्ये नॅशनल फ्लड कंट्रोल प्रोग्रॅम सुरू झाल्यापासून पूरनियत्रणाची जी कामे सुरू झाली त्यामध्ये १९७५ अखेर ७ हजार ८८० किलोमीटर एकूण लाबीचे बधारे, एकूण १३ हजार ४०० कि. मी. लाबीचे पुराचे पाणी वाहून नेणारे कालवे, शहरसरक्षणाच्या एकूण २१५ योजनांची आखणी इतके काम झाले. महापुराच्या मर्यादेच्या पलीकडे ४७०० खेड्याचे अधिक उच्च ठिकाणी पुनर्वसन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाला ३९४ कोटी रुपये खर्च आला आणि एकूण ८० लक्ष हेक्टर प्रदेशाला त्याचा फायदा मिळाला. महापुराच्या आगमनाचा अभ्यास करून त्याचे ‘ भविष्य ’ वर्तविणारी केंद्रे भुवनेश्वर, दिल्ली, गोहत्ती, जलपैगुडी, लखनौ, पाटणा, कोचनपाड आणि सुरत येथे उभारण्यात आली पाचव्या पंचवार्षिक योजनेत पूरनियंत्रणासाठी १६२ कोटी रु. संकल्पित होते. पाचव्या पंचवार्षिक योजनेत या कामासाठी २८१ कोटी रु. मंजूर केलेले आहेत.

१९७५ मध्ये देशांत ठिकठिकाणी आलेल्या महापुरामुळे एकूण ४७१ कोटी रुपयांचे नुकसान झाले. त्या वेळी सर्वात मोठा हाहाःकार उडाला तो बिहारमध्ये. बिहारची राजधानी पाटण्याचा तीनचतुर्थांश भाग ६ ते १० फूट उचीच्या पाण्याखाली गेला आणि त्या वर्षाच्या देशभर झालेल्या नुकसानीपैकी ५६ टक्के नुकसान एकट्या बिहार प्रातातले होते. गेल्या २३ वर्षांमध्ये महापुरामुळे सर्वात अधिक नुकसान १९७१ साली झाले ते ६३२ कोटी रुपयाचे होते १९५३ ते १९७५ या काळात देशभर पुरामुळे झालेल्या नुकसानीची वार्षिक सरासरी १८१ कोटी रुपये आहे. १९७४ मधले आसाममधील ब्रह्मपुत्रेचे खोरे, उत्तर बिहार, उत्तर प्रदेशाचा पूर्व भाग, उत्तर बगाल येथे पुराचे ताडवनृत्य भयानक होते. केरळ आणि कर्नाटक या प्रांतात मुसळधार पाऊस, कडे कोसळणे आणि जमीन खचणे यामुळेही नुकसान झाले. पश्चिम बगालचा दक्षिण भाग आणि ओरिसाचा उत्तर किनारा येथे पावसामागोमाग चक्री वादळाने सारा प्रदेश मुरगळून टाकला. या सर्व ताडवनृत्यापायी ५६९ कोटी रु. किंमत मोजावी लागली.

## संकट निवारण्याचे उपाय

महापुरासारख्या नैसर्गिक सकटाचे निवारण पूर्णपणे करणे मानवाच्या हातात नाही, हे कोणालाही समजू शकते. तरीसुद्धा जीवित आणि वित्तहानी टाळणे आणि त्याचा उपद्रव कमी करणे यासाठी जितके कसोशीने आणि आखीव प्रयत्न करावयास पाहिजेत, तेवढे आपल्या देशामध्ये स्वातंत्र्यानतरच्या काळातसुद्धा होऊ शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पुराचे थैमान सुरू झाले की, थातुरमातुर उपाय सुरू होतात हे उपाय मदतीच्या स्वरूपातलेच केवळ असतात पूरग्रस्थाचे पुनर्वसन, त्यांच्या विस्कळित जीवनाला मदत, असे स्वरूप या तात्पुरत्या उपायांचे असते. यासाठीसुद्धा वर्षाला सुमारे १० कोटी रु खर्च होतो. महापुराचे पाणी ओसरले की, महापुराच्या संकटाची तीव्रता निवारण करण्याचे प्रयत्नही मंदावतात आणि पावसाळ्यानंतरच्या येणाऱ्या थंडीत ते गोठून जातात. दिल्ली, हरियानाच्या सरहद्दीवरच्या प्रदेशात यापूर्वी आलेल्या महापुराचा अनुभव जमेस धरून आणि या वर्षाच्या पावसाळ्यात त्या भागात जो दीर्घकाळ बेसुमार पाऊस पडला त्याचा अभ्यास करून पुढील संकटाची

दखल न घेता कोणतेही परिणामकारक नियंत्रण उपाय तेथील प्रशासनाने योजले नसावेत असे दिसते. पूरनियंत्रणासाठी आता-पर्यंत त्या भागात गेली अनेक वर्षे जे उपाय योजण्यात आले ते (दिल्ली, हरियानाच्या सीमेजवळच्या धनसा बंधाऱ्याची स्थिती पाहून) पूर्ण अभ्यासानुसार आणि अनुभवा-नुसार योजले गेले नसावेत अशी शंका येते. पुराचे पाणी वाहून नेण्यासाठी या बंधाऱ्याच्या दोन्हीही बाजूस जे कालवे खोदण्यात आले, त्या कारणावरून दोन्ही बाजूकडच्या खेडुतांमध्ये मारामाऱ्या झाल्याच्या बातम्या खऱ्या असतील तर ते अतिशय दुर्दैवी होय. पूर-नियंत्रणाच्या योजना प्रत्येक प्रांताने आपल्या-पुरत्याच आखून गप्प राहावे हे केवळ सुसंस्कृतपणाचे लक्षण नाही, तर अल्पबुद्धीचे आणि अमानुषतेचे आहे महापुराचे तांडव-नृत्य करीत जाणारी नदी ज्या ज्या प्रांतातून जाते त्या सर्व प्रांतांना त्यामुळे येणारा महा-पुराचा धोका संभवतो. तसेच उत्तर भारता-तल्या अनेक नद्या वर्षांतून एकदा नव्हे दोनदा उग्र स्वरूप धारण करतात. तेव्हा या पूर-नियंत्रणपद्धतीचा विचार करण्यासाठी संबंधित प्रांतानी एकत्र येऊन सर्वंकष योजना आखण्याची जरुरी आहे दिल्लीपरिसरातल्या यद्यांच्या पूरपरिस्थितीवर हरियाना, राज-स्थान आणि दिल्ली यांनी सामूहिकपणे विचार करून भावी काळासाठी विचार करायला हवा. १९६७ साली याबाबतीत केलेला दिल्ली मास्टर प्लॅन आणि १९५४ सालचा राष्ट्रीय महापूर निवारण कार्यक्रम अजून पूर्णपणे का अमलात आणला गेला नाही याची चौकशी झाली पाहिजे. १९७५ साली जे महापूरनियंत्रण आयोग स्थापन झाले त्याने आतापर्यंत फारसे काही केल्याचे ऐकिवात नाही. या आयोगाचा रिपोर्ट तर दोन वर्षांत सादर व्हायचा होता. महा-पुराच्या नियंत्रणाचा विचार करून योजना सुचविण्यासाठी कमिट्या आणि आयोग यांच्यावर बराच पैसा खर्च झाला आहे. त्यातून फारसे काही निष्पन्न होईल अशी लक्षणे आज तरी दिसत नाहीत, तेव्हा प्रत्यक्ष कार्यवाहीच्या मागे केंद्रसरकारने आताच लागले पाहिजे. नद्यामधला साठलेला गाळ काढून नद्याची पात्रे खोल करणे व पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढविणे हा उपाय कितपत जमेल ते सांगता येत नाही; परंतु पर्वतावरून हजारो टन माती, दगड, गोटे नदीच्या पाण्याबरोबर खाली वाहून येतात आणि नदीचा प्रवाह संथ झालेल्या पात्रात साठून बसतात. ही होणारी धूप थांबविण्याचा तातडीचा उपाय केला पाहिजे. देशभरच्या नद्यामुळे सुमारे ६००० कोटी टन माती धुपून पाण्याबरोबर वाहून जाते. तसेच महा-पुराचे प्रचंड लोढे नियंत्रित करण्यासाठी गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा याच्याखालोखाल ज्या नद्या आहेत त्याच्यावर बधारे घालून पुराचे पाणी नियंत्रित करता येऊ शकेल.

हा प्रश्न केवळ तांत्रिक किंवा आर्थिक पायापुरता मर्यादित नाही. एखाद्या युद्धाच्या परिणामासारखा या सकटाचा परिणाम मानवी जीवनावर होत असतो आणि तो भरून येण्यास पाच–दहा वर्षे कालावधी लागतो तोपर्यंत महापुराचा दुसरा तडाखा बसतो. हे दुष्ट चक्र आपण थांबवू शकणार नाही का? ◻

## समुद्रमंथन

जगातल्या सर्व समुद्राच्या तळाशी खनिज संपत्ती सापडेल असे भाकीत ज्यांनी ज्यांनी काही वर्षांपूर्वी केले, त्यांना लोकांनी वेड्यात काढले असेल. समुद्रमंथन करून चौदा रत्ने उत्पन्न केल्याची पौराणिक कथा आपल्याकडे आहे. तिचा पडताळा यावा अशा तऱ्हेच्या घटना सध्या समुद्रसंशोधनात घडत आहेत. पृथ्वीवरील जमिनीतून अनेक प्रकारची खनिज संपत्ती शेकडो वर्षे उकरून काढली जात आहे. त्याच्या अनेक पटीनी समुद्राच्या तळाशी खनिज संपत्ती आहे असे अभ्यासपूर्वक सिद्ध झाले आहे. समुद्रातून खनिज तेल काढण्याचे यशस्वी प्रयोग भारतासह काही देशानी केलेले आपण प्रत्यक्ष पाहत आहोत. समुद्रातून मोती काढतात ही गोष्ट जशी आता सवयीची झाली तसे काही वर्षांनी जगातल्या सर्व समुद्रातून खनिज संपत्तीच्या खाणी निर्माण झालेल्या पाहून माणसाला फारसे आश्चर्य वाटणार नाही.

जगातल्या समुद्राच्या तळामध्ये खनिज संपत्तीचे इतके प्रचंड साठे आहेत की, ते पृथ्वीवरील मानवाला अजून कित्येक शतके पुरतील. सहा हजार वर्षे पुरेल इतका तांब्याचा साठा आहे. एक लक्ष ५० हजार वर्षे पुरेल इतके निकेल आणि २० हजार वर्षे पुरेल इतके अॅल्युमिनियम आहे. किनाऱ्यालगतच्या साधारण खोल पाण्यामध्ये तेल, हिरे आणि सोने सापडले आहेच. समुद्रात असलेल्या 'पर्वतामध्ये, सर्वदूर पसरलेल्या टेकड्यामध्ये आणि मैदानामध्ये' रेडक्ले नावाचे लहान-मोठे दगड सापडतात, त्यामध्ये कित्येक अब्ज टनाचा तांब्याचा साठा असल्याचे 'न्यूयॉर्क टाइम्स', मासि-काने म्हटले आहे. समुद्राच्या तळाशी असलेल्या जमिनीवर लहान, मोठ्या, वाटोळ्या, दगडांचा दाट थर पसरलेला आहे त्यामध्ये मॅंगेनिज व्यतिरिक्त तांबे, अॅल्युमिनियम, निकेल, लोखंड आणि कोबाल्ट इत्यादी सुमारे ४० धातू खनिज-स्वरूपात मोठ्या प्रमाणावर आहेत. सुमारे दीड अब्ज टन वजनाचे केवळ मॅंगेनीजचे गोटे आहेत. ते विविध आकाराचे असून त्यातले काही लहान बटाट्याच्या आकाराचे आहेत. एका अशा मोठ्या गोट्याचे वजन तर १९०० पौंड भरले. जगातल्या सर्व समुद्रांमध्ये ते पसरलेले आहे आणि आश्चर्य-कारक धक्का देणारी बाब अशी की, समुद्रातल्या कोट्यवधी सूक्ष्म जीवाणूच्या शारीरिक प्रक्रियेतून ही खनिज संपत्ती सूक्ष्म स्वरूपात निर्माण होत राहते व ती या गोट्यावर साठून त्याचा आकार हळूहळू मोठा होत असतो. म्हणून शास्त्रज्ञाचा अदाज असा आहे की, जगभरच्या समुद्रात होणारी ही सूक्ष्म वाढ इतकी प्रचंड आहे की, मानवाने ही संपत्ती कितीही वापरली तरी ती संपणार नाही.

खोल समुद्रातील ही खनिज संपत्ती बाहेर काढण्याच्या कामात अमेरिकन, ब्रिटिश, फ्रेंच, बेल्जियन, जर्मन, डच, ऑस्ट्रेलियन आणि जपानी कंपन्या गुंतलेल्या आहेत. जगातल्या अनेक विकसनशील देशानी आपली समुद्रातली हद्द किनाऱ्यापासून २०० मैलापर्यंतची असावी अशी मागणी संयुक्त राष्ट्रसंघाकडे केली आहे. आर्थिक कारणा-साठी या हद्दीची आवश्यकता असल्याचा दावा सर्वांनी केला आहे संयुक्त राष्ट्र संघाच्या आम सभेने जगातल्या सर्व महा-सागरातून सापडणारी संपत्ती ही जगातल्या अखिल मानवाच्या मालकीची परंपरागत संपत्ती असल्याचे जाहीर केले आहे त्यामुळे विकसनशील देशाना याचा फायदा घेता येईल; परंतु बडी राष्ट्रे याबाबतीत जितकी आघाडीवर आहेत, तितकी विकसनशील राष्ट्रे नाहीत. त्यामुळे जगातल्या औद्योगिक क्रांतीचे फायदे जसे बड्या राष्ट्रानी लाटले तशी स्थिती या सागरी संपत्तीची होईल काय अशी भीती वाटते. ◻

# पोलंड

## विरोधाबाबत उदार धोरण

वा. दा. रानडे

पोलंडमधील अलीकडच्या घटना पूर्व युरोपातील साम्यवादाच्या बदलत्या स्वरूपाचे दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. एक-दीड वर्षापूर्वी तेथे अन्नकिमतीत सरकारने वाढ केल्याने पेचप्रसंग निर्माण झाला होता. मांसाच्या किंमतीत ६९ टक्के वाढ करण्यात येईल असे सरकारने गेल्या जूनमध्ये जाहीर केले. लोकांनी, विशेषतः कामगारांनी या भाववाढीविरुद्ध निदर्शने केली, रेल्वेगाड्या अडविल्या. या विरोधाची दखल सरकारला घ्यावी लागली. भाववाढ स्थगित करून त्यावर अधिक विचार करण्याचे आश्वासन सरकारने दिले. काही दिवसांनी मांसाच्या किंमतीतील ६९ टक्के भाववाढ ३५ टक्क्यांपर्यंत खाली आणली; पण पुढे ही मर्यादित वाढही १९७८ च्या जूनपर्यंत पुढे ढकलण्यात आली.

सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे भाववाढविरोधी आंदोलनात अटक केलेल्या सर्वांची मुक्तता गेल्या २२ जूनला सरकारने केली. गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यातील आंदोलनात ज्या कामगारांना अटक करण्यात आली त्यांची बाजू मांडण्यासाठी, त्यांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी वर्कर्स डिफेन्स कमिटी (कामगार संरक्षण समिती) गेल्या सप्टेंबरात स्थापन करण्यात आली होती. तिचे पाच सभासद व चार सहानुभूतिदारांना मेमध्ये अटक करण्यात आली होती. देशाबाहेरच्या पोलंडविरोधी केंद्राशी संपर्क ठेवून कार्य केल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर खटले भरण्यात येतील अशा बातम्या होत्या; पण सरकारने तो विचार बदलल्याचे दिसते. या सर्वांची मुक्तता करण्यात आली असून त्यांच्यावरील खटले रद्द करण्यात आले आहेत. वर्कर्स डिफेन्स कमिटीच्या दडपणापुढे आपण मान तुकवीत नाही असे भासविण्यासाठी पाच कामगारांना अजूनही तुरुंगात ठेवले होते; पण त्यांचीही आता मुक्तता करण्यात आली आहे.

सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रातही कम्युनिस्ट राज्यकर्त्यांनी अधिक उदारमतवादी धोरण स्वीकारले आहे. राजकीय वातावरणाची छाया चित्रपटावर पडत असते. सिनेमानिर्मात्यांना भूतकालीन घटनांवरच चित्रपट काढण्याची मोकळीक असे. कम्युनिस्ट राजवटीवर टीका करणारे चित्रपट निघू नयेत हा त्यामागे एक उद्देश असेल. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळावर पोलंडमध्ये एकही चित्रपट निघाला नाही किंवा निघाला असला तरी तो प्रेक्षकांना दाखविण्यात आला नाही; पण आता युद्धोत्तर कम्युनिस्ट पोलंडच्या जीवनातील काही अंगांचे दर्शन घडविणारे तीन चित्रपट तेथे दाखविण्यात येत आहेत. त्यापैकी 'मॅन ऑफ मार्बल' हा चित्रपट स्टालिनछाप राजवट पोलंडमध्ये होती त्या काळावरचा आहे, तर दुसरा 'कामॉफ्लेज' हा चित्रपट बुद्धिवंतांची श्रद्धा आणि अश्रद्धा यांच्या विषयीचा आहे. या दोन्ही चित्रपटांवर कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या बैठकीत कडक टीका झाली होती. नेहमीच्या पद्धतीने या चित्रपटांना वास्तविक बंदीच घालावयाची; पण ते दाखविण्यास परवानगी देण्यात आली आहे. चर्चबाबतही सरकार उदार धोरण स्वीकारीत आहे. पार्लमेंटपुढे ३० जूनला केलेल्या भाषणात कम्युनिस्टनेते गिरेक म्हणाले, 'धर्माबद्दल निरनिराळे दृष्टिकोन असणाऱ्या लोकांचे संबंध सहिष्णुतेचे असले पाहिजेत.' सरकारने अधिक लढाऊ व कडक धोरण स्वीकारावे असा गिरेक यांच्या काही सहकाऱ्यांचा आग्रह होता; पण गिरेक यांनी ते मान्य केले नाही.

राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक क्षेत्रात आपल्या विरोधकांबाबत उदार धोरण गिरेक का स्वीकारीत आहेत? भाववाढ आणि काटकसरीच्या उपाययोजना आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक असून त्या आता फार काळ लांबणीवर टाकणे शक्य नाही. विरोधकांविरुद्ध दडपशाहीचे उपायही यशस्वी होत नाहीत. तेव्हा काही मर्यादेपर्यंत त्यांच्या विरोधाला व मतप्रकटनाला मोकळीक देण्याचे गिरेक यांनी ठरविले आहे असे दिसते.

आपल्या राजवटीच्या धोरणांना होणारा विरोध कसा हाताळावयाचा याबाबत काही नवीन धोरण कम्युनिस्ट राज्यकर्ते स्वीकारीत आहेत काय याचा विचार पोलंडमधील या संघटनांच्या संदर्भात करायला हवा. विरोधकांना प्रतिगामी ठरवून त्यांची चळवळ कडक दडपशाहीने दडपून टाकावयाची ही कम्युनिस्ट राज्यकर्त्यांची नेहमीची पद्धत. विरोधकांच्या विरोधप्रदर्शनाला मुक्त वाव दिला तर त्यातून कम्युनिस्ट राजवटीलाच धोका निर्माण होईल अशी भीती कम्युनिस्ट राज्यकर्त्यांना नेहमी वाटत असते. पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड आणि चेकोस्लोव्हाकिया या देशांत निरनिराळ्या वेळी तेथील कम्युनिस्ट राजवटीविरुद्ध असलेल्या असंतोषाचा उद्रेक संप, निदर्शने व उठावाच्या रूपाने व्यक्त झाला होता. हंगेरी आणि चेकोस्लोव्हाकियात हा उद्रेक एवढा तीव्र होता की कम्युनिस्ट सत्तेलाच धोका निर्माण झाला असल्याचे सांगून रशियाच्या फौजांनी हंगेरीत आणि वॉर्सा करार-राष्ट्रांच्या फौजांनी चेकोस्लोव्हाकियात हस्तक्षेप केला आणि तेथील बंडे मोडून काढली. चेकोस्लोव्हाकियातील बंडाचे स्वरूप निराळे होते. कम्युनिस्ट पक्षाची सूत्रे डुबचेक यांच्याकडे आल्यानंतर कम्युनिस्ट कार्यपद्धतीत आणि समाजपद्धतीत लोकशाही आणण्याचा प्रयोग त्यांनी केला होता. रशियन सत्ताधाऱ्यांना हे मान्य नव्हते. चेकोस्लोव्हाकियाचा हा प्रयोग पूर्व युरोपमधील इतर देशांतही पसरेल व हे देश आपल्या वर्चस्वापासून दूर जातील अशी भीती रशियन नेत्यांना वाटू लागली, त्यांनी लष्करी हस्तक्षेप करून हे बंड मोडले व मॉस्कोच्या कलानुसार चालणारी राजवट तेथे आणली. या दोन्ही देशांत लष्करी हस्तक्षेपाची आवश्यकता खरोखरच होती का? लोकशाही मार्गाने तेथील संघर्ष मिटविण्याचे प्रयत्न का झाले नाहीत?

पाश्चात्य देशातील लोकशाही खरी लोकशाही नाही, भांडवलशाही चिरस्थायी करणारी ती लोकशाही आहे. भांडवलशाही नष्ट करणाऱ्या कम्युनिस्ट राष्ट्रांतच खरी लोकशाही आहे असा कम्युनिस्टनेत्यांचा दावा असतो. वास्तविक दोन्ही बाजूंची लोकशाही अपूर्ण आहे. पाश्चात्य लोकशाहीत धनिकशाहीचे दडपण येते हे खरे; पण कम्युनिस्ट लोकशाहीत कम्युनिस्टपक्षाशिवाय इतर पक्षांना संघटनास्वातंत्र्य नाही. त्यामुळे प्रत्यक्षात तेथे कम्युनिस्ट हुकूमशाहीच अस्तित्वात असते. दोन्ही बाजूच्या लोकशाहीतील ही अपूर्णता दूर करण्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न करायला हवेत. पोलंडमधील घटना त्या दृष्टीने स्वागतार्ह आहेत. विरोधकांना मतप्रदर्शनाच्या बाबतीत मर्यादित का होईना मोकळीक मिळणे हे लोकशाहीच्या दिशेने टाकलेले एक पाऊलच आहे; पण विरोधकांचे केवळ या एका पावलाने समाधान होणार नाही. विरोधकांना पक्ष उभारण्याचे व संघटना करण्याचे स्वातंत्र्य मिळायला हवे. तो पल्ला गाठायला अजून बराच काळ जावा लागेल. □

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## ☐ पोटभर निदर्शने करावीत

तसं पाहिलं तर आणीबाणी उठविल्यानंतर अजून तसा काही फारसा कालावधी लोटलेला नाही. म्हणजे त्या दुसऱ्या पारतंत्र्य तून झालेल्या दिग्विजयी मुक्तीचा आनंद अजूनही खूपच ताजा आणि नवीन आहे. आम्ही तर या मोकळ्या आणि स्वतंत्र वातावरणात सध्या तरी चक्क बावचळूनच गेली आहोत. हेही अगदी साहजिकच आहे. कारण गेल्या दीड वर्षात डोकं बंद ठेवून फक्त ' अधिक काम, अधिक उत्पादन ' अशा घोषणा देण्याची आणि राष्ट्राची जोरदार आगे कूच अगतिक आंधळेपणाने फक्त बघण्याची कुचकामी सवय आम्हाला जडलेली; तेव्हा स्वातंत्र्याच्या या नव्या पर्वातच खऱ्याखुऱ्या कामाची आणि खरीच आगे कूच करण्याची वेळ आल्यावर असं बावचळून जाणं साहजिकच आहे; पण तुमच्याआमच्यांसारखे काही तुरळक आणि क्षुद्र अपवाद वगळता बाकी बऱ्याच लोकाना या स्वातंत्र्याचा खरा सूर पक्का गवसलेला दिसतो. आपल्या स्वातंत्र्याची आणि लोकशाहीतील हक्काची पूर्ण जाणीव असलेल्या या मंडळीनी आपल्या हालचाली आताशा अगदी भरपूर जोराने सुरू केल्या आहेत. देशात सध्या स्वातंत्र्याचे जे चैतन्य पसरलेले दिसते ते खरे तर 'या विरोधक मंडळीच्या निर्भय हालचालीचे फळ आहे आणि त्यातून पुणे हे सर्व राजकीय व सांस्कृतिक घडामोडीचे केंद्र आहे. सर्व राजकीय, सांस्कृतिक वगैरे वगैरे परिवर्तने प्रथम पुण्यातच घडतात आणि मग त्याचे पडसाद देशभर उमटतात. तेव्हा पुण्यातील समाजजीवनाचे भारतातील घडामोडीमधील हे महत्त्वाचे आणि अनन्यसाधारण स्थान लक्षात घेता, आणीबाणीनंतरच्या या स्वातंत्र्याचे पडसादही पुण्यात प्रकर्षाने उमटणार हे स्पष्ट आहे. गेल्या काही दिवसातच पुण्यात घडलेल्या काही घटना या दृष्टीने खूपच बोलक्या आहेत.

त्याच असं झालं की परवाच भारताचे नवीन पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यानी पुण्याला भेट दिली. सध्याच्या राजकीय परिवर्तनानंतर पंतप्रधान या नात्याने मोरारजीभाईंनी पुण्याला दिलेली ही पहिलीच भेट; तेव्हा ती तशी गाजणार हे अगदी साहजिकच आहे. त्यानुसार पुणेकर मंडळीनी पंतप्रधानाचे उत्साहाने स्वागत तर केलेच; पण विशेष महत्त्वाची आणि धक्कादायक घटना अशी की या स्वागताबरोबरच, किंबहुना स्वागतापेक्षाही अधिक तीव्र आणि अपमानकारक अशी निदर्शने पंतप्रधानासमोर करण्यात आली. या निदर्शनामुळेच एका ठिकाणी पंतप्रधानांच्या गाडीचा मार्ग बदलावा लागला, तर दुसऱ्या एका ठिकाणी मात्र निदर्शकांनी त्याची गाडी अडवून धरली. उलटसुलट घोषणा दिल्या आणि पंतप्रधानाच्या गाडीवर चपलाही फेकल्या. कुठल्याही लोकशाही राष्ट्रामध्ये पंतप्रधानासमोर अशा तऱ्हेची निदर्शने, मागण्या, निषेधमोर्चे होणारच असे गृहीत धरले तरी देखील पुणेकरानी केलेली ही निदर्शने वेगळ्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे ही निदर्शने ज्या वेळी अशी तीव्र आणि हिडिस स्वरूपात केली गेली त्या वेळी जवळच पोलिसमंडळी उपस्थित होती आणि असे असूनही पोलिसाकडून निदर्शकाना थोपविण्याचा पुरेसा प्रयत्नच झाला नाही असे म्हणतात. कित्येक ठिकाणी निदर्शकामध्ये आणि त्याच्या विरोधकामध्ये मारामाऱ्या होऊन काही मंडळी बरीच जखमी झाली. तेव्हा देखील पोलिस फक्त बघ्याची भूमिका घेऊनच तटस्थ राहिले. आणीबाणीच्या काळात आपल्या आगतुक कार्यतत्परतेमुळे लोकामध्ये घबराट निर्माण करणाऱ्या या पोलिसाच्या वागण्यात सध्या अचानक असा समतोल कसा निर्माण झाला असा प्रश्न त्यामुळे निर्माण होतो. याची अर्थातच बरीच कारणे संभवतात. एक तर आणीबाणीतील आपल्या अतिरेकी वागणुकीचा सर्वच पोलिसांना कटाळा आला असावा. यामुळे त्यानी शांत चित्ताने निदर्शकाना त्याच्या स्वातंत्र्याचा हक्क उपभोगण्याची संधी दिली असावी. याखेरीज काहीच्या मते, हा सर्व राज्यसरकार व पोलिसयंत्रणा यानी रचलेला डाव होता आणि त्यानुसारच पंतप्रधानाचा अपमान करण्याची ही योजना राबविली गेली. दुसऱ्या एका मतानुसार ही निदर्शने म्हणजे कॉंग्रेसमधीलच दोन गटाच्या संघर्षाचे दृश्य रूप होते आणि या संघर्षात पोलिसानीही मनसोक्त भाग घेतला होता. यातील कुठलेही मत खरे धरले तरी एक गोष्ट मात्र अगदी स्पष्ट आहे. या सर्व प्रसंगात पोलिसानी दाखविलेला शांतपणा आणि समतोल वाखाणण्यासारखा आहे अशा वागणुकीमुळे लोकांच्या मनात पोलिसाविषयी असणारी भीती आणि दरारा पूर्ण नष्ट होतो आणि पोलिस हे सर्वांचे खरेखुरे आश्वासक मित्र बनतात. याशिवाय या समतोलपणाचे अनुकरण जर सर्व भारतीय करतील, तर भारतातील निदर्शनाची समस्याच सुटून जाईल

या निदर्शनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही निदर्शने युवककांग्रेसतर्फे करण्यात आली होती आणि त्यात भाववाढीचा निषेध करण्यात आला. अशा तऱ्हेने भाववाढीसारख्या जिव्हाळ्याच्या विषयावर निदर्शने करण्याची युवककांग्रेसची ही पहिलीच वेळ असावी. निदर्शनाच्या आपल्या या पहिल्याच प्रयत्नात त्यानी मिळविलेले हे यश आणि साधलेला हा परिणाम खचितच कौतुकास्पद आहे. फक्त प्रश्न एवढाच की भाववाढीची ही समस्या गेल्या तीस वर्षांची जुनी समस्या असताना देखील त्याची जाणीव युवककांग्रेसच्या धडाडीच्या कार्यकर्त्यांना ह्या वेळीच अचानक का व्हावी ? जनतासरकार •

अधिकारावर येऊन देखील गेल्या दोन महिन्यात भाववाढ झालीच आहे ही वस्तुस्थिती गृहीत धरली, तरी भाववाढीचे खरे उच्चांक कॉंग्रेससरकारनेच प्रस्थापित केले आहेत. अगदी कॉंग्रेसजनाना परमप्रिय वाटणाऱ्या आणीबाणीच्या काळात देखील भाववाढ होतच राहिली होती. तेव्हा त्या वेळी युवककॉंग्रेसला या समस्येची जाणीव का होऊ नये? खर तर हा प्रश्न अगदीच बालिश आहे. कारण त्याच उत्तर तुम्हाआम्हाला माहीत आहे. सध्याचे सरकार जनतासरकार आहे जुने सरकार कॉंग्रेससरकार होते. तेव्हा त्या काळातली भाववाढ युवककॉंग्रेसला गोड वाटणे स्वाभाविकच आहे.

हीच तर खरी आमच्या राजकारणाची गोची आहे सरकारने चुका करीत राहायचे आणि विरोधकानी त्याचे भाडवल करायचे हा आमच्या राजकारणाचा धर्म आहे कॉंग्रेस सत्तेवर असताना विरोधकानी भाववाढीवर कडाडून हल्ला चढविला सरकारी धोरणावर टीका केली. आता जनता सत्तेवर आली, तेव्हा कॉंग्रेसला भाववाढीची बोचणी लागणे साहजिक आहे कारण हा धोरणात्मक मतभेद आहे. विरोधकाना सरकारी धोरण अमान्य असणे, ते व्यर्थ वाटणे हेच लोकशाहीतील विरोधाचे मूलभूत आणि एकमेव अग आहे केवळ प्रस्थापित सरकारच्या धोरणाचा निषेध आणि गाधीवादाचा-समाजवादाचा-फुटकळ उद्घोष हेच आमच्या आजवरच्या राजकारणाचे मर्म आहे. येणारा प्रत्येक प्रेषित नेता आणि येणारे प्रत्येक नवे सरकार, नव्यानेच गांधीवादाचा आणि समाजवादाचा जयजयकार करीत पुढे येत आणि तीच तीच तत्त्वे नव्या मुलाम्यात चढवून बाजारात विक्रीला काढली जातात. यथावकाश त्याचाही पुन्हा लागायचा तोच निकाल लागतो आणि पुन्हा कुणी नवा प्रेषित, गाधीवादाचा नवा मत्र जपत पुढे येतो. कारण गाधीवाद ही भारतीयाना मानवणारी अफूची गोळी आहे. या नावाखाली सगळे गोंधळ माफ केले जातात असा अनुभव आहे; पण खरी गमत अशी की नवनवीन तत्त्वाची, धोरणाची कमतरता कधीच भासली नव्हती आणि गाधीवाद, समाजवाद वगैरे आम्हाला नव्याने शिकविण्याचीही खर तर आता जरुरी नाही. प्रश्न आहे तो कुठल्याही तत्त्वाच्या चोख अंमलबजावणीचा! नाही तर कुठल्याही समस्येला पन्नास पर्यायी उत्तरे असतातच. भारतातल्याही समस्येला वेगवेगळी तत्त्वे, वेगवेगळे पर्याय असू शकतात आणि ते सगळे पर्याय सारखेच प्रभावीही असू शकतात, फक्त त्याची अमलबजावणी प्रामाणिकपणे व्हावी; पण हेच नेमके भारतात घडत नाही. आम्हाला नवी तत्त्वे आवडतात. या तत्त्वांचा कीस काढणे आवडते. गाधीवाद, समाजवाद, लोकशाही, सत्याग्रह या नावानी वेळोवेळी टाहो फोडणे आवडते; पण कुठलेच तत्त्व आणि वाद आम्हाला धड पेलवत नाही आणि तसा तो पेलावा अशी इच्छाच प्रामाणिकपणे आम्हाला कधी होत नाही. खरं तर बिचाऱ्या भारतीयाना कुठल्याच तत्त्वप्रणालीचे फारसे सोयरसुतक नाही. अगदी आणीबाणीतदेखील सरकारला जनतेचे कल्याण करता येणे शक्य होते आणि आम्हाला तेही मानवलं असते; पण आणीबाणी देखील आमच्या सरकारला पेलवत नाही. आणीबाणीत अधिकार येताच आमचे सरकार फक्त अत्याचार करते आणि आणीबाणी उठताच युवक कॉंग्रेसचे कार्यकर्ते सत्याग्रह करतात. पतप्रधानाच्या गाडीला घेरावो घालतात त्याच्यावर चपला फेकतात आणि आमचे कर्तव्यदक्ष पोलिस आणीबाणीत सरकारला सामील होऊन अगदी अहमहमिकेने दहशत पसरवतात तर आणीबाणी उठताच नको तेव्हा शातपणा बाळगतात हा सगळा राजकारणाचा खेळ आहे फक्त!

युवक कॉंग्रेसच्या निदर्शनाला आमची हरकत अर्थातच नाही. अगदी त्याने चपला फेकणेही आम्ही समजू शकतो. भाववाढीची समस्या तितकीच गभीर आणि तीव्र आहे हेही आम्ही मान्य करतो फक्त या समस्येबद्दल आपल्याला खरोखरच एवढा जिव्हाळा आहे का, याचा युवक कॉंग्रेसनेत्यानी मनोमन विचार करावा. या प्रश्नाचे खरे उत्तर त्यानी जाहीर करण्याची जरुरी नाही. कारण एक तर आम्हाला ते माहीत आहे आणि दुसरे म्हणजे तेवढे धैर्य युवक कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये असेल असे वाटत नाही!

तेव्हा युवक कॉंग्रेसने अगदी पोटभर निदर्शने करीत राहावे. कार्यक्षम पोलिस त्याच्या मदतीला आहेतच आणि भाववाढ काय तुमच्याआमच्या पाचवीलाच पुजलेली आहे... □

---


**यंदाची महाराष्ट्र शासनाची पारितोषिके लाभलेली**

**दोन ' राजहंस ' प्रकाशने**

# टॉलस्टॉय एक माणूस

**सुमती देवस्थळे**

# श्रीग्रामायन

**श्री. ग. माजगावकर**

**या दोन्ही पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या लवकरच प्रकाशित होत आहेत.**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

## चक्रम्‌चक्री ( २२ )

दीर्घस्मृति विश्वनाथ

# राजकारणाचे नियंत्रण

**श्री.** ना. ग. गोरे यांनी जयप्रकाशांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या चरित्राला एक मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. १९५०–५५ पर्यंत समाजवादी पक्षाच्या जयप्रकाश नारायण आणि अच्युतराव पटवर्धन या वरिष्ठ नेत्यांनी पक्षीय राजकारणाचा त्याग केला. जयप्रकाशांनी भूदानाच्या कार्यासाठी जीवन वाहिल्याची घोषणा केली. पक्षीय राजकारणाचे लक्ष सत्ता हे असते, त्यामुळे त्या राजकारणात अनेक किल्मिषयुक्त गोष्टी कराव्या लागतात, तसेच तशा राजकारणामुळे लोककल्याण साधतेच असेही नाही, असा विचार पक्षीय राजकारण सोडण्यामागे होता.

नानासाहेबांचे म्हणणे असे की, जयप्रकाशांसारख्या थोर नेत्याने पक्षीय संघटना बांधणे, दैनंदिन राजकारणावर लक्ष ठेवणे, लोकशिक्षणातून सत्तारूढ पक्षावर नियंत्रण ठेवणे या गोष्टी सोडल्यामुळे विरोधी पक्ष कमजोर झाले. सत्तारूढ पक्ष बेबंद बनला. राजकारणाची अवनती झाली थोडक्यात, जयप्रकाशांचा राजकारणत्याग ही धोक्याची गोष्ट होती आणि हे आता सर्वांना पटले आहे.

यावर कोणी असे म्हणेल की, जयप्रकाशांसारख्यांनी सत्तालक्षी राजकारण सोडल्याने विरोधी पक्ष दुर्बल झाले हे म्हणणे ठीक आहे; पण त्यामुळे सत्तारूढ पक्ष किंवा एकूण राजकारण नियंत्रणहीन झाले हे म्हणणे बरोबर नाही. कारण, दैनंदिन राजकारणातील तत्त्वहीन तडजोडी, भ्रष्टाचार, बेफाट आरोप यांपासून मुक्त झाल्याने आणि रचनात्मक कार्याला वाहून घेतल्याने जयप्रकाशांची प्रतिमा आणखी उजळली, लोकांतील त्यांचे स्थान अधिक उंचावले आणि त्यामुळे राजसत्तेवर नियंत्रण ठेवणे त्यांना सुलभ झाले. पूर्वी ऋषि-मुनी राजावर नियंत्रण ठेवीत; पण राजकारणात भाग घेत नसत असा दाखला आहेच

हा विचार नानासाहेबांना अजीबात पसंत नाही. राजकारणापासून अलिप्त असणारा आणि तरीही राजसत्तेवर नियंत्रण ठेवणारा यतिवर्ग हे एक स्वप्नरंजन आहे असे नियंत्रण यतिवर्गाने पूर्वीही कधी ठेवले नाही, आजही असे प्रयत्न सफल झालेले नाहीत, असे ते ठासून सांगतात त्यांचे म्हणणे असे की, राजकारण हा लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यापासून आम्ही निराळे राहू असे म्हणणे म्हणजे लोकांपासून निराळे राहू असेच म्हणणे होय दुसरे असे की, हा यतिवर्ग सत्तारूढांवर नियंत्रण कसे ठेवणार? सत्ताधीशांनी हे नियंत्रण मानले नाही तर लोकशक्तीचाच आश्रय घ्यावा लागणार आणि लोकशक्ती आणि राजशक्ती यांचा सामना अखेर राजकारणाच्याच आखाड्यात होणार, निदान व्हायला हवा. तेव्हा राजकारणापासून आम्ही वेगळे राहू आणि आमच्या प्रतिष्ठेचा उपयोग करून सत्ताधीशांवर नियंत्रण ठेवू हे म्हणणे तर्कसंगत नाही. त्याला इतिहासाचा आधार नाही. आणीबाणीच्या अनुभवावरून आपण हे ध्यानात घेतले पाहिजे की, पक्षबांधणी, निवडणुका, सत्ताकारण यांना पर्याय नाही.

गोऱ्यांच्या या विचाराचा अंशत: प्रतिवाद 'तरुण भारत'ने करण्याचा प्रयत्न केला आहे. गोऱ्यांच्या विचारांचा मार्मिकपणा मान्य करून आणि त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेऊन 'तरुण भारत'कार सांगतात की, राजसत्तेवर अंकुश ठेवणारा यतिवर्ग ही भारताची परंपरा आहे. चाणक्य, टिळक, गांधी ही त्याची उदाहरणे होत आणीबाणीचेच उदाहरण घेतले तरी राजकारणापासून अलिप्त असणारी आणि चारित्र्यसंवर्धनाच्या कार्यात गुंतलेली सभासारखी संघटना आणि जयप्रकाशांसारख्या ऋषितुल्य व्यक्ती यांच्यामुळेच बेबंद सत्ताधीश सत्ताच्युत झाले थोडक्यात, राजकारणाबाहेर असलेल्या चारित्र्यसंपन्न व्यक्ती आणीबाणीच्या–कायसिसच्या-काळात सत्तेचे नियमन करू शकतात, हा आपला वारसा आहे.

### आपली परंपरा

आपल्या परंपरेचा आधार घेणे हे काळजी-काट्याने करावयाचे काम आहे. कारण आपली परंपरा नक्की कोणती, त्यात इतिहास किती, दंतकथा किती आणि स्वप्नरंजन किती हे ठरविणे दुरापास्त आहे खुद्द नानासाहेबांनी वसिष्ठ दशरथ, विदुर-दुर्योधन आणि अगदी अलीकडील गांधी-नेहरू पटेल यांची उदाहरणे देऊन तथाकथित यतिवर्ग बेबंद राज्यकर्त्यांना आळा घालू शकत नाही असे म्हटले आहे उलट अशोक आणि हर्षवर्धन यांच्याकडे पाहिले तर असे दिसते की, बौद्ध धर्म-गुरूंचे काही वजन त्यांच्याजवळ होते. कित्येक गोष्टी अशा आहेत की, त्यांचा नक्की अर्थ काय आहे, हे कळत नाही उदाहरणार्थ, नहुषाची गोष्ट घ्या नहुषराजा अतिशय पुण्यवान असल्याने इंद्रपदी पोचला इंद्र झाल्यावर तो उन्मत्त झाला आणि त्याने ऋषींना आपली पालखी खांद्यावर घेण्यास फर्मावले. बिचाऱ्या ऋषींनी नहुषाची पालखी खांद्यावर घेतली त्यानंतर एक ऋषी चालताना अडखळले. तेव्हा नहुषाने त्यांना लाथ मारली त्याबरोबर ऋषी रागावले आणि त्यांनी नहुषाला अजगर होण्याचा शाप देऊन पृथ्वीवर ढकलून दिले आता हे काय ऋषींनी राजसत्तेचे नियंत्रण केले असे म्हणायचे ?

तथापि, यतिवर्गाने किंवा सामर्थ्यसंपन्न व्यक्तीने सत्ताधीशांना ताळ्यावर आणणे ही आपल्या परंपरेतली दृढमूल कल्पना आहे, हे एका अर्थाने खोटे नाही. आपण एकूणच निवृत्तिमार्गी असल्याने ऐहिक व्यवहाराविषयी उदासीन असतो इतकेच नव्हे तर,

लौकिक व्यवहाराचे सात्त्विकरूप जो धर्म त्यापासून व्यवहार हा नेहमीच विचलित होणार असे मानून चालतो कारण, माणसामाणसातील संबंध हे नेहमीच स्वार्थयुक्त, हितसंबंधानी दूषित आणि तामसी वृत्तीनी बरबटलेले असायचे, हे आपले गृहीतकृत्य असते. त्यामुळे धर्माच्या मूलभूत चौकटीपासून भ्रष्ट झालेला लौकिकव्यवहार हा अधिकाधिक बिघडत जातो आणि शेवटी त्यातील विकृती इतकी वाढते की, समाजातील सर्व घटकांना त्याचा उबग येतो. अशा वेळी सामाजिक व्यवहाराची मूळ घडी पुनः बसविण्यासाठी ईश्वर अवतार घेतो, अशी आपली परंपरागत समजूत आहे.

राजकारण हा तर व्यवहाराचा अर्क आहे. तेव्हा व्यवहारातील सर्व गाळ राजकारणात साचणार हे ओघानेच आले. म्हणून मुळात केव्हा तरी आदर्श असलेले राजकारण झपाट्याने नासत जाणार आणि त्यातील विषाचा दाह सर्वांना बाधा पोचवू लागला की, इहलोकापासून अलिप्त असलेला ईश्वर अवतार घेतो, त्याप्रमाणे राजकारणातून अलिप्त असलेला यतिवर्ग राजकारणात उतरून राजकारणाची घडी पुन्हा बसवून देणार ही कल्पना आपल्या परंपरेला जवळची वाटणार यात शंका नाही. यतिवर्गाने केलेले सत्ताधीशाचे नियंत्रण ही कल्पना आणि धर्मसंस्थापनेसाठी अवतरणारे युगपुरुष या दोन्ही कल्पना सारख्याच आहेत. त्यांना इतिहासात कोणताही आधार नाही; पण आपल्या परंपरेचे ते एक लाडके स्वप्न आहे.

या स्वप्नरंजनाचा आणखी एक भाग असा आहे का, या यतिवर्गाने सत्ताधीशाचे कान पिरगळल्यानंतर फार काळ कान धरून ठेवता कामा नये किंवा स्वतःही राजदंड हाती घेता कामा नये. राजकारणाचे रहाटगाडगे तळ गाठण्यासाठी घरंगळतच ठेवले पाहिजे. वळवाच्या पावसासारखे यतिवर्गाने राजकारणात अचानक यावे आणि क्षणभरात निघून जावे. कुसुमाग्रजांच्या कवितेतील नकुल जसा विषमत्त नागाला मारल्यानंतर वाऱ्यासारखा निघून जातो, तसा यतिवर्गही तपोवनात निघून जातो. यालाही इतिहासात काही पुरावा नाही. झारचा वंश नष्ट केल्यानंतर लेनिन स्वतः सत्तेवर आला, नंदाला उखडून टाकल्यावर चाणक्य चंद्रगुप्ताचा महामात्य झाला, पहिला चार्लस परागंदा झाल्यावर क्रॉमवेलने राज्यशकट हाकला. जुलमी सत्ताधीशांना धूळ चारल्यानंतर क्रांतिकारकांनी राजकारण-निवृत्ती स्वीकारली याचे फक्त एकच उदाहरण आहे आणि त्याचे परिणाम भीषण झाले. फ्रान्समधील जुनी सत्ता नाहीशी केल्यानंतर जी घटनासमिती अधिकारावर आली तिने स्वतःवर असे बंधन घालून घेतले की, नव्या घटनेनुसार विधानसभेच्या ज्या निवडणुका होतील त्यांना घटनासमितीचे सभासद उभे राहू शकणार नाहीत. त्याचा परिणाम असा झाला की, नव्या विधानसभेत अननुभवी आणि राजकारणाची ओळख नसलेली माणसे निवडून आली. फ्रान्सच्या इतिहासात जे भयचकित दहशतपर्व झाले ते या अविचारी निवृत्तिमुळेच

## सध्याचा संदर्भ

राजकारणाबाहेरील सत्त्वशील व्यक्तींनी वेळोवेळी राजसत्तेचे नियमन करावे ही गोडस कल्पना भारतीय परंपरेला आकर्षक वाटली, तरी ती इतिहासप्रसिद्ध नाही; कमीत कमी तिची ऐतिहासिकता संशयित आहे, हे आपण पाहिले त्याहून पुढे जाऊन विचार केला तर असे दिसेल की, आधुनिक काळाच्या आणि सामान्य मनुष्याला आपल्या प्रतिष्ठेची जाणीव झाली आहे या वस्तुस्थितीच्या संदर्भात ही कल्पना अधिकच गोंधळाची आणि प्रसंगी धोकादायकही झाली आहे.

ज्या काळात यतिवर्ग होता आणि तो सत्तेवर प्रसंगी अंकुशही चालवीत होता असे मानले जाते त्या काळात यति कोण, राजसत्तेची कर्तव्ये कोणती, त्या कर्तव्यापासून राजसत्ता च्युत झाली आहे की नाही याचा निर्णय कसा करावा या गोष्टी निश्चित ठरलेल्या होत्या. याचे एक कारण असे होते की, याबाबतीतील निकष समाजातील विवक्षित वर्ग ठरवीत होता आणि हितसंघर्षाचा प्रश्न उद्भवत नव्हता. आता तसे नाही. राजसत्तेशी संबंधित अशा प्रत्येक गोष्टीवर समाजातील प्रत्येक व्यक्ती मत ठरवू शकते आणि आपले हे मत ऐकले गेले पाहिजे असा आग्रह धरू शकते. त्यामुळे यति कोण आणि त्यांनी राजाचा कान पकडण्याची वेळ आली आहे की नाही, हे ठरविणे सोपे राहिलेले नाही. विनोबांनी आणीबाणीच्या काळात एक आचार्यकुल गोळा केले होते. त्या आचार्यकुलातील किती व्यक्ती प्राचीन काळातील यतिवर्गात बसू शकतील? किंबहुना असे आचार्यकुल सार्वजनिक चर्चेतून निवडता तरी येईल काय?

सामान्य मनुष्याच्या मताची आणि कर्तृत्वाची प्रतिष्ठा हा आधुनिक राजकारणाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे राजसत्तेशी निगडित अशा प्रश्नाचा उलगडा सार्वजनिक चर्चेतून निर्णयक्षम बहुमत निर्माण करून करावा लागतो. तथाकथित यतिवर्गाच्या प्रतिष्ठेचा आणि ऋषीविषयी असणाऱ्या आदराचा उपयोग असे बहुमत निर्माण करण्यासाठी करता येईल इतकेच, परंतु केवळ जयप्रकाश अगर विनोबा यांनी सांगितल्यामुळे सरकार आपले निर्णय बदलील अगर सरकारने आपले निर्णय बदलावेत हे म्हणणे मान्य होण्यासारखे नाही. विनोबा, जयप्रकाश अगर देवरस यांच्या मताला अशी किंमत तोपर्यंतच आहे की, जोपर्यंत सामान्य मनुष्याला ती मते आपली वाटतात. सामान्य मनुष्याच्या मताची प्रतिष्ठा हा राजकारणाचा मूलाधार न मानता जर आपण तथाकथित यतिवर्गाच्या राजकारणप्रवेशाची प्रतीक्षा करायला लागू तर त्याचा परिणाम नवे ब्राह्मण्य निर्माण होणे एवढाच होईल.

यतिवर्गाच्या कल्पनेचा दुसरा एक दुष्परिणाम असा आहे की, त्यामुळे राजकारण हे कायमच दोषयुक्त, भ्रष्ट आणि गुंडगिरीने भरलेले असते असा समज होतो. याचेच दुसरे अंग असे की राजकारणात भाग न घेणारी सर्वच माणसं सत्त्वशील, सदाचरणी आणि चारित्र्यवान मानली जातात. परिणाम असा होतो की, समाजातील विविध क्षेत्रे राजकारणापासून मुक्त व्हावीत ही घोषणा आकर्षक ठरते. 'शिक्षणात राजकारण नको, उद्योगधंदे राजकारणापासून मुक्त हवेत', 'स्थानिक स्वराज्यसंस्थात राजकारणाची लुडबुड नको' अशा घोषणा आपण वारंवार ऐकतो आणि फारसा विचार न करता पसंतीच्या माना डोलावतो. खरी गोष्ट अशी असते की, त्या त्या क्षेत्रातील दादालोकांना आपले व्यवहार सार्वजनिक चर्चेपासून दूर ठेवायचे असतात, त्यासाठी राजकारणाच्या

नासलेपणाचा गवगवा उपयोगी पडतो.

## आधुनिक राजकारणाचे स्वरूप

सार्वजनिक चळवळीतून आणि चर्चेतून निर्णय घेणे हे आजच्या राजकारणाचे मूळ स्वरूप आहे या चळवळीत आणि चर्चेत प्रत्येक व्यक्ति भाग घेऊ शकते आणि तत्त्वतः तिच्या मताची दखल घेतली गेली पाहिजे. आता कोणत्या प्रश्नावर आपण सार्वजनिक चर्चा करू शकतो? तत्त्वतः कोणत्याही प्रश्नावर; परंतु काही प्रश्न असे असतात की त्याबाबत चर्चेतून निर्णय होण्याजोगा नसतो. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला जडलेला आजार, गणितातल्या एखाद्या प्रमेयाची सिद्धता या बाबतीचा निकाल सार्वजनिक चर्चेने होणार नाही; परंतु चर्चा होऊ शकते.

सार्वजनिक चर्चेचे विषय होणारे प्रश्न बहुधा मनुष्याच्या वर्तनाविषयीचे किंवा संस्थाच्या वर्तनाविषयीचे असतात. कारण याविषयी निश्चित ज्ञान कोणालाच असत नाही. ज्या गोष्टी पूर्णत्वाला पोचल्या आहेत त्यांची चर्चा उद्‌भवत नाही. ज्या गोष्टी अपूर्ण आहेत, ज्याच्याविषयी काहीही घडण्याची शक्यता आहे, ज्यांच्याबद्दलचे आपले ज्ञान अर्धवट आहे, अशा बाबींचा निर्णय सार्वजनिक चर्चेने करावयाचा असतो आणि चर्चेचे विषय हे असे असल्यामुळेच सामान्य माणसालाही त्याबाबत मत व्यक्त करण्याचा अधिकार राहतो.

राजकारणाचे स्वरूप जर असे असेल, तर त्यात यतिवर्ग कोठे बसतो? तो जर राजकारणापासून दूर असेल, तर तो सार्वजनिक जीवनापासून दूर आहे, असे म्हणावे लागेल. अशा स्थितीत राजकारणाच्या पटावर त्याला काहीच स्थान नाही. जर यतिवर्ग सार्वजनिक चळवळीत भाग घेत असेल, तर त्याचे काही वैशिष्ट्य मानावयाचेच असल्यास इतकेच मानावे लागेल की, चर्चाविषयावर त्याचा थोडा अधिकार आहे; परंतु अधिकार असला तरी त्याची इयत्ता अशी नाही की तो चर्चाविषय झालेल्या प्रश्नाचा निवाडा करू शकेल. कारण चर्चा सुरू होतानाच असे मानण्यात आले आहे की, या प्रश्नाचे सर्वांचेच ज्ञान अपुरे आहे. त्याला यतिमार्गाचाही अपवाद नाही.

यावर कोणी म्हणेल की, हे सर्व तत्त्वज्ञान कागदावर ठीक आहे; प्रत्यक्षात तशी स्थिती असत नाही. हितसंबंधी लोकांचे प्रबळ गट असतात. ते सार्वजनिक चर्चेचा निर्णय आपल्याकडून व्हावा यासाठी भ्रष्टाचाराचा अवलंब करतात. आपण बहुमतात आल्यानंतर अल्पमतधारकांना मोडून काढण्याचा ते प्रयत्न करतात. राजकारण दूषित होते ते या अशा गटामुळे. अशा दुष्ट राजकारणापासून, ज्यांत अल्पसंख्याकांवर आर्थिक, शारीरिक अत्याचार होण्याची शक्यता आहे अशा राजकारणापासून समाजाला वाचविण्यासाठी यतिवर्ग हवा की नको? आणीबाणीची—क्रायसिसची—परिस्थिती ती हीच.

## राजकारणाची नीति

आधुनिक राजकारणात हे गृहीतच आहे की, प्रत्येक माणसाचे काही हितसंबंध आहेत आणि ते जपण्याचा त्याला हक्क आहे. त्यामुळे, व्यक्तींना हितसबंध असल्याने राजकारण दूषित होते, हे म्हणणे बरोबर नाही. हितसंबंधी लोक गट करणार, इतर हितसबंधी लोकांशी करारमदार करणार हेही ओघानेच आले त्यालाही सवड आहे. त्यामुळे राजकारण न सते. असे म्हणता येणार नाही. राजकारण नासते ते मुख्यत तीन प्रकारच्या नीति-नियमांचा भंग केल्याने. तसे झाल्यावर मात्र प्रक्षोभक स्थिति निर्माण होते.

हे तीन प्रकारचे नीति-नियम कोणते? प्रा. क्रॅन्स्टन याच्या म्हणण्याप्रमाणे कर्तव्यनिष्ठा, भविष्याची काळजी आणि सार्वजनिक हितासंबंधाची दक्षता. कर्तव्यनिष्ठेचा अर्थ पूर्वी केलेले करार पाळणे; दिलेल्या शब्दाचे पावित्र्य. भविष्याची काळजी म्हणजे आज आपण जे निर्णय घेऊ त्यामुळे तात्कालिक स्वार्थ साधला गेला तरी भविष्यात धोका निर्माण होणार नाही ना याचा विचार. सार्वजनिक हिताविषयीची दक्षता याचा अर्थ चर्चेतील आपले मत माझा स्वार्थ साधणार आहे म्हणून मी असे म्हणतो या भूमिकेवरून न मांडता त्यातून सगळ्यांचेच कल्याण कसे साधले जाणार आहे हे समजावून सांगून मांडणे हा होय. ही तीन्ही तत्त्वे आणीबाणीच्या पूर्वी कशी धाब्यावर बसविली गेली होती याचा विचार उद्‌बोधक ठरेल.

सारांश, राजकारणाला खातेऱ्यातून बाहेर काढणे याचा अर्थ सार्वजनिक जीवनात या तीन मूल्यांची प्रस्थापना करणे हा होय आणि राजकारणाचे नियंत्रण करणे याचा अर्थ सार्वजनिक चळवळीत या तत्त्वाचे भान सतत ठेवणे. हे उघड आहे की, सार्वजनिक जीवन वर उल्लेखिलेल्या तत्त्वापासून च्युत झाल्यावर ते पुन या तत्त्वांवर उभे करणे या क्रियेपेक्षा वरील तत्त्वाचे भान सार्वजनिक जीवनात सतत राहील असा प्रयत्न करणे अधिक शहाणपणाचे आहे. हा प्रयत्न राजकारणापासून अलिप्त असलेला यतिवर्ग कसा करू शकणार? उदाहरण हा उत्कृष्ट धडा असे म्हटले जाते ज्यांना काही हितसंबधच नाहीत, त्यामुळे कोणतेही करार करण्याची पाळीच ज्यावर आलेली नाही असे लोक वचनपालनाचे उदाहरण कोठून घालणार?

दुसरे असे की, राजकारणात वरील तत्त्वाचे भान ठेवा असे सांगण्यासाठी राजकारणापासून मुक्त अशा वर्गाची खरोखर आवश्यकता आहे का? राजकारणात कोण असते, तुम्ही—आम्ही सर्वजण म्हणजे सर्वसामान्य माणसे! आपला सामान्य ' माणसावर, हितसंबंध जपणाऱ्या माणसावर इतका अविश्वास कशासाठी? आणीबाणीचा एक प्रसंग येऊन गेला आणि त्याचे कारण वरील तीन तत्त्वापासून आपण दूर गेलो हे होते हे उघडच आहे; पण त्यातूनच आपण बाहेर पडलो ते काही कोणा यतिवर्गाच्या कृतीमुळे नव्हे!

जयप्रकाश किंवा संघ अशा राजकारणापासून सकृतदर्शनी दूर असणाऱ्या लोकांमुळे सार्वत्रिक निवडणुकीत विरोधी पक्ष एकत्र आले आणि निवडणुका जिंकू शकले, हे खरेच आहे; पण निवडणुका झाल्या त्या काही या तथाकथित यतिवर्गाच्या प्रयत्नामुळे नव्हेत. माजी पतप्रधानांनी निवडणुका क घेतल्या हे त्या स्वत ही सांगू शकत नाहीत; परतु खालील अदाज चुकीचा ठरू नये. गेली दीड-दोनशे वर्षे आपल्याकडे एका विशिष्ट धाटणीने सार्वजनिक जीवन चालत आले आहे. त्या सार्वजनिक जीवनाची एक चटक सर्व लोकाना लागली आहे. त्यामुळे हे सार्वजनिक जीवन आपण फार काळ बद ठेवू शकणार नाही याची जाणीव पतप्रधानांना होती. जेव्हा त्याना असे वाटले की आता सार्वजनिक जीवन पुन. चालू केले तरी त्यांवर आपलाच पगडा राहील तेव्हा त्यानी निवडणुका घेतल्या.

सार्वजनिक जीवनाची समाजाला लागलेली ही चटक हीच सार्वजनिक जीवनाची शाश्वती आहे. तथाकथित यतिवर्गाकडून होणाऱ्या नियंत्रणापेक्षा ही शाश्वती अधिक मोलाची आहे. □

# एका आजारी सरकारी कारखान्याची कहाणी

एक संबंधित

सरकारी मालकीचे उद्योग हे आता आपल्या अर्थव्यवस्थेचे अविभाज्य अगच बनले आहेत. जेथे फार मोठ्या प्रमाणावर भांडवल लागते अशा उद्योगात सरकारने प्रथम पदार्पण केले. अशा उद्योगाची उत्पादनक्षमता पूर्णत्वास पोचून, भांडवलावर नफा मिळण्यास अर्थातच प्रदीर्घ काळ लागतो. त्यामुळे सरकारी कारखान्यांच्या फायद्याकडे अर्थातच विशेष लक्ष दिले गेले नाही. शिवाय आदर्श मालक अशी भूमिका सरकारने बजावण्याचीही नैतिक जबाबदारी या उद्योगावर होतीच. त्यामुळे तोटयात चालणारा व्यवसाय व कामगार कल्याणावरचा वाढता खर्च या कात्रीत हे कारखाने सापडले व बहुतेक सर्व कारखाने त्यामुळे तोटयातच चालत आहेत. ज्या व्यवसायात सरकारची मक्तेदारी आहे तेथे मात्र ते फायद्यात चालतात असे दिसून येते.

पुण्याच्या परिसरात 'हिंदुस्थान अँटिबायोटिक्स' नावाचा पेनिसिलिन व स्ट्रेप्टोमायसिन बनविण्याचा सरकारी कारखाना आहे. एके काळी उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्राविण्य मिळविलेला हा कारखाना गेली ३–४ वर्षे आजारी आहे. या कारखान्यात व्यवसायानिमित्त अनेक वेळा जाण्याचा योग येतो. अनेक कामगारांशी, अधिकाऱ्यांशी बोलण्याचा योग येतो. त्यामुळे या आजाराची कारणमीमांसा करण्याचा विचार आहे. माझ्या मते ही परिस्थिती सर्व सरकारी कारखान्यांची प्रातिनिधिक समजण्यास हरकत नाही.

पेनिसिलिन उत्पादनाचा हा कारखाना सुरू होऊन आता सुमारे २३ वर्षे झाली. सुरुवातीला तंत्रज्ञान परदेशातून आणले, पेनिसिलिनच्या उत्पादनास सुरुवात झाली. दहा वर्षांच्या काळात कंपनीने मक्तेदारी स्वरूपाचा धंदा करून नफा मिळविला. तो नफा पुन्हा उद्योगात गुंतवून 'स्ट्रेप्टोमायसिन' उत्पादनाचा कारखाना सरकारी आर्थिक मदतीशिवाय चालू केला. स्ट्रेप्टोमायसिनचे उत्पादनही परदेशी तंत्रज्ञानाच्या मदतीने चालू केले. अशी ५–६ वर्षे गेली व कंपनीने परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता नवीन औषधउत्पादनाच्या क्षेत्रात पाऊल टाकले. त्यानंतर कंपनीची आर्थिक घसरगुंडी सुरू झाली ती आजतागायत चालूच आहे. या घसरगुंडीची सुरुवात झाली ती 'व्हिटॅमिन सी'च्या उत्पादनाच्या निर्णयापासून.

या कारखान्यात असे महत्त्वाचे निर्णय घेण्यास फार दीर्घकाळ लागतो. कारण मॅनेजिंग डायरेक्टर असे निर्णय संबंधित मंत्रालय व डायरेक्टरबोर्ड यांच्या सल्ल्याने घेतात. व्हिटॅमिन सी बनविण्याची प्रक्रिया एन्. सी. एल् ( नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ) यांची होती. प्लॅटचे डिझाइन कारखान्याच्या इंजिनिअरनी केले. या प्लॅटमध्ये सुमारे दोन कोटी रुपये गुंतविले गेले, परंतु व्हिटॅमिन सी' उत्पादन होईना. एकमेकांना दोष देण्याचा उद्योग गेली सात वर्षे चालू आहे; परंतु १२५ टन उत्पादनक्षमता असलेल्या या कारखान्यात अजून उत्पादन जवळजवळ झालेलेच नाही.

व्हिटॅमिन सीचा कारखाना उभा राहिला व लगेच हेमायसिन हे औषध बनविण्यासाठी प्लॅटची उभारणी केली गेली. 'हेमायसिन' हे कारखान्याच्या संशोधनशाळेने शोधलेले wonder Drug म्हणून त्याची खूप जाहिरात झाली होती. संशोधनशाळेचे प्रमुख आतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ होते. त्यांच्या या शोधाबद्दल संशय घेण्याचे कुणाचेच धाडस नव्हते. त्यामुळे 'हेमायसिन' प्लॅटच्या निर्मितीसाठीही सुमारे दोन कोटी रुपयांचे भांडवल गुंतविले गेले; परंतु प्रत्यक्षात हेमायसिनचे उत्पादन जवळजवळ अजिबात झालेलेच नाही. हे प्लॅट सध्या बंदच आहे.

### पडून राहिलेली यंत्रसामग्री

व्हिटॅमिन सी चे इथले उत्पादन बंद आहे; परंतु खाजगी कारखान्यांच्यामार्फत ते जोरात चालू आहे. व्हिटॅमिन सी आणि हेमायसिन बनविण्याचा निर्णय घेणारे दोन्हीही मॅनेजिंग डायरेक्टर्स सेवानिवृत्त होऊन गेले. आता दोष कुणाला देणार? इथले उत्पादन न होण्यास खाजगी उद्योगपतींचे राजकारण आहे की, कारखान्याचे तंत्रज्ञान निकृष्ट दर्जाचे आहे हे निश्चित ठरविणे जवळजवळ अशक्य आहे.

व्हिटॅमिन सी व हेमायसिन हे दोन प्रयोग फसले व कारखान्याने अँपिसिलिन उत्पादनाची योजना आखली. त्यासाठी 'वाइथ' या परकीय औषधकंपनीशी करार केला. करारप्रमाणे कारखान्यात उत्पन्न झालेल्या अँपिसिलिनपैकी ५० टक्के औषधे 'वाइथ' कंपनीलाच पुरविण्याचे ठरले. म्हणजे प्रक्रिया करून गोळ्या, इंजेक्शने वगैरे करून त्यांनी ते विकायचे. मूळ औषध बनविण्यापेक्षा त्याचा वापर करून तयार केलेली अशी औषधे विकणे हा फार फायद्याचा व्यवसाय असतो. सरकारी कारखान्यांनी हा व्यवसाय 'Formulations' करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा हाथी कमिटीने निर्णय दिल्यानंतर हा करार झाला. हा करार करणाऱ्या मॅनेजिंग डायरेक्टरना सेवानिवृत्तीनंतर त्या वाइथ कंपनीतच नोकरी मिळावी हा नुसता योगायोग मानणे जरा अवघडच आहे; पण आता हे लिहून तरी काय उपयोग म्हणा? त्यांना कारखान्यातील संचालकपद सोडून सुद्धा आता चार वर्षे झाली!

अँपिसिलिन-उत्पादनासाठी लागणारे एक 6 APA नावाचे रासायनिक द्रव्य पिंपरी येथे बनविण्याची योजना आहे; परंतु सध्या तरी

ते बाहेरून आणावे लागते व या खर्चास अग्रक्रमाने पैसे न दिल्यामुळे कच्च्या मालाचा पुरवठा होत नाही. त्यामुळे पाच टन क्षमतेचे लहान प्लँट महिन्यात एखादा आठवडाच चालते. सर्व यंत्रसामुग्री उभारून तयार असलेले ३० टन क्षमतेचे प्लँट चालू केले तर ते एखादा दिवसच चालवून महिनाभर बंद ठेवावे लागेल.

भांडवलाच्या गुंतवणुकीचा गेल्या काही वर्षांत असा खेळखंडोबा चालू असताना, प्रथम स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादनात संकट आले. स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादनासाठी लागणारा काही कच्चा माल परदेशांतून आणण्यास सरकारने बंदी केली व तेव्हापासून स्ट्रेप्टोमायसिनचे उत्पादन झपाट्याने घटू लागले. हा कच्चा माल (Pea Nut Mill) कधी काळी देशातलाच वापरावा लागेल, या दृष्टीने इथल्या संशोधनशाळेने तयारीच केली नव्हती. त्यात भर म्हणून कच्च्या मालाच्या किंमती एकदम झपाट्याने वाढल्या. या अडचणीवर मात करण्यासाठी स्ट्रेप्टोमायसिनच्या किंमती वाढविणे आवश्यक होते; परंतु औषधे महाग न करण्याच्या सरकारी धोरणामुळे, कारखान्याचे नुकसान होतच राहिले. हा महत्त्वाचा मुद्दा सरकारला पटवून देण्यात मॅनेजिंग डायरेक्टर अपयशी ठरले. स्ट्रेप्टोमायसिन व पेनिसिलिन या औषधांच्या उत्पादनास एक प्रकारची विशिष्ट बुरशी उपयोगी पडते, तिला स्ट्रेन असे म्हणतात. परदेशी कंपनीशी स्ट्रेप्टोमायसिन उत्पादनाचा करार केला तेव्हा त्यानी एक विशिष्ट स्ट्रेन दिला होता. कालांतराने या स्ट्रेनची क्षमता कमी होते व पूर्वीच्याच इतका कच्चा माल लागून स्ट्रेप्टोमायसिनचे उत्पादन कमी होऊ लागते. ही विशिष्ट बुरशी वाढविणे, तिचे संगोपन करणे व ती अधिक क्षमतेची बनविणे या कामात संशोधनशाळेस अपयश आले. म्हणून दोन वर्षांपूर्वी ग्लॅक्सो कंपनीशी करार करून स्ट्रेप्टोमायसिनचा नवीन अधिक क्षमतेचा स्ट्रेन फुकट घेण्यात आला. स्ट्रेप्टोमायसिनचे उत्पादन लगेच वाढले; परंतु सध्या पुन्हा ते पूर्वपदावर आले आहे. आता स्ट्रेन नवीनच आहे, तरीही असे का होत आहे याचा पत्ता गेल्या सहा महिन्यात संशोधनशाळेस लागलेला नाही.

पेनिसिलिन उत्पादनातही असेच घडले. त्या विशिष्ट प्रकारच्या (बुरशीची) स्ट्रेनची क्षमता कमी झाली. त्यावर तोडगा म्हणून जपानच्या 'टोयोझोको' नावाच्या कंपनीशी करार केला व नवीन अधिक क्षमतेचा स्ट्रेन त्यानी दिला. त्यासाठी त्याना कित्येक लाख रुपये दिले गेले. अस्तित्वात असलेल्या प्लँटमध्ये आता मोठ्या प्रमाणावर बदल करण्याचा जपानी तज्ज्ञांचा सल्ला आहे. त्याची अमलबजावणी सुरू आहे. म्हणजे जपानी तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष फायदा पदरात पडण्यास आणखी एखादे वर्ष सहज लागेल.

## निकृष्ट व्यवस्थापन

सर्व श्रेयाचे धनी जसे मॅनेजिंग डायरेक्टर असतात, तसे या सर्व परिस्थितीत गेली तीन वर्षे संचालकपदावर असलेले श्री. चारी याना जबाबदार मानले गेले. खरे म्हणजे पेनिसिलिन स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादनात प्रामुख्याने लागणाऱ्या 'Fermentation Technology' बाबत हे तज्ज्ञ आहेत असे मानले जाते; परंतु कारखान्याच्या सध्याच्या परिस्थितीस यानाच ज़बाबदार धरले जात आहे, कारण उत्पादनाशिवाय व्यवस्थापनक्षेत्रातले याचे कर्तृत्व. श्री. चारी हे या कारखान्यातच पूर्वी उत्पादनविभागाचे प्रमुख म्हणून काम केलेले होते. मध्यंतरी इथली नोकरी सोडून ते हृषिकेशच्या सरकारी कारखान्यात गेले होते. सुमारे पाच वर्षांपूर्वी ते पुन्हा पिंपरी येथे वर्कस् मॅनेजर म्हणून आले व या पदावर दोन वर्षे काम केल्यावर त्यांची मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली. या कारखान्याच्या स्थापनेपासून इथली माहिती असलेले व 'Fermentation Technology' मधले तज्ज्ञ असे मॅनेजिंग डायरेक्टर झाल्यामुळे, घसरगुंडीच्या मार्गास लागलेल्या कारखान्याची स्थिती सुधारण्याची एक नवीन आशा निर्माण झाली; परंतु थोड्याच दिवसात त्यांच्याबद्दल सर्वांचाच भ्रमनिरास झाला.

इथल्या बहुतेक सर्व जुन्या अधिकाऱ्याबद्दल त्यांच्या मनात आकस असावा. जुन्या अधिकाऱ्याना काढण्याची जणू त्यानी मोहीमच उघडली. चीफ इंजिनिअर श्री. उपाध्याय यांच्यापासून सुरुवात झाली. त्यांना राजीनामा द्यायला लावला गेला. त्यानंतर जेव्हा संधी मिळेल तेव्हा (मुदतवाढीच्या वेळी वा कुणाला राजीनामा द्यायला लावून) कंपनी-सेक्रेटरी, सुरक्षाअधिकारी, प्रॉडक्शन-सुपरिंटेंडेंट, आणखी एक चीफ इंजिनिअर, क्वालिटी कंट्रोल विभागाचे प्रमुख, फिलिंग-पॅकिंग विभागाचे प्रमुख, प्रॉडक्शनविभागातील आणखी एक कार्यक्षम अधिकारी अशी मालिकाच लागली. अधिकारीवर्गाच्या नैतिक धैर्यावर अर्थातच याचा विपरीत परिणाम झाला. भरीत भर म्हणून अधिकारीवर्गाची पगारवाढीची रास्त मागणी मान्य होऊ नये म्हणून यानी कसोशीने प्रयत्न केले अशी येथील बहुतेक अधिकाऱ्यांची खात्री आहे. एकीकडे हे सत्र चालू असतानाच इथल्या कामगारांच्या उत्पादनक्षमतेचा अभ्यास करण्यासाठी त्यानी 'नॅशनल प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिल'ला पाचारण केले. अपेक्षेप्रमाणेच इथल्या सर्व विभागांत जरुरीपेक्षा अधिक कामगार असल्याचा निर्णय त्यानी दिला. त्याचा रिपोर्ट आल्यानंतर वाढ झालेले फक्त एकच खाते, ते म्हणजे इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग विभाग. तेथे पूर्वी एकच अधिकारी होता. त्याला बढती मिळून आता त्या खात्यात एकाऐवजी चार अधिकारी आहेत. इतर सर्व विभागात भरती बंद झाली; परंतु खेळाना उत्तेजन देण्याच्या सरकारी धोरणाचा भाग म्हणून कुस्तीगीर, कबड्डी, व्हॉलीबॉल, खोखो वगैरे खेळणाराची भरती जोरात चालूच राहिली. या खेळाडूकडून कामाची अपेक्षाच नसते. आर्थिक अडचणीत असलेल्या कारखान्यावर निष्कारणच हा बोजा पडत आहे.

अकार्यक्षम, अधिकाऱ्याना कामावरून दूर करणे, अधिकाऱ्याचे पगार वाढू नयेत यासाठी खटपट करणे, (खेळाडूंशिवाय इतर सर्व) कामगाराची नवीन भरती थांबविणे हे धोरण राबविणारे मॅनेजिंग डायरेक्टरच बढत्या देण्याच्या बाबतीत मात्र अत्यंत विचित्र निर्णय घेतात. जुने अधिकारी गेले, परंतु आजसुद्धा या औषधी कारखान्याच्या मेंटेनन्सविभागात किमान आवश्यक शैक्षणिक पात्रता असणारे अधिकारी शोधावेच लागतील. उत्पादनविभागात असेच वशिल्याने वरिष्ठ अधिकारपदे मिळालेले अधिकारी आहेत. बहुतेक हे सर्व अधिकारी मॅनेजिंग डायरेक्टर याच्या जातीचे/प्रांतातील असल्यामुळे ते एकमेकाना सांभाळून घेतात. वशिल्याने बढती मिळण्याच्या पद्धतीमुळे नालायकांना बढत्या मिळतात व त्याच्यापुढे चमचेगिरी करून वेळ मारून नेणारे कार्यक्षम ठरतात. या अधि-

कान्यांचे अज्ञान उघड करणारे, स्पष्ट बोलणारे कार्यक्षम सहकारी नकोसे होतात त्यामुळे चागले कामगार कामाबद्दल उदासीन होतात व कारखान्याची कार्यक्षमता कमी होण्यास मदतच होते.

### जुजबी इलाज

पेनिसिलिन अगर स्ट्रेप्टोमायसिनचा स्ट्रेन सुधारण्यात चारी याना यश आले नाही, अधिकाऱ्यांतही ते अप्रिय होते. आणीबाणीच्या काळातील कामगारविरोधी धोरणामुळे (उदा. मिसाखाली अटक झालेल्या दोन कामगारांना तडकाफडकी कामावरून दूर करणे, कंपनीच्या कारभाराबद्दल मन्त्र्याच्याकडे तक्रार करणाऱ्या कामगार-संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना कामावरून दूर करण्याचा प्रयत्न करणे) व बढत्यांबाबतच्या उघडउघड जातीय धोरणामुळेही त्यांच्या अप्रियतेत भरच पडली होती. त्यामुळे निवडणुकीनंतर त्याना कामावरून दूर केल्याबद्दल कोणासही वाईट वाटले नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे श्री. चारी मॅनेजिंग डायरेक्टरपदावरून दूर केले गेले असले तरी ते परदेशात (युगांडा, युरोपमधील काही देश) तज्ज्ञ-सल्लागार म्हणून पाठविले गेले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयापर्यंत आणखी आठ महिने (सुमारे) ते सरकारी नोकरीतच राहणार आहेत ते सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांच्या जागी नवीन मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून कोणाचीही नेमणूक होणार नाही असे समजते. सुरुवातीचे तीन महिने दिल्लीहून पेट्रोलियम व केमिकल मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्यास हे पद सांभाळण्यास सागण्यात आले. ते अधिकारी आठवड्यातून तीन दिवस दिल्ली व तीन दिवस पिंपरी असे काम करीत होते. व्यावसायिकदृष्टया जबचणीत असलेल्या कारखान्याच्या दृष्टीने ही योजना उपयोगाची ठरली नाही. कारण या काळात कारखान्यात उत्पादन पुन्हा कमी होऊ लागले. त्यामुळे आता नवीन सुधारित योजना केली आहे. तीनुसार पनवेल येथील 'हिंदुस्तान ऑरगॅनिक केमिकल्स्' या सरकारी कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. *स्वामीनाथन याना, आपले पद सांभाळून पेनिसिलिन* कारखान्याचे व्यवस्थापन करण्यास सांगितले आहे. पूर्वीच्या योजनेत ही अर्थातच थोडीशी सुधारणाच म्हणावी लागेल. कारण दिल्ली ते पिंपरीपेक्षा पनवेल ते पिंपरी हे अंतर थोडे आहे नवीन व्यवस्थापक फार हुशार व धडाडीचे आहेत असे ऐकिवात आहे; परंतु त्यांचीही नेमणूक तीन महिन्यासाठीच आहे. त्यामुळे त्यांच्या गुणाचा फायदा कारखान्यास पूर्णत्वाने मिळेल की नाही याची त्यानाही शंकाच आहे. म्हणून त्यांनी आल्याबरोबर इथल्याच दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मॅनेजिंग डायरेक्टरचे एक पॅनेलच बनविले व सर्व अधिकार त्या दोघात वाटून दिले व काहीही अडचण आल्यास आपल्या संपूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले आहे. या दोन अधिकाऱ्यांपैकी एक जण संशोधनविभागाचे प्रमुख आहेत. त्यांचा कारखान्याच्या इतर विभागाशी आजपर्यंत संबंधच आलेला नाही. दुसरे डेप्युटेशनवर आलेले आर्थिक सल्लागार (Financial Adviser) आहेत. कोणत्याही कारखान्याच्या व्यवस्थापनाचा त्याना अनुभव असल्याबद्दल पुसटशीही शंका कुणालाच नाही. ज्या कारखान्यास पूर्ण वेळ काम करणारा, कामाची पूर्ण माहिती असलेला मॅनेजिंग डायरेक्टर हवा आहे त्याला मॅनेजिंग डायरेक्टराचे पॅनेल देण्यात आले आहे.

पुण्याजवळच्या पेनिसिलिनच्या सरकारी कारखान्याची अशी ही कहाणी. इथले कामगार हा एक स्वतंत्र लेखाचाच विषय होईल. या कामगाराना 'ओव्हरटाइमच्या' भस्मासुराने ग्रासलेले आहे. प्रत्येक कामगार स्वत पुरता विचार करतो. पगाराइतके ओव्हरटाइम मिळवणारे अनेक कामगार या कारखान्यात आहेत. आपल्या ओव्हरटाइममुळे कारखान्याच्या पीछेहाटीस आपण हातभार लावतो याचा त्याना विसर पडतो, याचे आश्चर्य वाटते.

गेल्या काही वर्षांतील या कारखान्याच्या कारभाराचा हा एक धावता आढावाच आहे. सरकारी कारखान्यांच्याबाबत हे चित्र प्रातिनिधिक आहे असे मला वाटते. एकीकडे निव्वळ फायद्याकडे दृष्टी ठेवून चालणारे खाजगी उद्योगधंदे आहेत. कामगारसंघटनांच्या दबावामुळे त्याना कामगारहित पहावेच लागते; परंतु व्यापक समाजिक हिताकडे दुर्लक्ष करून खाजगी उद्योगधंदे अमाप नफा मिळवीत आहेत, ज्याचा फायदा फार थोड्यानाच मिळतो दुसरीकडे सरकारी कारखान्याचा हा कारभार म्हणजे निकृष्ट दर्जाचे व स्वार्थी व्यवस्थापन, उदासीन कामगार, जातीवर वा प्रांतीयतेवर आधारित वशिलेबाजी, महत्त्वाच्या निर्णयाना लागणारा प्रदीर्घ काळ व त्यामुळे चुकीचे अगर स्वार्थासाठी निर्णय घेणाराना असलेली संधी या सर्वांचा परिणाम अकार्यक्षमपणे व तोट्यात चालणारे सरकारी कारखाने असे हे चित्र आहे. सरकारी कारखाने सुरू होऊन तीस वर्षे झाली; परंतु अजून यांच्यासाठी प्रशिक्षित असे व्यवस्थापक (Managerial Cadre) निर्माण करण्याचा विचारही केलेला नाही. उच्च दर्जाचे व्यवस्थापन ही या कारखान्याची खरी जरूर आहे. ती पुरी केली गेली नाही, तर शोषण करणारे खाजगी उद्योग व गलथानपणे तोट्यात चालणारे सरकारी कारखाने यांच्या कात्रीत सापडलेली अर्थव्यवस्था सावरणे कठीण आहे. ☐

## वर्गणीदारांस सूचना

१: अंक न मिळाल्याची तक्रार अंक प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवस वाट पाहून करावी. अंक शिल्लक असल्यास दुसरा दिला किंवा पाठवला जातो.

२: वर्गणी पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना नेहमी वर्गणीदार क्रमांकाचा उल्लेख करावा. अन्यथा पत्रोत्तरास विलंब अपरिहार्य आहे.

३: तीन वर्षांची वर्गणी १००।– रुपये आहे.

४: रु. ३००/–ठेव ठेवल्यास व्याजाचे मोबदल्यात अंक विनामूल्य पाठविला जातो.

'परराष्ट्रीय घडामोडी'

# इस्राएलची धगधगती मध्यपूर्व

चंद्रशेखर पुरंदरे

'सगळ्या जगाची डोकेदुखी' अशा शब्दात या चिमुकल्या विजिगीषु राष्ट्राचे वर्णन मध्यपूर्वेतील देश मधूनमधून करीत असतात. त्यांना मात्र डोकेदुखीहून बराच गंभीर असा हा देशाचा प्रश्न आहे. एका ज्वलंत ध्येयाने भरलेल्या या देशाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकांत विवाद्य व्यक्तिमत्त्वाचा मेनाहेम बेगीन त्रेसष्टाव्या वर्षी पंतप्रधान झाला. त्याच वेळी मध्यपूर्वेतील शान्ततेची शक्यता संपली अशा निर्णयाप्रत मेनाहेम बेगीनची राजकीय पार्श्वभूमी माहीत असणारे आले न् हातपाय गाळून बसले.

बेगीनने मात्र गेल्या आठवड्यापर्यंत फारशी गडबड केली नाही. २५ जुलैला, मंगळवारी बेगीनसाहेबांनी पहिला धक्का दिला. वेस्ट बँक या इस्राएल जॉर्डनच्या विवाद्य भागातील तीन वसाहतींना त्याने मान्यता दिली आणि परत एकदा इस्राएल प्रकाशझोतात आले. आदल्याच दिवशी बेगीन आपली कार्टरभेट आटोपून इस्राएलला आला होता. कार्टर–बेगीन चर्चेमध्ये प्रामुख्याने मध्यपूर्वेतील शातता हाच विषय होता. त्यामध्ये कार्टरने ज्यूंच्या–अरबांच्या अशा वसाहतींना, ज्या वेस्ट बँकवरच विशेषेकरून आहेत, त्यांना इस्राएलने मजुरी देऊ नये असा प्रस्ताव केला होता. किमान येत्या ऑक्टोबरमध्ये जिनिव्हामध्ये होणाऱ्या या सर्व राष्ट्रांच्या परिषदेपर्यंत तरी अरबांना मानहानिकारक होईल अशी कोणतीही कृती न करण्याचा सल्ला दिलेला होता.

बेगीनने धूर्तपणाने मला माझ्या मंत्रिमंडळापुढे हा प्रस्ताव ठेवल्याखेरीज काहीच मतप्रदर्शन करता येणार नाही किंवा वचन देता येणार नाही असे स्पष्ट केले होते. त्यामुळे तो कोणत्याही शब्दात अडकला नव्हता. या बेकायदेशीर वसाहतींना कायदेशीर म्हणून मान्यता दिल्याने जॉर्डनच्या सार्वभौमत्वाला धोका पोचतो अशी भावना असल्याने त्याबाबतीत जिनिव्हा परिषदेपर्यंत इस्राएल हालचाल करणार नाही अशी कार्टरची समजूत झाली होती; कार्टरने या बोलण्याच्या वेळी, जर इस्राएलने ही अट पाळली तर अरब देशांना परिषदेला तयार करून दीर्घकालीन शांततेचा तोडगा काढण्याची हमी घेतली होती; पण दुसऱ्याच दिवशी ही चपराक बसल्याने अमेरिका फारच अडचणीत सापडली. कारण अमेरिकाचा परराष्ट्रव्यवहार–सेक्रेटरी सायरस व्हान्स हा दोनच दिवसांनी इजिप्त व मध्यपूर्वेच्या भेटीवर निघणार होता.

या भेटीचे बरेच नगारे आधीपासून वाजविण्यात आले आहेत. कार्टरची प्रतिमा उजळ असल्याने खऱ्याखुऱ्या आशेने अरब राष्ट्रे या भेटीकडे पहात आहेत. त्यामुळे मंगळवारी हा निर्णय बेगीनने जाहीर करताच, मंगळवारीच अमेरिकेने त्याचा तीव्र निषेध जाहीर केला. इस्राएलची विश्वासार्हता ही इतकी चंचल आणि अनिश्चित गोष्ट असेल याची कार्टरला अपेक्षाच नव्हती. आपणही व्यक्तिशः या निषेधात सामील आहोत असे त्याने जाहीर केले. इजिप्तला खूष करण्यासाठी सुमारे दोनशे दशलक्ष डॉलर्सची लष्करी साहित्याची मदत देण्याची घोषणाही तेवढ्यात करण्यात आली. 'सादातने रशियाशी संबंध तोडल्यामुळे त्याला शक्य ती सर्व मदत करणे हे आमचे कर्तव्यच आहे' असे अमेरिकन प्रवक्ता म्हणाला. व्हान्सच्या भेटीला इतके महत्त्व देण्यात आले की तो येणार त्याच्या आदल्या दिवशी इजिप्तच्या तीन प्रमुख दैनिकांत कार्टरचा फोटो आणि त्याने केलेला इस्राएलचा धिक्कार मोठ्या टाइपामध्ये छापून आला.

अमेरिकन निषेधाच्या दुसऱ्याच दिवशी मेनाहेम बेगीनने पार्लमेंटमध्ये अडीच तासांचे दणदणीत भाषण दिले. बेगीनच्या नेहमीच्या भाषणातली भावनोत्कटता त्यात नव्हती. त्याने अमेरिकेचे आरोप खोडून काढले आणि वर ताण म्हणून जॉर्डनचा जुदेआ आणि समेरिया या प्रांतावर आज काहीही अधिकार नाही असे जाहीर करून आणखीच बहार उडवून दिली.

आधीच इस्राएलने पॅलेस्टिनिअन लिबरेशन ऑर्गनायझेशन (PLO) या संस्थेने जर जिनिव्हाला भाग घेतला, तर आपण त्यावर बहिष्कार टाकू–असे जाहीर केले आहे. सायरस व्हान्सचे स्वागत करण्याच्या भरात अल् अहराम आणि अल् अखबार ही वृत्तपत्रे एवढी वाहवली, की अल् अखबारने कार्टर कधीच न बोललेले वाक्य त्याच्या तोंडून आल्याची खुसखुशीत बातमी दिली. 'PLOने जिनिव्हाला भाग घेतलाच पाहिजे' असे कार्टर म्हटल्याचे अल् अखबारने छापले. वस्तुतः कार्टर असे कधी म्हणालाच नव्हता. अल् अहरामने आता अमेरिकेनेही इस्राएलचा निषेध केला म्हणजे चक्र पूर्ण झाले असून संपूर्ण जगातर्फेच इस्राएलच्या भोंदूगिरीची छीःथू झाल्याचे म्हटले आहे.

प्रत्यक्षात इस्राएलमध्ये मात्र काय घडले हे पाहणे आवश्यक आहे 'गुश एमुम्म' ही एक जहाल संघटना आहे. 'श्रद्धावंतांची संघटना' असा त्याचा शब्दशः अर्थ. यानी बराच काळपर्यंत या तीन वसाहतींना मान्यता देण्याची मागणी करीत आणलेली आहे. अलेन् मोरेह, ओफा आणि माले अदुमिन या त्या तीन वसाहती होत. त्यापैकी पहिल्या दोन या संघटनेच्याच आहेत आणि त्या राबिनच्या सरकारच्या कारकीर्दीतच अस्तित्वात आलेल्या आहेत. या 'गुश एमुम्म'च्या प्रवक्त्याला बेगीन अमेरिकेहून परत येईपर्यंत दम धरायला सांगण्यात आले होते. त्याने बेगीन आल्या आल्या या तीन सोडाच, एकूण बारा वसाहतींना ताबडतोब मान्यता देण्याची मागणी केली. स्वतः बेगीन या 'गुश एमुम्म'बद्दल सहानुभूती बाळगून आहे; पण ज्या बारा वसाहतींना मान्यता देण्याची मागणी करण्यात आली, त्या नेब्लास, जॉर्डननदीचे खोरे आणि जेरिको या सध्या जॉर्डन आणि इस्राएलमधील संघर्षाचे ऐन कारण असलेल्या विभागातच येतात. त्यांना मान्यता देणे म्हणजे युद्धाला

लगेच उभे राहणे आणि अमेरिकेशी मैत्री संपविणे आहे परंतु बेगीन ज्या जोरावर निवडून आला आहे, ते लक्षात घेता, त्याला मागण्या सरळ फेटाळून लावणे अशक्यच होते. त्यामुळे 'तिनावरच सुटल' या आनंदात त्याने आणि त्याच्या मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला.

त्याचे समर्थन त्यानी वेस्ट बँक हा युद्धात व्यापलेला प्रदेश नसून 'मुक्त' प्रदेश आहे असे केले या प्रदेशात सात लाख अरब आहेत. त्याच्यापैकी एकालाही निर्वासित करण्यात आलेले नाही. त्यामुळे जिनिव्हा-कराराच्या त्रेचाळिसाव्या कलमाचेही उल्लंघन झालेले नाही हेही बेगीनने पार्लमेंट-मध्ये भाषण करताना निदर्शनास आणून दिले.

या साऱ्या आरोपप्रत्यारोपाला आता इस्राएल–अमेरिका याच्यातच बेबनाव असल्याची चिन्हे दिसू लागल्याने अकस्मात वेगळीच धार चढली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाची सरचिटणीस कुर्त वाल्डहाइमनेही जिनिव्हा परिषदेची शक्यता अशक्यतेकडेच झुकणारी असल्याचे परवाच बोलून दाखविले आहे. इस्राएलचा PLO विषयीचा आग्रही दृष्टिकोन (PLO ला बाहेर ठेवावे हा) हे त्याचे प्रमुख कारण आहे. अमेरिका आणि इस्राएलच्या मैत्रीचा उदोउदो न करता परिषदेला किंवा बोलण्याना जाणारा मेनाहेम बेगीन हा पहिलाच इस्राएली पंतप्रधान आहे. त्यामुळे कार्टर किंवा तो स्वत हे बऱ्याच प्रमाणात पूर्वग्रहविरहित भाग घेऊ शकतील असा अदाज आहे. जिनिव्हा-परिषद झालीच नाही, तर इजिप्त, सिरिया, जॉर्डन याच्याबरोबर आलटूनपालटून चर्चा करण्याची इस्राएलने तयारी दाखविली आहे. सायरस व्हान्सच्या भेटीने इस्राएल–अरबसंबंधामध्ये गुणात्मक फरक घडून येईल अशी जी शक्यता होती ती मात्र इस्राएलच्या वसाहतीना मान्यता देण्याच्या निर्णयाने संपुष्टात येऊन औपचारिकतेतच भेटीचा शेवट होणार असे दिसू लागलेले आहे. त्यात बेगीनने PLO चे वर्णन 'नाझीहून वाईट' असे केल्याने मध्यपूर्व धगधगीतच राहणार असे दिसत आहे.

# तुर्कस्तान

## फसलेली लोकशाही

युरोप आणि आशिया यांच्या मधला मोक्याचा देश म्हणून तुर्कस्तानचे जागतिक राजकारणात एक वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. आजच्या संधिकालात जेव्हा जागतिक शक्तिकेंद्राची सापेक्ष स्थाने परस्परावलबित्वाने बदलत आहेत तेव्हा आणि रशिया व अमेरिका यांना काही वर्षांपूर्वी असणारे निर्णायक स्वरूपाचे स्थान आज तेवढे ताकदीचे राहिलेले नाही अशा परिस्थितीत नव्या राष्ट्राचा उदय होणे स्वाभाविक आहे. हा उदय आणि शक्तिकेंद्रे नाहीत तरी स्वावलंबी बनण्याची धडपड, लोकशाही मार्गाने करणे किती जड जाते याचेही तुर्कस्तान हे एक उदाहरण ठरू शकेल.

१९५० साली तुर्कस्तान नाटो [ NATO North Atalantic Treaty Organization ] मध्ये सामील झाला. तेव्हापासून तुर्कस्तान हे युरोपातील इतर राष्ट्राच्या दृष्टीने संपूर्ण वेगळे असणारे राष्ट्र युरोपकडेच झुकणारे किंवा पश्चिमवादी [ prowest ] गणले जाऊ लागले. वस्तुत तुर्कस्तान आणि इतर युरोपीय राष्ट्रामध्ये सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक असे भेद इतके आहेत, की तेच आता अडसर होऊ पहात आहेत ज्या वेळी तुर्कस्तान NATO मध्ये सामील झाला, त्या वेळी सोविएत रशियाचे धोरण विस्तारवादी होते. आपली उत्तरसीमा रशियाच्या दक्षिणसीमेला भिडवून असणाऱ्या तुर्कस्थानला त्या वेळी युरोपातील राष्ट्रानीही अव्हेरले नाही.

पण आता राजकीय भूगोल बदलला. रशियाही कडवेपणाने अलिप्त राहिला नाही हे एक आणि पश्चिमेने गेल्या काही वर्षांत निराशा केली हे दुसरे. अशा कारणांमुळे काही प्रमाणात भ्रमनिरास होऊन तुर्कस्तान सहधर्मीय अशा मुस्लिम देशाकडे वळण्याच्या बेतात आहे.

युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी [EEC] ही युरोपीय राष्ट्राची एक महत्त्वाची संघटन आहे. युरोपीय देशातील आर्थिक समतोल बिघडू नये यासाठी या संघटनेची बांधणी करण्यात आली. या संघटनेकडे तुर्कस्तानने परवाच्या त्याच्या बैठकीपुढे चार प्रमुख मागण्या केल्या होत्या. युरोपीय देशामध्ये तुर्कस्तानच्या कामगाराना मुक्त हालचाल करता यावी ही पहिली मागणी होती. सध्या अस्तित्वात असणारी बंधने सैल करावीत अशी ही मागणी EEC कडून फेटाळली गेली. दुसरी मागणी EEC च्या सभासदराष्ट्रांनी अधिक प्रमाणात तुर्कस्तानचा माल आयात करावा अशी होती ती थोडासा तुकडा भुकेल्यापुढे फेकावा अशा औदार्याने अगदीच अल्प वाढ करण्यात येऊन टाळली गेली. तिसरी मागणी अधिक प्रत्यक्ष मदतीची याचना करणारी आणि चौथी या युरोपीय देशाचा कमी माल आयात करण्याची मुभा देण्याविषयी होती.

अपमानास्पदरीत्या या मागण्यांची वासलात करण्यात आली तरी तुर्क सरकारला त्या निमूटपणे स्वीकृत कराव्या लागल्या. कारण दुसरा पर्यायच पुढे नव्हता; पण यामुळे राष्ट्रीय स्वाभिमानाला मात्र जरूर धक्का पोचला. तुर्कस्तानचा प्रधानमंत्री सॅम्युएल देमिरेल हा आहे. त्याची स्वत ची जस्टिस पार्टी, तुर्केस या दुसऱ्या नेत्याची नॅशनल ॲक्टिव्ह पार्टी आणि नेकमेतिन एर्बाकन याची इस्लामिक नॅशनल सॅल्व्हेशन पार्टी या तिघाचे मिळून सध्याचे सरकार अस्तित्वात आहे. त्यामुळे आपल्या जनतापक्षासारख्याच अंतर्गत मारामाऱ्या आणि फुटण्याची भीती त्या सरकारवर टांगती आहे. जस्टिस पार्टीला पार्लमेंटमध्ये जूनमध्ये झालेल्या निवडणुकामध्ये १९९ जागा मिळाल्या. तुर्केसच्या नॅशनल ॲक्टिव्ह पार्टीला १६ जागा मिळाल्या तर एर्बाकनच्या इस्लामिक पार्टीला २३ च जागा मिळाल्या; पण मंत्रिमडळाचे खातेवाटप करताना मात्र, जास्तीत जास्त जागा मिळूनही जस्टिस पार्टीला १६ खाती, तुर्केसच्या पक्षाला ५ खाती आणि एर्बाकनच्या पक्षाला ८ खाती द्यावी लागली. या सर्व प्रपंचामुळे सरकार मात्र अस्थिर झाले आहे. या एर्बाकनचे म्हणणे EEC शी असलेले सगळे संबंध तोडून टाकावेत, किमान हळूहळू कमी तरी करावेत असे आहे आणि त्याला पाठिंबाही बऱ्यापैकी आहे.

तुर्कस्तानमधील दुसरा प्रमुख राजकारणी

म्हणजे बुलेन्त एसेवित. हा रिपब्लिकन पीपल्सपार्टीचा नेता आहे. निवडणुकीआधी तोच भावी पंतप्रधान होणार असा अंदाज होता; पण तुर्क जनतेने परत एकदा अपरिणामकारक अशा सरकारच्या बाजूने कौल दिला आणि देमिरेलसाहेब सत्तारूढ झाले. परवाच पार्लमेंटमध्ये निसटत्या बहुमताद्वारे सरकार शाबूत राहिले त्यात परत आपल्याकडच्या राज्यसभेसारखे विरोधी पक्षाला त्याच्या सिनेटमध्ये बहुमत. त्यामुळे कोणताही निर्णय तात्त्विक बाबतीतच अडकून पडतो. लोकशाहीने खरोखर प्रगती होऊ शकते का, असाच प्रश्न आता येऊन ठेपलेला आहे. त्यात १९७१ च्या १२ मार्चला याच देमिरेलच्या सरकारला मिलिटरीने पदच्युत केले होते. त्यामुळे तीही मिलिटरी राजवटीची चव देशाने घेतलेली आहे. विद्यार्थ्यांची चळवळ आणि बिघडलेली आर्थिक परिस्थिती सांभाळण्यास हे लोकनियुक्त सरकार असमर्थ ठरले आहे.

### तुर्कस्तान–ग्रीस–सायप्रससंबंध

तुर्कस्तानची अंतर्गत परिस्थिती अशी बिकट आहे. त्यात भर म्हणून ग्रीस–तुर्कस्तानचा सायप्रसवरून प्राचीन संघर्ष आहे. ग्रीस हा देश तुर्कस्तानच्या पश्चिमेला आहे आणि दोन्ही देशांना जवळ भूमध्य समुद्रात सायप्रस हे बेट आहे. या बेटावर १९७४मध्ये तुर्कस्तानने आक्रमण केले होते. सायप्रसमध्ये सायप्रिअट (मूळ सायप्रसचे), ग्रीक सायप्रिअट आणि टर्किश सायप्रिअट असे भिन्न वंशीय लोक आहेत. टर्किश सायप्रिअटस्वर इतर दोन वंशीयांकडून मोठ्या प्रमाणावर अत्याचार होत असल्याची तुर्कस्तानची खात्री झाल्यावरच त्यांनी आक्रमण केले असे त्याचे या आक्रमणाचे समर्थन आहे; पण युरोपियन कमिटी ऑफ ह्युमन राइटस् या संस्थेने या आक्रमणाबद्दल तुर्कस्तानवर चौफेर हल्ला चढविल्याने तुर्कस्तान नाराज आहे. दुसरे आणि भावनिक कारण असे की, प्रत्येक बाबतीत ग्रीस आणि तुर्कस्तानचे वाकडे आले की युरोपियन राष्ट्रे ग्रीसला प्रथम दोषी धरीत नाहीत ग्रीसची संस्कृतीच आज जी काही शिल्लक असेल तेवढी का होईना पण युरोपीय देशात नांदत असल्याने एक प्रकारच्या आदराच्या भावनेने ग्रीसकडे पाहिले जाते. त्यामुळे तुर्कस्तानवर अन्याय होतो असे तुर्कस्तानचे म्हणणे.

EEC ने ज्या सवलती ग्रीसला दिल्या, नेमक्या त्याच तुर्कस्तानला नाकारल्या. त्यामुळे आगीत तेल ओतल्यासारखे झालेले आहे.

तुर्कस्तानला ग्रीसबद्दल आणखी चीड येण्याचे कारण म्हणजे अमेरिकेने नाटोन्वये तुर्कस्तानला जी शस्त्रे देणे आवश्यक होते तीच नाकारली. अमेरिकन कॉंग्रेसमध्ये जी ग्रीक लॅबी आहे, तिनेच दडपणाने हा बनाव घडवून आणला असणार अशी तुर्कस्तानची खात्री आहे. शिवाय या अकस्मात शस्त्रकपातीमुळे देशाच्या सुरक्षिततेलाच जबर धोका पोचला आहे. कारण आजवर तुर्कस्तान फक्त अमेरिकेवरच याबाबतीत अवलंबून होता. ग्रीस व तुर्कस्तान यांच्यामध्ये असणारा एजियन समुद्र हेही कहलाचे एक कारण आहे. या समुद्रात संचार करण्याचा आपला हक्क आहे अशी तुर्कस्तानची भूमिका आहे. त्याला ग्रीसचा विरोध आहे. सायप्रसच्या अंतर्गत कारभारात या दोन्ही राष्ट्रांनी व्यवस्थित ढवळाढवळ करून घेतलेली आहे; पण तुर्कस्तान झुरिशच्या कराराकडे बोट दाखवून समर्थन करीत आलेला आहे.

एर्बाकन या उपरिनिर्दिष्ट नेत्याच्या मते ग्रीसला कोणतेही प्रादेशिक फायदे देण्यात अर्थ नाही. कारण कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडेच राहणार.

आज या देशाचा आढावा घेण्याचे प्रमुख कारण म्हणजे सायप्रसचा अध्यक्ष आर्चबिशप मकॅरिओस याचे ३ ऑगस्टला निधन झाले हा माणूस जितका लोकमान्य होता, तितका सायप्रसमध्ये दुसरा नेता नाही. त्याने प्रचंड पाठिंब्यावर १९७४ च्या आक्रमणासारख्या अनेक संकटातून सायप्रस वाचविला. सायप्रसमध्येच ग्रीसमध्ये सामील व्हावे या मतप्रवाहाचा ग्रीकसायप्रिअट हा गट आहे. त्याचा प्रभाव भावी राजकारणावर किती पडतो हेही लक्षणीय आहे. कारण टर्किश सायप्रिअटस्नी फुटण्याची धमकी दिलीच आहे.

तुर्कस्तान मुस्लिम राष्ट्रांच्याकडे अधिकाधिक झुकत आहे. याचे निदर्शक म्हणजे १९७५ च्या जेद्दा येथे झालेल्या मुस्लिम राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या संमेलनाला तुर्कस्तानला प्रथमच संपूर्ण सभासदांचा दर्जा देण्यात आला आणि १९७६ चे असे संमेलन तर तुर्कस्तानने आपल्याच देशात भरविले. या साऱ्याचा युरोपवर आणि मध्यपूर्वेवर निश्चित व दूरगामी परिणाम तुर्कस्तानच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे होणार हे निश्चित. त्याचप्रमाणे लोकशाहीची किती किंमत, पैशात आणि काळात, तुर्कस्तानला द्यावी लागते हेही पाहण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे सायप्रसचे भिन्न वंशीय अभिन्नत्व किती काळ टिकते हेही परिस्थितीनुरूप आकारास येणाऱ्या नेतृत्वावर अवलंबून आहे

□

---

### दैवी विचित्रा गति :

'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं. देवो न जानाति कुतो मनुष्य.' असं म्हणतात. आता स्त्रीच्या चरित्राविषयी मी बापडा काय लिहिणार ? (म्हणजे काय काय लिहिणार ?) पुरुषाचं भाग्य ही मात्र अफलातूनच गोष्ट आहे. केव्हा कुणावर नशिबाची खैर होईल हे अतर्क्यच !

आता हेच पहा ना, जर्मनीचा एके काळचा सर्वसत्ताधीश ॲडॉल्फ हिटलर, त्याच्याबद्दल आपल्या मनात एक सॉफ्ट कॉर्नर असतो. साधारणतः शत्रूचा शत्रू तो आपला मित्र म्हणूनही हे प्रेम वाटत असावे; पण काळाचा महिमा असा की ज्या जर्मनीसाठी त्याने (जर्मनीसकट) सर्वस्वाचा होम केला, तियंच त्याचा उल्लेख सामान्य माणूस परवापरवापर्यंत टाळीत होता.

पण परिस्थिती पहाता पहाता बदलली. हिटलरवेड्च निर्माण झाली म्हणा ना. त्याच्या काळातले स्टॅम्प्स, त्याच्या काळातल्या वस्तू, त्याच्या काळातली खेळणी, पुस्तके या साऱ्याची एकदम प्रचंड मागणी आज होऊ लागली. एका कंपनीने हिटलरची टेप केलेली भाषणे बाजारात आणली आणि पहाता पहाता लोकांच्या त्यावर प्रचंड उड्या पडल्या.

एक काळ असा होता की साधे भारतीयाच्या गळ्यात स्वस्तिक दिसले तरी लोक संशयाने पहायचे तिथे हिटलरचा उल्लेख दूरच आणि याचीच प्रतिक्रिया म्हणून की

काय, आज एकदम दुसऱ्या टकावरची परिस्थिती. याचे कारण काय तर तरुण पिढी! दुसऱ्या महायुद्धानंतर जी पिढी जन्माला आली त्याना मुद्दामच या साऱ्याविषयी अज्ञानात ठेवलं गेलं. त्यात केवळ आधीची पिढी सांगते म्हणून त्यावर विश्वास ठेवायला ते तयार नाहीत. जे काही या पिढीला हिटलरबद्दल माहिती आहे, ते म्हणजे त्याचे जग हादरविणारे अन् दहशत बसविणारे व्यक्तिमत्त्व.

आज ही लाट एवढी उत्तुंग आहे की धंदेवाइकानी त्यात हात धुऊन न घेतला तरच नवल! हिटलरच्या जीवनावर फ्राकफुर्टच्या एका दैनिकाच्या संपादकाने सिनेमा काढला आहे. (एक संपादक सिनेमा काढतो हीही बातमी सनसनाटी नाही काय) सिनेमाचे नाव Hitler–A career. हा सिनेमा सध्या अफाट चालतो आहे. या सिनेमात प्रामुख्याने हिटलरच्या नेतृत्वापर्यंत पोचण्याच्या घडाडीचेच चित्रण करण्यात आलेले आहे. त्याने हालअपेष्टात काढलेले जीवन, सुरुवातीचा त्याचा बुजरेपणा आणि पहाता पहाता त्याने घेतलेली गरुडझेप–पण हेतुतः किंवा अहेतुतः नाझी राजवटीचे अत्याचार, कॉन्सन्ट्रेशन कॅम्प्स (त्याच्याबद्दल फक्त एक उल्लेख जाता जाता आहे) या साऱ्याना बगल देण्यात आलेली आहे. त्यामुळे या तरुण पिढीच्या मनावर ठसतो तो राष्ट्रप्रेमी, जिद्दी हिटलर! त्याचे कृष्णव्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर येतच नाही. इतर युरोपीय राष्ट्रांचा प्रमुख आक्षेप हाच की ज्या पिढीला हिटलरची शास्त्रीय माहिती होणे आवश्यक, त्याना अशी माहिती होणे वस्तुस्थितीला सोडून आहे. परत सिनेमा आहेही मोठा. अडीच तासाचा हा सिनेमा सध्या पश्चिम जर्मनीत धुमाकूळ घालीत आहे.

इव्हा ब्राउन ही हिटलरची प्रेयसी. ती मृत्युसमयी त्याच्याजवळ होती. तिचा एक चित्रपटही दाखविण्यात येत होता. त्याच्या प्रेक्षकाचा जेव्हा सर्व्हे घेतला, तेव्हाही बहुसंख्य पस्तिशीच्या आतलेच आढळले.

आणखी एक दैनिक जर्मनीत असे आहे जे उजवे समजले जाते. ते आजतागायत हिटलरचा उदो उदो करीत आलेले आहे. नाझींचे अत्याचार, ज्यूंचे वंशहनन, स्वतंत्र राष्ट्रांवरची महत्त्वाकांक्षी आक्रमणे या साऱ्या इतिहासाकडे एखादा वसंत साठ्याच्या अभिनिवेशाने कानाडोळा करून ते गुणगान चालूच ठेवीत आहे.

त्याचाही वाढविण्याच्या मार्गावर असणारा खप या पुरुषोत्तमच्या अकल्पित भाग्योदयाचे परिमाण दर्शविणारा नाही काय? □

[गार्डियनवरून]


१५ ऑगस्टला प्रकाशित झाले.

चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किंमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

[टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील ग्राहकांनी वरील पुस्तक व 'आर् डॉक्युमेंट' ही कादंबरी कार्यालयातून घेऊन जावी.]

## पुस्तके

# हरिभाऊंच्या कादंबरीतंत्राचे विश्लेषण

हरि नारायण आपटे हे मराठीतले एक जेष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक म्हणून विख्यात आहेत. त्यानी साहित्याच्या विविध प्रकारात मोठी कामगिरी केली असली तरीही 'कादबरीकार' म्हणून त्यांना सर्वमान्यता मिळाली आहे.

आजवरच्या अनेक अभ्यासकानी हरिभाऊंच्या वाङमयाचे विविध दृष्टिकोनातून परीक्षण आणि विवेचन ग्रथरूपाने आणि स्फुट लेखनाने केले असले तरीही अभ्यासकाची तृप्तता झाली नाही एवढे मौलिक साहित्यधन त्यानी निर्मिले आहे, पण त्यांच्या कादबऱ्यांच्या कलात्मकतेचा व्हावा तसा विचार झाला नसल्यामुळे प्रा. कृ. रा. सावत यानी प्रस्तुत ग्रथात त्यासबंधीचे विश्लेपण केले आहे. या प्रबधाला मुबई विद्यापीठाने पी. एच.डी. मान्यता पदवी दिलेली आहे.

### हरिभाऊंचा कालखंड

१९ व्या शतकाचा उत्तरार्ध आणि विसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा हरिभाऊंच्या लेखनकर्तृत्वाचा कालखंड आहे. या काळात जीवनाच्या विविध क्षेत्रात म्हणजे राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन वैचारिक जागृती आणि सुधारणा घडू पाहात होत्या. केशवसुत, देवल, कोल्हटकर याचे लेखनही याच काळात होत होते. हरिभाऊंचे प्रारंभीचे लेखन 'पुणे वैभव' 'निबंधचद्रिका, 'मनोरजन' आणि 'करमणूक' या विविध मासिक–साप्ताहिकातून क्रमश चालत होते. त्यानी १८८५ ते १९१५ या तीस वर्षांच्या काळात दहा सामाजिक आणि अकरा ऐतिहासिक अशा एकवीस कादबऱ्या लिहिल्या. त्यातल्या दहा अपूर्ण असून चौदा प्रदीर्घ स्वरूपाच्या आहेत. त्यांच्या कादबऱ्यांची प्रेरणा, क्रमविकास आणि स्वरूप यासबधी लेखकाने सविस्तर विवेचन केले आहे.

### प्रेरणा व कलास्वरूप

हरिभाऊनी पाश्चात्य कथाकादंबऱ्याचा डोळसपणाने अभ्यास केलेला होता. त्यानी सामाजिक वास्तववादी कादबरी लिहिताना फील्डिग, थॅकरे आणि डिकन्स; त्याचप्रमाणे ऐतिहासिक कादंबरी लिहिताना स्कॉट व ड्युमा याचे अधानुकरण न करता आदर्श ठेवले होते. कारण आपण ज्या समाजासाठी लिहितो त्याची अभिरुची आणि जीवनस्वरूप याची त्याना जाण होती.

हरिभाऊ हे केवळ कलावादी, केवळ आनंदवादी विचाराचे नव्हते तर कलानिर्मितीत जीवनदर्शन आणि प्रबोधन यावरही त्याचा भर असे. म्हणून कलावादी किंवा बोधवादी–प्रचारकी–अशी कोणत्याही अतिरेकी टीकेची भूमिका न घेता त्यानी प्रथमपासून समन्वयवादी भूमिका स्पष्ट केली आहे. विशेपत. आपल्या–विदग्ध वाङ्मयावरील भाषणात' त्यानी कलेच्या मूलभूत निकषाविषयी, कलेच्या स्वरूपाविषयी आणि कलेचा उत्कर्प, कलेचा वाचकावर होणारा परिणाम यासबंधी सविस्तर विचार माडले आहेत. साराश जीवनदर्शन, उद्बोधन आणि आनदनिर्मिती हे त्याच्या वाङमयाचे हेतू आहेत. पहिल्या दोन हेतूमुळे त्याना आपले सामाजिक उद्दिष्ट साधता आले आणि तिसऱ्या हेतूमुळे कादंबरीचे कलाविषयक उद्दिष्ट साधले असे म्हणता येईल. म्हणूनच हरिभाऊ जितके वास्तववादी तितकेच स्वच्छदवादी होते. त्यांना ललितवाङमयाचे सामर्थ्य आणि त्याचा सुधारणेकरिता होणारा उपयोग हे जरी मान्य होते तरीही कलेला कोणत्याही विषयाचे वावडे नाही आणि कला स्वत.चे नियम करते त्या नियमाचे पालन करण्यातच तिचा उत्कर्ष आहे, असा काहीसा आधुनिक विचारही ते माडतात. हरिभाऊनी आपल्या वाङ्मययज्ञाचे रहस्य सागताना कादबरी ही एक कला आहे याचे भान त्यांनी ठेविले आहे आणि हा धागा पकडून लेखकाने त्याच्या कादबऱ्याचे परिशीलन केले आहे.

### कलात्मकतेचा मागोवा

हरिभाऊनी आपल्या कादबरीलेखनाबरोबरच नव्या कलात्मक कादबरीविषयी अनेक ठिकाणी आपले विचार साधार माडले आहेत. कथानकाच्या सदर्भात कालैक्य साधण्यासाठी घटनाची विभागणी, माडणी, पात्रे आणि प्रसंगाच्या वर्णनाची मर्यादा, कथानकाच्या रचनात्मक सौदर्याची जाणीव, व्यक्तिचित्रणात त्याच्या अतरंगाच्या घडामोडीची सूक्ष्म माहिती, स्वभावचित्रणाच्या परिपोषासाठी भोवतालच्या परिस्थितीचे महत्त्व, व्यक्तीच्या बाह्य आणि अतरगाचे दर्शन, स्वभावातील गुतागुत, कथानकातली उत्कठा, मुग्धता यासबधी जागरूकतेने त्यानी केलेले लेखन हा त्याच्या कलात्मक जाणिवेचा पुरावाच होय. तसेच आपल्या कादबरीलेखनातील कच्चे दुवे, पाल्हाळ, पुनरुक्ति, विषयातर इत्यादि दोषाचीही त्याना जाणीव असल्याचे दिसते. म्हणूनच साहित्यिक म्हणून हरिभाऊ जसे जीवनाचे भाष्यकार आहेत तसेच ते स्वत च्या साहित्याचे मर्मज्ञ टीकाकारही आहेत.

ऐतिहासिक कादबरीच्या स्वरूपाविषयी हा इतिहास नव्हे, ऐतिहासिक कादबरी आहे, सत्य आणि सत्याभास याचे मिश्रण आहे, ती इतिहास–चित्राकृती आहे असे ते सूचित करतात. हरिभाऊंच्या वाङमयीन कलात्मकतेचा मागोवा घेताना लेखकाने प्रकरणशः त्याच्या कादबऱ्याचे कथाविपय, कथारचना, स्वभावचित्रण, निवेदनपद्धती यासबधी साधार, सविस्तर सशोधन करून उपसहारात हरिभाऊच्या ठायी असणारा वास्तवद्रष्टेपणा, कलात्मकेची जाण, कालचित्रण, व्यक्ति व प्रसगनिर्मिती, लवचिक निवेदनपद्धती यासबधीचे निष्कर्प काढून आजवर काहीशा दुर्लक्षित झालेल्या हरिभाऊंच्या कलात्मक कादबरीतत्राचे दर्शन वाचकाना, अभ्यासकाना घडविले आहे म्हणूनच हा ग्रथ उपयुक्त ठरावा.

हरिभाऊ हे सिद्धहस्त लेखक होते. मराठी मनात त्याचे स्थान अढळ आहे म्हणून त्यांना

मराठीवाचक 'हरिभाऊ' या घरगुती व जिव्हाळ्याच्या नात्याने मानतो.

—प्रा. ग. भां. जोशी

ह. ना. आपटे यांचे कादंबरी-तंत्र
लेखक प्रा. कृ. रा. सावंत
प्रकाशक मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४
पृष्ठसंख्या . १६४
प्रथमावृत्ती : जानेवारी १९७७
किंमत . १५ रुपये

# श्री. शं. ग. दाते सूचिमंडळ

## मराठी नियतकालिकांची सूची

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची 'श्री. शं. ग. दाते सूचिमंडळ' ही शाखा गेली बारा वर्षे पुण्यामध्ये कार्य करीत आहे. या शाखेतर्फे 'मराठी नियतकालिकांची सूचि' या संदर्भग्रंथाच्या चौथ्या भागाचे प्रकाशन या महिन्यामध्येच होत आहे. दाते सूचिमंडळाच्या कार्यक्षमतेचे हा संदर्भग्रंथ म्हणजे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

कै. शंकर गणेश दाते हे 'मराठी ग्रंथसूचि' या प्रसिद्ध ग्रंथाचे निर्माते. त्यांनीच या ग्रंथानंतर इ. स. १८०० ते १९५० या दीडशे वर्षांच्या कालखंडातील मराठी नियतकालिकांची सूचि तयार करण्याचे ठरविले. त्या दृष्टीने प्रत्येक नियतकालिकाच्या विविध अंगांच्या शक्य तितक्या तपशीलवार माहितीने युक्त असे सुमारे एक हजार तक्ते व निवडक मासिकांतील अभ्यासपूर्ण लेखांची बावीस-तेवीस हजार सूचिपत्रेही कै. दाते यांनी तयार केली होती; परंतु दुर्दैवाने हे संकल्पित कार्य त्यांच्या हातून पुरे होऊ शकले नाही. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने या कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन कै. दाते यांचे अपुरे राहिलेले कार्य पूर्ण करण्याचे ठरविले. दि. १ ऑगस्ट १९६५ रोजी पुण्यात 'श्री. शं. ग. दाते सूचिमंडळ' या स्वतंत्र संशोधनशाखेची स्थापना करून कै. दाते यांच्या वास्तूतच 'मराठी नियतकालिकांची सूचि : १८०० ते १९५०' या ग्रंथाच्या निर्मितीचे काम सुरू झाले.

या ग्रंथाचा पहिला खंड १९६९ साली प्रसिद्ध झाला. या खंडामध्ये पाक्षिकापासून वार्षिकापर्यंतच्या सुमारे १४०० नियतकालिकांचा जीवनेतिहास दिलेला आहे. १९७४ साली दुसऱ्या खंडाचा पहिला भाग प्रसिद्ध करण्यात आला त्यानंतर १९७५ व १९७६ साली आणखी एकेक भाग प्रकाशित झाला आणि आता १९७७ साली चौथा भाग प्रकाशित होत आहे. हे चारही भाग प्रत्येकी सुमारे ९०० पानांचे आहेत. पुढील वर्षी या दुसऱ्या खंडाचाच पाचवा भाग पुरा होऊन संकल्पित ग्रंथ पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

मराठी भाषेतील विविध विषयांच्या नियतकालिकांतील ज्ञानसाधनेचा मौल्यवान संदर्भग्रंथ म्हणून अभ्यासकांना व संशोधकांना या ग्रंथाचा फार उपयोग होईल. दुसऱ्या खंडाचे चारही भाग लेख-लेखक कोशासाठी उपयोगात आणले आहेत, तर पाचव्या भागात लेखक-नाम-निर्देशी विविध विषयांतील लेखांची पुरवणी व इतर वाङ्मयेतिहासोपयोगी अंगोपांगांची उपलब्ध माहिती पुरविणारी परिशिष्टे यांचा समावेश आहे. यामुळे नियतकालिकांमधील अल्पजीवी ठरणाऱ्या साहित्याला चिरंजीवित्व प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे प्राच्यविद्या, तत्त्वज्ञान, फलज्योतिष, मानसशास्त्र, तर्कशास्त्र, वित्तव्यवस्था, बँक-व्यवहार, लोकवाङ्मय, स्त्री-जीवन, प्राणिसंवर्धन, गृहविज्ञान अशा विविध विषयांवर या दीडशे वर्षांच्या कालावधीमध्ये कशा तऱ्हेने चिंतन झाले आहे याचाही अंदाज घेता येणे शक्य झाले आहे.

केवळ सूचिग्रंथ निर्माण करण्यानेच अभ्यासकांचा प्रश्न सुटणार नाही याची जाणीव ठेवून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय ही संस्था ग्रंथोल्लेखित आवश्यक ते कालिकवाङ्मय संग्रहित करण्याच्या बाबतीत प्रयत्नशील आहे. तसेच दुर्लभ किंवा जुन्या काळातील साहित्य सूक्ष्मचित्रणाद्वारे (मायक्रोफिल्म) आधुनिक शास्त्रीय साधनांच्या साहाय्याने संग्रहालयाच्या संदर्भविभागात उपलब्ध करून देण्याची संस्थेची योजना आहे.

नियतकालिकांमधील साहित्याचे महत्त्व ओळखून त्यांची इतक्या बारकाईने नोंद घेणारा हा मराठी भाषेतील एक मौल्यवान ग्रंथ ठरावा. अशा तऱ्हेचा ग्रंथ निर्माण होण्यासाठी लागणारी जिद्द, कष्ट आणि चिकाटी ग्रंथाच्या रचनेवरूनच लक्षात येते. या सूचिग्रंथामध्ये दीडशे वर्षांचा काल विचारात घेऊन या दीडशे वर्षांत वेळोवेळी निर्माण झालेल्या नियतकालिकांची काळजीपूर्वक दखल घेतलेली आहे म्हणजे ज्या नियतकालिकांची नावेदेखील आज काळाच्या उदरात गडप झाली असती, त्या नियतकालिकांमध्ये कोणकोणते विषय हाताळले गेले होते, याचीदेखील माहिती या सूचिग्रंथामुळे मराठी भाषेच्या अभ्यासकांना होऊ शकणार आहे त्याचबरोबर मराठी नियतकालिकांचा गेल्या दीडशे वर्षांतील इतिहासपटही वाचकांसमोर कळत न कळत उलगडला जाणार आहे. त्या दृष्टीने हे इतके महत्त्वाचे काम प्रसिद्धीच्या झोताची तिरीपही लागू न देता करणारे संपादक श्री. शं. ना. बर्वे, श्री दि. वि. काळे आणि त्यांचे सहकारी यांचे मराठी भाषेच्या अभ्यासकांवर फार मोठे ऋण आहे □

## साभार पोच

१ मानसी
मालिका कवितासंग्रह
श्री. वसंत बापट
मौज प्रकाशन, मुंबई
कि. ५ रु

२. मुरली : काव्यसंग्रह
सौ पद्मावती जावळे
प्रशान्त प्रकाशन, अमळनेर
किंमत ६ रुपये.

३ केसर . काव्यसंग्रह
सुशील
क्रांति प्रकाशन, जळगाव
किंमत ९ रुपये

४. धावान्त आणि सुप्रमेयमधल्या मधल्यामधल्या कविता
तुळसी परब
साग्र प्रकाशन, मुंबई

५. तो स्वप्नपक्षी
श्री. श्रीकांत हलदुले
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई
किंमत : ५ रुपये.

# आमचे ग्रंथालय

## A Man Called Intrepid

By William Stevenson
(Sphere Books
Pages 511, Rs. 20)

'ए मॅन कॉल्ड इट्रेपिड' या पुस्तकात ब्रिटिश सिक्युरिटी को-ऑर्डिनेशनची पहिल्यांदाच संपूर्ण माहिती दिली आहे गेल्या तीस वर्षांपासून दुसऱ्या महायुद्धाच्या बऱ्याच गोष्टी दडपून ठेवल्या होत्या याआधी माणूसमध्ये Enigma Code विषयीची थोडी माहिती विंटरबॉथमच्या Ultra Secret या पुस्तकात मी दिली होती. या पुस्तकातसुद्धा जर्मन एनिग्मा कोड कसा फोडला याची माहिती आहे. त्याशिवाय हेड्रिचचा खून, नाझी v1 and v2 रॉकेट साइटचा नायनाट, फ्रेंच किनाऱ्यावर हल्ले चढवून नॉर्मंडीमध्ये सैन्य कसे घुसविले, बिसमार्कला बुडविण्यासाठी ब्रिटिश व अमेरिकन लोकानी कसे सहकार्य केले ते व हेराकरवी नाझीचा रशियावरचा हल्ला कसा पुढे ढकलला याची माहिती आहे.

दुसऱ्या विश्वयुद्धात एका ब्रिटिश हेराने ज्योतिषाची भूमिका वठविली होती. बऱ्याच वर्तमानपत्रात तो 'Hitler illfated, Hitler's Star Setting, Hitler is Certain to Loose' अशा प्रकारचे मथळे देई. ही भविष्ये चागल्या वर्तमानपत्रातून येत असत व त्यामुळे हिटलर व त्याचे लोक थोडे तरी खचले असतील. कारण जो ज्योतिष, भविष्य वगैरे गोष्टी मानीत नाही तो सुद्धा हळूच साप्ताहिकात आपल्या राशीचे भविष्य बघून टाकतो! .

कॅम्प इथे राइनहार्ड हेड्रिचचा खून करण्याचा कट केला गेला. या राइनहार्ड हेड्रिचला 'प्रागचा कसाब' असे लोक म्हणत असत. राइनहार्ड हेड्रिचच्या सवयी फार बारकाव्याने अवलोकन करण्यात आल्या. हेड्रिचचा खून केला तर नाझी लोक उसळतील. तरी सुद्धा सर्व बाजूनी विचार करून तसा निर्णय घेतला गेला. बऱ्याच लोकाना असे वाटत होते की, हिटलरने हेड्रिचला त्याचा वारस म्हणून निवडून ठेवला होता. हेड्रिचचा खून करण्यासाठी झॅक सीक्रेट रेझिस्टन्स सैन्याचे स्वयंसेवक आणले गेले होते. रस्त्याच्या एका शार्प वळणावर हेड्रिचचा खून करायचा असे या स्वयसेवकानी ठरविले होते.

जर्मन हेर निरोप पोचविण्यासाठी साध्या पत्राचा उपयोग करीत असत त्यात मायक्रोडोट मेसेजेस असत. एका मोठ्या पानाचा मजकूर अगदी बारीक करून त्यात ठेवलेला असे. सुप्रसिद्ध वैज्ञानिक नाइल्स बॉर याला त्याच्या सुटकेससाठी याच प्रकारचा 'मायक्रोडोट मेसेज' किल्ल्यामध्ये लपवून पाठविण्यात आला होता.

एरिक बॅली या ब्रिटिश इसमाने हेराच्या तिहेरी भूमिका उत्तम वठविल्या. तो एकदा तिबेटी झाला होता, दुसऱ्यादा ताश्कदमध्ये रशियन झाला व आणखी एकदा उझबेकी झाला होता. या एरिक बेलीचे तीन फोटो या पुस्तकात दिले आहेत. एखाद्या नाटकातल्या उत्तम नटाने जशा भूमिका बदलाव्या तितक्याच कौशल्याने तो हेर बनत असे.

विल्यम स्टीफन्सला 'मॅन कॉल्ड इन्ट्रेपीड' म्हणत असत. युद्धात त्याचा एकही फोटो घेण्यात आला नव्हता. या पुस्तकात न्यूयॉर्क-' मध्ये १९५४ साली घेतलेला फोटो आहे. सुप्रसिद्ध कादबरीकार व जेम्स बॉन्डचा जनक इआन फ्लेमिंग हा युद्धात ब्रिटिश नेव्हल इंटेलिजन्सच्या अधिकाऱ्याचा सहकारी होता. त्याने 'इट्रेपिड'बरोबर बरेच महत्त्वाचे काम केले होते व खुद्द इट्रेपिडने त्याला बऱ्याच वेळा मार्गदर्शन केले होते. जेम्स बॉडने पुढे ज्या कादबऱ्या लिहिल्या त्या 'इट्रेपिडच्या' बऱ्याच योजनावर आधारित आहेत म्हणूनच त्या कादबऱ्या इतक्या यशस्वी झाल्या आहेत.

जर्मन एनिग्मा मशीन टाइपरायटरसारखे वाटत असे त्याच्यामध्ये बरेच कोड व्हील्स असत. त्याना रॉटर्स म्हटले जात असे. त्याचे प्रत्येकाचे वायरिंग वेगळ्या रीतीने


### New Titles Received

1. My Country And My Rulers : V B. Kulkarni — Rs 40/-
2. The Eden Express : (Bestseller the author of lays bare candidly his schizophrenic experience)-Mark Vonnegut — Rs. 18 90
3. The Last Testament of Lucky Luciano : Martin A Gosch & Richard Hammer — Rs. 18 90
4. The Mind of Morarji Desai : (The P M talks frankly on a variety of subjects)-Basant Chatterji — Rs. 6 50
5. The Dain Curse : (First class criminal novel)-Dashiell Hammett — Rs. 9 60
6. Airport' 77 : (Bestseller-A top-class novel similar to Airport)-Michael Scheff — Rs. 15/-
7. Roots : (Bestseller-Traces the ancestry of a Negro family)-Alex Haley — Rs. 14·55
8. Sex And The High Command : (Bestseller-What happens when a woman is in charge ? )-John Boyd — Rs. 24·55

- नॉन मेंबर्सकरिता डेली बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतील.
- दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून इतर लायब्ऱ्याइतक्याच वर्गणीत उत्तमोत्तम इग्रजी व मराठी पुस्तके वाचा.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

केलेले असे. जर्मनांना असे वाटे की आपल्या या मशिनचा कोड कुणालाही फोडता येणार नाही. जर्मन फॅक्टरीत काम करणारा एक पॉल १९३८ मध्ये मित्रराष्ट्रांकडे फितूर झाला व त्याने एनिग्माची माहिती alied forces ना दिली. त्याशिवाय एक अमेरिकन बाई एलिथाबेथ थॉर्प (तिचे कोड नाव सिथिया असे होते.) हिनेसुद्धा पोलंडमध्ये एनिग्माचे रहस्य शोधण्याचे प्रयत्न केले होते. पोलंडमध्ये ती ब्रिटिशहेर म्हणून वावरत असे. ही बाई भलतीच खंबीर होती हुशारही होती सुंदर होती. तिचे हे तिन्ही गुण तिने योग्य रीतीने वापरले व ती बरीच यशस्वी झाली. या सिथियाने बराच प्रवास केला केला होता. तिला 'युरोपियन मानसशास्त्राची' माहिती होती. तिला सांगितलेल्या कामात ती नेहमीपेक्षा जास्त धोका पत्करीत असे. तिच्या खर्चाइतके पैसे जेमतेम तिला मिळत असत; पण अमेरिका आणि ब्रिटनसाठी तिने इतके केले होते की त्याचे मूल्य पैशाने करता यायचे नाही. त्या वेळेला तिचे टोपणनाव सिथिया आहे हे फक्त तिघांनाच माहीत होते. त्या वेळी असे म्हटले जात होते की, तिला वश करण्यासाठी फक्त उत्कृष्ट जेवण व उत्तमोत्तम मद्य लागत असे. यानंतर तिला उत्तमोत्तम बौद्धिक चर्चा लागत असे. (No philosophy on an empty stomach!) हे सर्व सोपस्कार झाल्यानंतरच ती प्रेम करायला सिद्ध होत असे; पण एकदा का ती प्रेम करू लागली की भरपूर परतफेड करीत असे. ती पुरुषांवर प्रेम करून त्यांना धुंद करीत असे. त्या धुंदीमुळे कैक पुरुष तिला युद्धाच्या गुप्त गोष्टी सांगून टाकीत. एकदा तर अॅडमिरल अलबर्टो लेक्ष हा तिच्या सौंदर्याला अगदी सहजरीत्या बळी पडला. सिथिया एकदा तिच्या मृदु आवाजात बोलायला लागली की जणू ऐकणाऱ्या पुरुषाला संमोहनविद्या होत असे. थोड्या दिवसांनी या अलबर्टो लेक्षनी तिला सांगून टाकले की त्याच्याकडे एक संपूर्ण इटालियन नौदलाचा 'सायफर' (cipher) होता. त्यावर ती लेक्षला म्हणाली की, 'अमेरिकन नौदलात तिचे बरेच मित्र होते व या सायफरचा चांगल्या तऱ्हेने उपयोग करता येईल. आपण या सायफरच्या 'मायक्रॉफिल्म्स' काढून घेऊ. त्यावद्दल सबंध अमेरिकन नौदल तुझे ऋणी राहील!' या शेवटच्या वाक्याने लेक्ष मारावून गेला. त्याने सिथियाच्या ओल्या द्राक्षासारख्या डोळ्यात पाहिले व ते सायफर्स तिला देऊन टाकले. वास्तविक अल्बर्ट लेक्ष हा एक अनुभवी व मुरलेला अधिकारी होता. एक देशभक्त म्हणून त्याची ख्याती होती; पण बिचारा सिथियाच्या सौंदर्याला बळी पडलाच! याच सायफर्सच्या साह्याने ब्रिटिश नौदलाने भूमध्य समुद्रात इटालियन नौदलावर मात केली!

या 'धीट' माणसाची (A Man Called Intrepid) सत्ता व संघटना FBI सारख्या प्रचंड संघटनेशी झुंज देत होती. FBI चा एडगर हुवर हा एक अत्यंत आत्मलंपट मनुष्य होता. FBI सुरुवातीला अगदीच लहान होते; पण हुवरने त्याला सध्याचे प्रचंड स्वरूप प्राप्त करून दिले. एकदा मी असे वाचले होते की, या जगात जे जे काही प्रचंड किंवा आकाशाला गवसणी घालण्यासारखे साधले आहे ते आत्मलंपटपणामुळे किंवा अहंभावामुळे साधले गेले आहे.

. किम् फिल्बीच्या 'My Silent War' या ग्रंथातील उतारा प्रस्तुत पुस्तकात दिला आहे. किम् फिल्बी लिहितो, 'एडगर हुवरने जेव्हा FBI ची सूत्रे हातात घेतली तेव्हा तो फक्त २९ वर्षांचा होता. हुवरने FBI ला राजकारण व सिव्हिल सर्व्हिसपासून अलिप्त केले. पंचवीस वर्षांत हुवरने FBI ला संस्थेचे स्वरूप प्राप्त करून दिले. या कारणामुळे वर्तमानपत्रात FBI विषयी फारशी टीका येत नाही. हुवर हा आधी एका वाचनालयात कारकुनाचे काम करीत असे.

एकूण पुस्तक बरेच वाचनीय आहे. या विषयात ज्यांना रस आहे ते वाचक हे पुस्तक कादंबरीसारखे आवडीने वाचतील.'

— जे. एन. पोंडा

— फिनिक्स लायब्ररी





आपल्या लहानग्याला डेन-टॉनिक वेळीच दिल्याने दात येते वेळी होणाऱ्या त्रासापासून त्याला आराम मिळेल व दात सुलभतेने येतील. मुलांना आनंदी ठेवा. सुदृढ बनवा. डेन-टॉनिक द्या.

होमिओचे
डेन-टॉनिक


होमिओ लॅबोरेटरीज्
राममोहन हायस्कूल शेजारी, गिरगांव, मुंबई-४

Expressco

# एक देश, एक जनता

## एकत्र काम करण्याचा आनंद





### उद्योग-व्यवसायात एकत्र

रमणलाल मेहताने वीस वर्षांपूर्वी बंगलोर येथें हा बटनाचा लहान कारखाना सुरू केला. आतां तो बराच मोठा झाला आहे. आता अधिक नफा होत आहे आणि अधिक स्त्री पुरुषांना तेथे काम मिळाले आहे.

कारण, तेथे सर्वजण खेळीमेळीनें काम करतात रमणलाल तसा गुजराती. पण तो आतां कानडी शिकला आहे. त्याचा व्यवस्थापक, फोरमन्, सुपरवायझर आणि इतर कर्मचारी आपल्या घरीं निरनिराळ्या भाषां बोलतात. पण कारखान्यात मात्र ते सर्व एकच भाषा बोलतात, ती म्हणजे कामाची भाषा. उद्योग व्यवसायात कोण-तेहि प्रतिबंध नसतात.

davp 77/50

प्रतिबंधाच्या कल्पना आळशी लोकांच्या मनात जन्म घेतात > **त्यांना दूर करण्यास मदत करा.**

# तो नरपशू....

**अशोक प्रभाकर डांगे**

एका माणसाचा मी खून करणार आहे.
त्याचं नाव–गाव मला माहित नाही.
त्याचा कोणताच ठावठिकाणा मला ठाऊक नाही.
तो काळा की गोरा तेही मी कधी पाहिलेलं नाही;
पण मी त्याला शोधून काढीन
आणि ठारही मारीन !

माझं नाव चार्ल्स, चार्ल्स थेम्पसन्.
व्यवसायानं मी एक लेखक आहे
माझ्या अनेक कादबऱ्या 'बेस्ट सेलर' लीस्टवर आहेत.
मी प्रतिभावान आहे असंही म्हटल जातं;
पण मी नेहमी टोपणनावानंच लिहितो.
पॅरिसजवळच्या एका खेड्यात राहातो.
माझी पत्नी नुकतीच वारली. अगदी अकालीच;
पण मी एकटा नाही.
मायकेल, माझा मुलगा तो नऊ वर्षाचाच आहे.
स्वाभाविकच माझं त्याच्यावर अपरंपार प्रेम आहे.
मायकेलच माझं सर्वस्व आहे.

तीन जानेवारी.
सकाळचीच वेळ.
मायकेल समुद्रावरून येत होता.
तसा तो एकटाच खेळून आपला जीव रमवतो.
येवढ्यात ती गाडी काळासारखी चालून आली.
मायकेल तिच्याखाली आला.
माझं सर्वस्वच क्षणार्धात चिरडून गेलं !
गाडी भरधाव पळाली.
मला कुणी तरी येऊन सांगितलं. मी धावलो.
मी टाहो फोडला. मायकेलचा छिन्नविछिन्न देह माझ्या हाती आला.
पशू ! मायकेलला चिरडणारा नरपशू ! !

मी त्या नरपशूला ठार मारणार आहे.
मग तो कुठेही असो आणि कसाही असो.
मी हळूच त्याच्याजवळ जाऊन पोहोचणार आहे.
मी त्याच्याशी दोस्ती करणार आहे आणि
त्याचा विश्वासही मिळविणार आहे.
आणि मग–, मगच
त्याला लायक अशीच शिक्षाही देणार आहे
मी त्याला ठार मारणार आहे !

गेले तीन आठवडे मी दूर गेलो होतो. सर्वांपासून दूर !
पण आज मी एकाकी काळोखात बसलोय.
माझ्या समोरचा पडदा उजळलाय
आणि त्यावर दिसतायत असंख्य सतेज चित्र
अगदी कालच्या स्वप्न सारखी.
त्यात माझी पत्नी आहे. मायकेलपण आहे
त्याचे खेळ आहेत वागडण आहे. आवडत अस्वल आहे.
मी त्या स्वप्नील स्वप्नात गुंगलोय.
तेवढ्यात दार वाजतय, पोलीस घरी आलेयत
गाडीचा तपास लागत नाही. ड्रायव्हरचाही नाही.
अख्ख्या इलाख्यात वर्दी दिलीय,
पण तो सापडत नाही.
शोध जारी आहे
आता मीच तर्क लढवतोय.
मायकेल रस्त्याच्या डाव्या बाजूला पडला होता.
हो ते रक्ताचं थारोळ आणि
पोलिसाच्या खडून रेखलेल्या आकृती
म्हणजे तो गाडीच्या डाव्या चाकाखालीच आला असणार.
आणि मग जोरात ब्रेक मारल्यावर
आधीच भरधाव गाडी, बॉनेटची डावी बाजू नक्कीच मोडली असणार.
पोलीस म्हणतायत,
ही तपासाची नेहमीचीच पद्धत झाली !
आम्ही तोही शोध घेतलाय. गॅरेज धुंडाळलेत,
पण डावी साईड मोडलेली गाडी मिळत नाही.
म्हणजे मग ड्रायव्हर हुशार असावा, निदान माहितगार तरी.
त्यानं लगेच गाडी दुरुस्त केली असणार.
येवढ्या झटकन स्पेअरपार्ट मिळवणारा म्हणजे
म्हणजे तो नक्कीच एखादा गॅरेजमालकच असणार.
माझे विचार धावतायत. मी पोलिसाना एवढच म्हणालो,
ठीक आहे. तुमचा शोध चालू द्यात. मीही काही तरी बघतो.
पोलिस म्हणतायत. 'म्हणजे ?'
मी काहीच बोललो नाही.

मी त्या नरपशूला शोधून काढणार आहे.

मी माझा पण मुळीच विसरलेलो नाही.
माझा तपास सुरू. एक गॅरेज दुसरं, तिसर.
एक मालक. दुसरा, तिसरा.
आता परमेश्वर देखील माझ्यासाठी काहीच करू शकत नाही.
आता माझ्यामागे उभा रहाणार आहे माझाच निर्धार
आणि मला हवा आहे एक योगायोग

आज मी असाच सैरभैर हिंडतोय. पाऊस कोसळतोय.
ह्यावेळच्या एका वायपर्शननं गाडी काढतोय.
गाडी चिखलात फसलीय. मी हताश.
जवळपास कुणी नाही. एक ट्रॅक्टर आणि खुरटं जंगल.
मी जोरजोरात हॉर्न देतो.
एक म्हातारा कुठनं तरी येतोय.
तो म्हणतोय. हे नेहमीचच झालंय आता.
आतापर्यंत तीन गाड्या रुतल्या. तुम्ही चौथे !
माझं दुर्लक्ष; पण तो बडबडतोयच
परवा असीच एक गाडी अडकून बसली.
कधी बरं, तीन जानेवारीला असेल ! ह्या इथेच !
एक बाई आणि बाबा. बाई मात्र मात्र होती हं
आणि गाडीची डावीच साईड चेपली होती.
तीन जानेवारी ! मी चरकलो. कान टवकारले.
छान मस्तान्ग गाडी होती बघ ! बाई मस्त होती,
पण बाबा मात्र बेकार ! सारखा तिला रागवत होता;
ती पण चागलीच घाबरली होती. म्हणजे
नुकतेच कुठे तरी घडकून आले असणार !
नाव काय म्हणालात तिच ?
नाव–बिव आठवत नाही; पण ती नाटकात काम करते.
कशाला माझ्या मुलालाच विचारूयात.
त्याला सिनेमा–बिनिमाची आवड आहे बघा.
तुम्ही घरीच चला ना. अगदी जवळ आहे.
पावसात गारठून गेलायत. थोडी वाइन घेऊ यात
मग मी तुमची गाडी माझ्या ट्रॅक्टरनं काढून देतो.
मी म्हाताऱ्याच्या घरी. पोरगा जागेवर नव्हताच !
म्हाताऱ्यानच त्याला शोधून आणला.
तो होताही तसा उत्साही, त्यानं धडाधड सागून टाकलंन.
म्हणाला, तिचं नाव हेलन लास्टन. ती नाटकात काम करते.
परवाच्याच एका नव्या नाटकात ती होती.
मग आपल्याजवळ जपून ठेवलेल्या मासिकातनं त्यानं
तिचा फोटो पण शोधून काढला. ती खरंच देखणी होती.

एक अनामिक दुवा अचानक हातात आला.
मी सरळ पॅरिसला. ती. जाते तोच क्लब गाठला.
तिच्या एका दोस्तालाही धरला. म्हणाला, 'ती येईलच आता.'
आणि तेवढ्यात ती आलीही. तो म्हणाला,
'हेलन, तुझ्यासाठी एक नवीन मित्र आलाय ! '

हेलन झकास पोरगी होती हुशार. बोलण्यात पण चतुर. इतकं की बोलायलाही मजा यायची. आपल्याला तरी ती आवडली; पण मी तिला माझं टोपणनावच सागितलं. माझा प्रवास अजून दूरचा होता. माझ्या शत्रूचा रस्ता आता मला सापडणार होता आणि ती वाटेतच आडवी आली तर तिलाही मला –

हेलनला काही उमगत नसत तशी ती चागलीच धूर्त असावी. हॉटेल, सिनेमा, नाच, नाटक अखंड चालू होतं; पण तिला हे समजत नव्हत की हे सार कशासाठी ? का म्हणून ? माझ्या ह्या नव्या दोस्तीच इंगीतच त्या घर्देवाईक स्त्रीला सापडत नव्हतं. मी येवढच म्हणत होतो, 'तू एक छान मुलगी आहेस !' माझं नाटक रंगत होतं.

त्या दिवशी ती पहिल्यादाच माझ्या रूमवर आली.

मी नेहमीच्या नाटकाची तयारी करून बसलेला.

तिनं पुन्हा एकदा खोदून–खोदून विचारलंन. मग म्हणाली,

'तू व्यवसाय तरी काय करतोस ?'

'मी एका सगीतकारासाठी काम करतो.,

'मग तुझ्या नोटस् कुठायत ?' मी बहाणा केला

'माझ्या पी. ए. कडे राहल्यात.' तरी थोडा फार गडबडलोच.

ती म्हणाली, 'आपण एकमेकाना का फसवायचं ? तू असा माझ्यामागे का लागलायस ?'

मी गभीर झालो. म्हणालो, 'माझ तुझ्यावर प्रेम बसलंय !'

त्यातल खोटेपण तिलाही कळलं.

ती खोलीत गेली.

माझ्या लाडक्या मुलाचं, खेळण्यातलं अस्वल घेऊन आली. मायकेलचं आवडत खेळणं. मी खवळलो, धावलो म्हणालो,

'ठेव ठेवून दे आधी ते अस्वल ! ते माझं सर्वस्व आहे !'

ती उसळून म्हणाली, 'म्हणजे तू मला हलकी स्त्री समजतोस, की तुझी आवडती वस्तू माझ्या हातांनी विटाळली जाईल !'

आता मी आणखीनच चिडलो. ते अस्वल हिसकावल आणि तिच्या खाडकन थोबाडीत हाणली.

आमची झटापट झाली आणि मग मी तिचा गळाच धरला; पण आता मला तिचा मुळीच जीव घ्यायचा नव्हता !

माझा शत्रू अजून दूरच होता.

म्हणजे हे काही तरी भलतच झालं. मीच म्हणालो,

'मला क्षमा कर !'

तीही झटकन 'सॉरी' म्हणून मोकळी झाली.

मग आमचा उरलासुरला राग एकमेकांच्या मिठीत विरघळून गेला.

ह्या स्त्रीला मला जिंकायला हवंय,
तरच मी यश गाठणार आहे.
मी तिचं मन दुखवायला नकोय.
खरंच मी मूर्खासारखाच वागलो.
मला फारच खेद वाटला.
मला माझीच कीव आली.
ती ब्रिटनीची राहणारी.
तिला आणखी एक बहीण पण आहे.
आणि मित्रबित्र ?

ते पण आहेत थोडेफार.
पण, तिचा मेव्हणा फार श्रीमत आहे
त्याचं ब्रिटनीला मल मोठ गॅरेज आहे.
सापडल, मला हव तेच सापडलं. मी टोकरत गेलो.
तो कसा काय माणूस आहे ? तिला आवडतो ?
पण ती पॉलबद्दल बोलायला नाखूषच होती.
मी विचारीतच गेलो. ती खवळत गेली. म्हणाली,
' तुला त्याच्याशी काय घेणं आहे ?
तुला माझ्याकडून हवंय तरी काय ?'
मी तोंड आवरल.

पॉल. माझ्या शत्रूचं नाव तरी मी मिळवलं होत.
हा दुवा महत्त्वाचा होता.
माझी उद्दिष्टाकडे वाटचाल सुरू होती.

मला भटकायला आवडतं. तिलाही.
मग आम्ही किती तरी दिवस भटकत होतो.
एकदा मीच विषय काढला.
' एकदा तुझ्या घरच्याशी ओळख तरी करून दे ना !'
आम्ही तिच्या घरीच जाऊन पोहोचलो.
घरात कसली तरी पार्टी चाललेली.
पॉल अजून आला नव्हता
मी हेलनच्या बहिणीशी ओळख करून घेतली.
आणि तिच्या मुलाशी—म्हणजे फिलिपशी पण.
मी एक परीकथालेखक असल्याचा दावा केला.
पॉल पिसाटासारखाच आला.
जेवणाच्या वेळी तर त्यान धुडगूस घातला.
आपल्या बायकोच्याच कवितांची त्यान यथेच्छ टवाळी केली आणि असल घाणेरडं जेवण केल्याबद्दल तिची खरडही काढली.
सगळेच शरमेन शात झाले होते,
पण इतका वेळ अस्वस्थ होऊन बसलेला फिलिप उठला.
तो बापाला ताडकन काही तरी म्हणाला
पॉलन रागान जेवणाच्या थाळ्याच त्याला फेकून मारल्या आणि फिलिपला म्हणाला, ' मी तुझा जीवच घेईन ! तू इथून चालता हो !'
फिलिप पाय आपटीत निघून गेला.
हा माणूस खरच पशू होता. क्रूर होता माझ्या मुलाचा खून करणारा पॉल, थोडक्यात जगायला नालायक होता. तो बायकोला छळत होता. पोराना पिळत होता !

मी पॉलच्या गॅरेजमध्ये गेलो. सहजच. जमल तर ती मस्ताना गाडी पण पाहायची होती. तेवढ्यात फिलिप तिथे आला. त्याला प्रगतिपुस्तकावर सही हवी होती
पॉलन विचारल, ' इतिहासाचं काय झाल ?'
फिलिप म्हणाला, ' पेपर जरा जड गेला !'
पॉल सतापला त्यान फिलिपला थोबाडल.
मी मध्ये पडलो. पॉलन विचारल,
' तू कोण ?'
मग तोही सावरला हसला. म्हणाला,
' अरे, तू तर आमच्यातलाच की ! माझ्या मेव्हणीचाच नवरा ! छान ! जवळ आलायस आमच्या !'
मी गॅरेजबाहेर येतो. फिलिप झाडाखाली बसलेला तो बापावर आग पाखडतोय.
बाप क्रूर आहे. रानटी आहे.
एक दिवस मी त्याचा जीव घेतल्याशिवाय राहणार नाही !
म्हणजे माझ्या शत्रूलाच मारायला आणखी एक शत्रू आधीच निपजलाय !
मी फिलिपला आवरतो.

आता इथ मी छान बस्तान बसवलय
पण माझा पण मी विसरलो नाहीय.
आता मला माझ्या शत्रूचा आणखी विश्वास मिळवायचाय.
आम्ही सगळेच समुद्रावर जातो, मासेमारीला.
फारच मजा आलीय. बोलता बोलता मी आणि पॉल एका कड्यावर येऊन पोहोचलोयत. खाली समुद्र.
तेवढ्यात पॉलचा पाय घसरलाय
तो खोल खाली कोसळणार आहे
छान वेळ साधलीय माझ काम आयतंच होणारेय
पण मी क्षणभर सावरतो. पुढे होतो
पॉलला खेचून वर काढतो
पॉलच्यातला अहंकार दुखावलाय.
आपल्याला दुसऱ्यान वाचवाव ?
तो अपमानित मनान परत फिरलाय.
मागे आम्ही चालतोय. मी, हेलन, तिची बहीण.
माझ्या शत्रूला मी मनान तरी लोळवलाय

गर्द रात्र आहे हेलन माझ्या कुशीत आहे
ती मगापासून मला विचारत्येय,
' तू पॉलला का वाचवलास ?'
तो मरायच्याच लायकीचा आहे.
तो मेला पाहिजे !'
माझ्याकडे उत्तर नव्हत

माझ्या शत्रूला मी मारायला पाहिजे.
आता फार थाबून चालणार नाही
मला हेही कळलय, पॉल पाण्याला फार घाबरतो.
त्याला मुळीच पोहता येत नाही.
मला फिलिपनच हे सर्व सांगितलय.
मी एक समुद्रसफर योजलीय.
मी आणि पॉल दोघच जाणार आहोत.
आम्ही खोल समुद्रात पोहोचल्यावर वादळ चालून येणार आहे.
आणि ओहोटीही आम्हाला दूर खेचणारेय.
आणि तेव्हाच मी माझ्या शत्रूला पाणी पाजणार आहे !

मी वेळ अचूक शोधून काढलोय.
पॉल नकार द्यायला पाहतोय;
पण त्याच्यातला पुरुष डिवचल्यावर मगच तो बाहेर पडलाय.
मी त्याला चांगल्या हवेचे हवालेही देतोय.
आम्ही खोल समुद्राकडे.
म्हणजे दूरच्या एका केपकडे चाललोयत.
समुद्र खोलावतोय.
वारा फिरतोय. शीड डळमळतय.
माझ्या अपेक्षेप्रमाणेच वादळ चालून येतय.
आमच्या होडीचं शीड कडाडून मोडतय.
पॉल म्हणतोय, परत फीर, परत फीर !'
मी त्याचं थोडच ऐकतोय ? मी समुद्राकडेच चाललोय.
तेवढ्यात काही तरी होत.
पॉल अचानक पिस्तूल रोखतोय. म्हणतोय,
'मुकाट्यान परत चल !'
तुझा सगळा बेत मला ठाऊक झालाय.
माझ्या खऱ्या नावाची तो ओळख पटवतोय.
माझी डायरी वळकावल्याचही सांगतोय.
त्याला मारल तर मी अचूक तुरुगात जाणार आहे. पॉल जिंकलाय !
माझी डायरी त्यानं वकिलाच्या ताब्यात दिली आहे.
माझा बेत फसलाय.
माझा डाव माझ्यावरच उलटलाय.
माझा शत्रू वाचलाय !

आता ब्रिटनीला राहण्यातही अर्थ नाही.
मी पॅरिसला परत निघतो. बरोबर हेलन पण.
मी हताश, अगतिक.
वाटेतल्या हॉटेलात आम्ही जेवणासाठी थाबलोयत
मी हेलनला सार काही सागून टाकतोय.
पॉलच्या खुनासाठी मी तिच्याशी मैत्री केल्याचंही तिला स्पष्ट करतोय
हेलन टेबलावरच ढसढसून रडतेय.
तेवढ्यात टेलिव्हिजन सागतोय.
'प्रसिद्ध गॅरेज-मालक पॉल आज बाथरूममध्ये मृतावस्थेत सापडले. त्याच्या पोटात विष सापडल. त्यांचा मेव्हणा प्रख्यात लेखक चार्ल्स आणि विख्यात नटी हेलन लास्टन आता पॅरिसच्या वाटेवर आहेत. त्यानी त्वरित ब्रिटनीला परत याव !'
मी क्षणभर हादरतो. हेलनला घेऊन परत फिरतो.
मी पोलिसस्टेशनवर.
पोलिसप्रमुखाशी माझा वादविवाद. त्यानाही पटतंय.
मी असा खून करणं शक्य नाही.
पण डायरीतले माझेच शब्द आडवे येतात.
मला अटक होते.

तेवढ्यात फिलिप धावत येतो. त्याच्या हातात ती विषाची बाटली तो जबाब देतो.
त्यानच बापाचा खून केला. चार्ल्स निर्दोष आहे.
मीच पॉलला मारलं. तो नीच होता, पशू होता

मी सुटतो हॉटेलवर येतो हेलन वाट पाहतच असते.
माझ डोक चागलच ठणकतंय. मी तिला सागतोय,
'आज काही विचारू नकोस !
उद्या सर्व काही सागेन !
आता मला स्वस्थ झोपू देत !'
लख्ख सकाळ. मी गुपचूप बाहेर पडलोय. हेलन अजून गाढ झोपलीय. मी तिच्या उशीखाली तिला एक पत्र ठेवलय
हेलन, मी चाललोय.
फिलिपने काल कबुलीजबाब दिला.
म्हणून मी सुटलो.
पोलिसानी त्याला पकडल आहे
फिलिपचा माझ्यावर फार लोभ होता
त्याच्या बापान न दिलेलं प्रेम मी त्याला देत होतो,
पण त्या प्रेमाला मी जागलो नाही.
एखाद्या बापासारखा, त्या पोराचा अपराध आपल्या शिरावर घेतला नाही !
मी भ्याड ठरलो !
मी तर पशूसारखाच वागलो.
हेलन, तू पोलिसाना कळव की,
मीच खरा खुनी आहे आणि
मी फरारी झालो आहे !
मी आता कुठच असणार नाही,
मी तुला भेटणार नाही !
आता खोल समुद्रात मी होडी वल्हवीत जात आहे आणि माझं अस्तित्व त्याच समुद्रात विलीन करून टाकीत आहे !
हे सार जर घडल नसत ना तर,
तरच मी तुझ्यावर आयुष्यभर प्रेम करीत राहिलो असतो !

माझ्या मुलाला पॉलन चिरडून मारल.
त्याच पॉलचा त्याच्याच पोरान,
बळी घेतला आहे !
काळ अघटित आहे
पॉल नरपशू होता
आणि मीही नरपशूच आहे.
नरपशू मरायलाच हवा !
आणि माणूसही
जर तो नरपशूसारखा वागेल !!

□

[ चित्रपट *The beast must die / claude chabrol / France / 1976* ]

हिंदी चित्रपट । शिरीष सहस्रबुद्धे

## बंगाली वळणाचे भावचित्र

# स्वामी

स्वामी हे बासू चतर्जींचे ताजे चित्र. बासू चतर्जी या नावाबरोबरच रजनीगंधा–छोटी सी बात–चितचोर ही नाव आठवणं अपरिहार्य आहे स्वामी ही बासूची नवीन निर्मिती रजनीगंधाच्या तोडीची निश्चितपणे नाही, हे सुरुवातीसच सांगून टाकलेलं बरं. बासूदा हिंदी चित्रसृष्टीतल्या रूढ अर्थानं धंदेवाईक असणाऱ्या चित्रप्रकाराकडे झपाट्यानं वळू लागल्याच्या स्पष्ट खुणा स्वामीमध्ये दिसतात. स्वामीमधला ठिगळासारखा चिकटवलेला व बटबटीत, ढोबळ, भडक वाटणारा विनोद आणि धर्मेन्द्र–हेमाचं नृत्यगीत या अशा व्यावसायिक वाटचालीच्या दोन ठळक खुणा. यातला धर्मेन्द्र–हेमाचा समावेश समजू शकतो. कारण हेमाची अम्मा जया चक्रवर्ती ही स्वामीची निर्माती, तेव्हा आपल्याच अंगणात उगवलेल्या सिताऱ्याची लोकप्रियता व सध्याची वैयक्तिक जवळीक 'कॅश' केल्याशिवाय ती का सोडील? पण प्रीति गांगुली या लठ्ठंभारती बाईचा विनोदी पात्र म्हणून सढळ हातानं वापर करण्यात नवीन असं काय घडविल्याचा आनंद बासू चतर्जींना मिळाला असेल? हा विनोद आवश्यकच होता काय? व्यावसायिक यशाची बीजे छोटी सी बात व चितचोरमध्येही दिसली होतीच. तथापि स्वामीमध्ये ती अधिक ठळक व ठोकळेबाज झाली आहेत याचा खेद वाटला.

प्रेमत्रिकोण हा बासूदाचा लाडका विषय दिसतो. त्यांच्या मागे उल्लेखिलेल्या तीनही चित्रपटाप्रमाणेच, या चौथ्या चित्रातही हाच विषय त्यांनी हाताळला आहे. बासूदाच वैशिष्ट्य हेच की या प्रत्येक सिनेमातल्या प्रेमत्रिकोणाकडे एखाद्या तरी नव्या, वेगळ्या दृष्टिकोनातून त्यांनी पाहिल आहे, व त्यानुसार चित्रित केल आहे उदाहरणार्थ आधीच्या तीनही चित्रपटातील प्रेमत्रिकोण हे विवाहपूर्व अवस्थेत उद्भवलेले होते आणि नायकनायिकांच्या विवाहात व उपनायक बाजूला पडण्यात त्यांची परिणती झाली होती. स्वामीमधला प्रेमत्रिकोण हा विवाहोत्तर आयुष्यात उत्पन्न झाला आहे. नरेन (विक्रम) विषयी आकर्षण असतानाही सौदामिनीला (शबाना आजमी) घनश्यामची (गिरीश कर्नाड) पत्नी म्हणून यावे लागते. दुखावलेली, नाराज सौदामिनी पतीपासून शरीराने व मनानेही दूरच राहते व अधिकाधिक दुरावतही जाते. तशातच एक दिवस नरेन पाहुणा म्हणून तिच्या दारात दत्त म्हणून उभा राहतो आणि भावनिक संघर्षाला धार चढते. भावनावेगानं घर सोडून नरेनबरोबर निघालेल्या सौदामिनीला पुन्हा एकदा घनःश्यामचा स्वर्गीय समजूतदारपणा वाचवितो. मग विवाहित हिंदू स्त्रीने आपला स्वामी हेच सर्वस्व मानलं पाहिजे याचा साक्षात्कार वगैरे. सांगायचा मुद्दा एवढाच की प्रेमत्रिकोण व त्यातून उद्भवणारा संघर्ष या गोष्टी स्वामीमध्ये सौदामिनी–घन.श्यामच्या लग्नानंतर धारदार बनतात. या संघर्षातली नरेन–सौदामिनी संबंधाची मांडणी व हाताळणी ही काहीशी पारंपरिक व रोमॅंटिक शैलीची असून 'रजनीगंधा'-मधील उपनायक–नायिका (दिनेश ठाकूर–विद्या सिन्हा) यांच्या दरम्यान नवथर वयात जुळलेल्या धाग्यांच्या जवळपास जाणारी आहे, तर घन.श्याम–सौदामिनी संबंधाची (खरं म्हणजे तणावाची) हाताळणी ही 'उपहार' व 'बालिका वधू' या चित्रपटातल्या नायक-नायिकांच्या कोवळ्या नात्याची, अबोध मुग्धतेची आठवण करून देणारी आहे.

बासूदाना ज्या गोष्टीच श्रेय सर्वात प्रथम व अधिक द्यायला हवं ती म्हणजे त्यांनी चित्रपटात केलेली वातावरणनिर्मिती. 'स्वामी' चित्रपट कै. शरद्चंद्र चतर्जींच्या कादंबरीवर आधारित असल्याने त्याला समृद्ध (आर्थिक दृष्ट्या नव्हे, तपशिलाचे बारकावे–subtler details अशा अर्थाने समृद्ध) बंगाली पार्श्वभूमी लाभणे आवश्यक व अटळ होते. सौदामिनीच्या सासरमाहेरच्या दोन्ही घरामधल typical बंगाली वातावरण (उदा. रिवाज, पोशाख, भाषा इ. इ.) तपशिलासह उभं करून बासूदानी फार महत्त्वाची व सुखद कामगिरी बजावली आहे. अस्सल बंगाली गृहस्थ (सौदामिनीचा मामा–उत्पलदत्त) व बंगाल्यातील एकत्र कुटुंब व त्याचे सदस्य या व्यक्तिरेखाटनाचा त्या दृष्टीने विचार करता येईल. दिग्दर्शकाइतक्याच तोलामोलाने येथे कलाकारांचा उल्लेख करायला हवा–या कलाकारात अभिनेत्यांबरोबर संगीतकार राजेश रोशनचाही उल्लेख करावयास हवा. आये ना बालम व तुम बिन अब तो रहा नही जाए या त्याने दिलेल्या सुरेल चाली अगोदरच बऱ्यापैकी लोकप्रिय झाल्या आहेत. तथापि धडकनका बंधन तो धडकन से है हे गीतही ठीक वाटते.

अभिनयाच्या आघाडीवर उत्पल दत्त व गिरीश कर्नाड यानी अपेक्षेप्रमाणेच बाजी मारली आहे. या दोघांच्याही भूमिका, त्यांची अभिनयाची मूळ कुवत लक्षात घेता पुरेशा आव्हानात्मक नाहीत उत्पल दत्तची भूमिका तर हिंदी सिनेमातल्या सर्वसाधारण म्हाताऱ्यापेक्षा वेगळी नाहीच व गिरीश कर्नाडना मध्यंतरापर्यंत काहीच वाव नाही. त्यामुळे एका दृष्टीने हे समर्थ गुणी कलाकार थोडसे वाया दवडल्यासारखे वाटतात तथापि आपापल्या प्रतिभेचा ठसा त्यांनी त्या त्या भूमिकेवर जरूर उठवून ठेवला आहे. उदाहरणादाखल उत्पलदाचे गडगडून हसणे आठवावे. (जाता जाता, त्याची स्वामीमधील भूमिका खलनायकाची नाही ह्याचा उल्लेख केलाच पाहिजे !) कर्नाडाना मात्र घात सोशिकपणाची एकच एक मुद्रा दीर्घकाळ वागवावी लागली आहे. शबानाने रंगविलेली सौदामिनीची भूमिका अगर तिच्या अंकुर–निशांतची आठवण करून देणारी नसली तरी अलीकडच्या धंदेवाईक सिनेमातल्या कामापेक्षा खूपच मोहक आहे; तिनेही ती संयत अभिनयासह वठविली आहे. अर्थात ही व्यक्तिरेखा वरकरणी दिसते त्यापेक्षा बरीच खोल आहे याची जाणीव ठेवून लेखक-दिग्दर्शक–अभिनेत्रीने ती आहे यापेक्षा अधिक explore करायला हवी होती असे मला वाटते. तिच्या प्रियकराच्या (नरन) भूमिकेत विक्रम या गृहस्थाला पाहणे अगळ त्रासदायकच आहे. तोच गोष्ट सौदामिनीच्या सासूच्या भूमिकेद्वारे चित्रसृष्टीत पुनरागमन करीत असलेल्या शशिकलेची व तिच्या मुलीची भूमिका वठविणाऱ्या प्रीती गांगुलीची.

स्वामी ही अखेर शरद्चंद्राच्या बंगालमधली मध्यमवर्गात घडू शकणारी एक भावकथा आहे, ह्याची जाणीव ठेवून चित्रपट पाहणे आवश्यक आहे. शरद्चंद्राच्या साहित्यविश्वाचा आधुनिक मराठी प्रेक्षकाला कितपत परिचय असेल याबद्दल शंका असल्याने ही सूचना द्यावीशी वाटते. □

इंग्रजी चित्रपट । प्रतिनिधी

# कॅरी ऑन डॉक्टर

## तब्येतदार व्यंगपट

मुक्काम लंडन. सुप्रसिद्ध विचारवंत फ्रान्सिस बिगर याच्या व्याख्यानाचा प्रसंग. विषय अर्थातच thinking वगैरे. Think in the Bigger way अशी घोषणा आणि मोजक्या श्रोतृवर्गासमोर आपण काही तरी नवीन आणि महान तत्त्वज्ञान शिकवतो आहोत असा आव आणून गोलमटोल शब्दभेंडोळी फेकत जाणारा गलेलठ्ठ, प्रशस्त देहाचा वक्ता; पण व्याख्यान संपतय तोच बिगरमजकुराना पाठीच्या दुखण्यामुळं थेट हस्पितळातच दाखल करावं लागत. नॅशनल हेल्थ स्कीम राबविणाऱ्या या नामी रुग्णालयात आपणही बिगरबरोबर जातो आणि बाहेर पडायची इच्छाही राहू नये इतके रमून जातो. 'लंडनमधल ससून' असं ज्याचं बरोब्बर वर्णन करता येईल अशा या जनरल हॉस्पिटलमध्ये बिगरवर आणि बिगरमुळे जे अनवस्था प्रसंग ओढवतात त्याचं आणि त्याना कारणीभूत झालेल्या इरसाल मानवी नमुन्याचं व्यंगचित्रण हा कॅरी ऑन डॉक्टरचा विषय आहे. या विषयाला सोयिस्कर होईल पण मधेमधे अडथळा आणणार नाही असं एक कथानकही सिनेमात आहे; पण त्याला मर्यादित वाव व महत्त्व आहे. खरा इंटरेस्टचा विषय आहे तो जनरल हॉस्पिटलच्या बऱ्याचशा वास्तव आणि बऱ्याचशा विनोदी चित्रणाचा आणि तिथल्या व्यक्तिचित्रणाचा.

अनेक पाश्चात्य राष्ट्रांत राबविली जाणारी नॅशनल हेल्थ स्कीम ही आपल्या कामगार विमा योजनेचं थोरलं भावंड म्हणता येईल अशी आहे. नागरिकांच्या व्यक्तिगत आरोग्याचीही जबाबदारी सरकारन स्वीकारली असेल तर सार्वजनिक रुग्णालयात (डॉक्टर्स व रुग्णाईत दोघेही बिनधास्त बनल्याने) कशी अंदाधुंदी माजते त्याचं खुमासदार चित्रण कॅरी ऑन डॉक्टरमध्ये आहे. त्यातल्या रुग्णालयातली सकाळ त्याचं उदाहरण म्हणून पहावी. चहा-नाश्ता देणारे, सफाईकामगार, टेंपरेचर घ्यायला येणाऱ्या नर्सेस अशा विविध सेवकमंडळीची जी धडपडाटी पेऱ्या सकाळी सहा वाजल्यापासूनच सुरू होते, की पेशंट्सना झोपणं अशक्यच होऊन बसत. मग विश्रांती कुठली? बर, पेशंट्सही असे इरसाल की डॉक्टर्स–नर्सेसना पुरे गुंडाळून आपल्या मनाप्रमाणेच वागतात. मि. रोपर आणि मि. बीडल हे असेच दोन नमुने. आपलं अपेंडिसायटिसचं ऑपरेशन झालं असल्याची माहिती बीडल बिगरला देतो, पण मग त्याच्या पायाला प्लॅस्टर कशासाठी? बीडल शांतपणे खुलासा करतो की ऑपरेशन झाल्यानंतर मी टेबलावरून खाली पडलो, त्यामुळे पाय मोडला! रोपर याना सिगरेटचा मोह आवरत नाही तर बीडलची धाव फीमेल वॉर्डकडे त्यामुळे आसपास नर्सेस नाहीतसं पाहून रोपर पांघरुणात लपविलेली सिगरेट काढून ओढतात. एकदा असाच धूम्रपानसमारंभ चालू असतानाच मेट्रनबाई आत घुसतात आणि संशय आल्यामुळे पांघरूण वर करतात, तेव्हा धुराच्या लोटाचे चक्क ढग उठतात आणि बराच वेळ कुणाला काहीच दिसत नाही, इतका धूर आत कोंडलेला असतो! दुसऱ्या वेळेला नर्स युरीनपॉट देऊन गेल्यानंतर एकांत मिळणार हे जाणून रोपरमहाशय गादीखालून दारूची बाटली काढतात, थोडी पितात आणि थोडी युरीनपॉटमध्ये ओतून ठेवतात. नर्स येऊन ते घेऊन जाते आणि क्लिनिकल लॅबमध्ये या लघवीचं पृथक्करण, परीक्षा वगैरे सुरू होतात तेव्हा ती चक्क पेटते! रोग्याला आज अशी भयंकर अल्कोहोलिक लघवी कशामुळे झाली असावी या विचारान डॉक्टर किलमोअर चक्रावून जातात. हे डॉक्टरही नावापासूनच मोठे नामी गृहस्थ असतात. तरुण आणि स्मार्ट पण वागणं वेंधळेपणाचं. चालणंही तसंच. घाईन आणि बेफिकिरीन चालत असताना हे डॉक्टर बिगरमहाशयाच्या स्ट्रेचरवर अशा वेगान आदळतात की पेशंट खाली जमिनीवर फेकला जातो आणि डॉक्टर स्ट्रेचरवर आडवा पडतो. या किलमोअराचा मिस क्लार्क नावाच्या एका देखण्या तरुण नर्सवर जीव जडलेला असतो. तिला मागणी घालायची प्रॅक्टिस डॉक्टर आपल्या खोलीतल्या एका सांगाड्यासमोर करीत असतात आणि तेही 'प्रणयाराधन कसे करावे' असल्या एका पुस्तकाचं वाचन करूनच. डॉ. टिंकल हे वरिष्ठ डॉक्टर. यांची आणि आकारान त्यांच्या सुमारे तिप्पट असणाऱ्या मेट्रनची भानगड चालू असतेच. ती शेवटी त्यांच्या अंगाशी येते. डॉ. किलमोअरला काढून टाकल्याच्या निषेधार्थ सगळे पेशंट्स् चिडून चक्क बंड करून उठतात आणि डॉ. टिंकल व मेट्रनला (एकत्र असतानाच) पकडून आपल्या वाट्याला येणाऱ्या नाना हाल-अपेष्टांची चुणूक त्यांना दाखवितात. अखेर दोघानाही शरण यावं लागतं आणि क्लार्क–किलमोअरना हिरवा सिग्नल मिळतो.

लेखक–दिग्दर्शक प्रतिभावंत असले आणि विशेषत कॉमेडीचा आत्मा गवसलेले असले की साध्याही विषयात मोठा मजेदार आशय कसा निर्माण करता येतो याचं कॅरी ऑन डॉक्टर हे उत्तम उदाहरण आहे. अतिशय चुरचुरीत आणि खटकेबाज संवाद आणि उत्कृष्ट पात्रचित्रण– सामूहिक अभिनय ही या सिनेमाची सगळ्यात मोठी वैशिष्ट्यं म्हणावी लागतील. आपल्याकडे निखळ व श्रेष्ठ कॉमेडीज् फारशा निर्माण होत नाहीत याचं कारण संवादाकडे होणारं दुर्लक्ष हे असू शकेल. अलीकडच्या काळात तरी कॅरी ऑन डॉक्टरच्या संवादाची बरोबरी करू शकतील अशा दर्जाचे संवाद मी फक्त 'मनचली' या एकाच हिंदी सिनेमात ऐकले आहेत. मात्र डॉक्टरच्या टीमवर्कशी बरोबरी करू शकेल असा हिंदी सिनेमा दाखविणे कठीणच जाईल. फारसे प्रसिद्ध अभिनेते–अभिनेत्री नसतानाही या सिनेमात अभिनयाची बाजू चांगलीच भक्कम राहिली आहे आणि कुणी एक नटसम्राट नसला तरी डॉक्टर टिंकल, बीडल, रोपर, फ्रान्सिस बिगर, मेट्रन ही सगळीच मंडळी आपापल्या चोख भूमिकेसाठी लक्षात राहण्याजोगी आहेत. 'सिंपथेटिक प्रेग्नन्सी'चा त्रास होणारे मि. बॅरन आणि नर्स क्लार्क, शिकाऊ नर्स मे, डॉ. किलमोअर या सर्वांनीच टीमवर्कचा गोवर्धन उचलण्यात आपापला हातभार लावला आहे. कॅरी ऑन डॉक्टरची वीणच या व्यक्तिरेखा आणि त्यांचे परस्पराशी येणारे संबंध यांच्या उभ्याआडव्या ताण्याबाण्यातून घडलेली असल्यामुळे या घोळघाटाळ्याचं नियंत्रण करणारे दिग्दर्शक जिराल्ड थामस याच्या कुशल हाताळणीचीही वाखाणणी करायला हवी. कॅरी ऑन डॉक्टरला सहज लक्षात येईल असा फार्सिकल टच मिळालेला आहे. त्याचे अनेक फायदे आहेत तसेच तोटेही आहेत. उदा. अतिशयोक्तीचा फायदा घेता येणं हा काही एका मर्यादेपर्यंत फायदा आणि त्यापुढे तोटा ठरू शकतो. कॅरी ऑन डॉक्टरचा उत्तरार्ध अनेक फार्सप्रमाणेच काहीसा ताणला गेला आहे हे खरं; पण व्यक्तिशः सांगायचं तर मनसोक्त हसण्याची दुर्मिळ संधी या चित्रपटान मला दिली आहे. या भेसळीच्या जमान्यात कलाकृतीही भेसळीत मिळत असताना एवढा निर्भेळ आनंद मिळणं हेही काही थोडं नाही. □

# अवती-भवती : पृष्ठ ४ वरून

मुख्य मंत्र्याचा रोष ओढवून घेतला. त्याचे असे झाले—कोणा पत्रकाराने चंडीगढबाबत प्रश्न विचारला. चंडीगढ म्हणजे त्या वेळी कोण ज्वलंत प्रश्न ! पंजाब आणि हरियाना या दोघांनीही चंडीगढवर हक्क सांगितलेला आणि हे नवीन मुख्य मंत्री सांगत होते की, हरियानाच्या भलाईसाठी चंडीगढचा हरियानामध्ये समावेश झालाच पाहिजे असे जे आग्रही मत आहे ते आपल्याला पटलेले नाही. मुख्य मंत्र्यांची चंडीगढबाबतची ही प्रतिक्रिया ऐकून सरीनसाहेब हादरले. बातमी भरपूर गोंधळ उडविणारी असून मुख्य मंत्रीच कदाचित अडचणीमध्ये येतील असे त्यांच्यामधील पत्रकाराला जाणवले. पुढल्या वादळाचा वास आल्याने सरीन हळूच म्हणाले, ‘ सर, आपली परवानगी असेल तर मी अशी दुरुस्ती सुचवू इच्छितो की, पत्रकारमित्रांनी मुख्य मंत्र्यांचे हे विधान ‘ऑफ द रेकॉर्ड’ समजावे. कुठला कोण प्रसिद्धिअधिकारी आणि आपण केलेल्या विधानाबाबत सल्ला देतो म्हणजे काय, सरीनच्या या आगाऊपणावर नवीन मुख्य मंत्री भलतेच खवळले. सरीन यांना लगेच उत्तर मिळाले—तुम्हाला काय पाहिजे असेल ते करा. मला जे सांगायचे होते ते मी सांगितलेच आहे. पत्रकारपरिषद संपली; पण मुख्य मंत्र्यांनी या अधिकाऱ्याच्या आगाऊपणाची नोंद घेतली. त्यानंतर हरियानाला परतण्यापूर्वी त्यांनी सरीन यांना पुन्हा एकदा बोलावून घेतले आणि सांगितले—हे पहा, नंदाजी हे माझे गुरू आहेत आणि त्यांच्या आज्ञांचे पालन झालेच पाहिजे ! सरीन काहीसे गोंधळून गेले. नंदाजी गुरू आहेत—छान, पण त्यांच्या कसल्या आज्ञा ? आणि त्या कशासाठी पाळायच्या ? हरियाना सरकारमध्ये नंदाजींना कोणतेही अधिकृत स्थान नव्हते त्यांच्या शंकाकुशंकांमुळे बन्सीलालजी भलतेच चिडले—तुम्ही अकारण प्रश्न विचारता, अशा स्वरूपाच्या प्रश्नोत्तराची मला अपेक्षा नाही असे म्हणून मुख्य मंत्री गाडीत बसले. गाडीमागे उडालेली धूळ सरीन यांना पुष्कळ काही शिकवून गेली.

बन्सीलालजींनी पुढे भगवत दयाळ शर्मा यांच्याशी सूत जमविले. शर्माजींना खूष करण्यासाठी काहीही करण्याची तयारी त्यांनी ठेवली त्या वेळी रामकृष्ण गुप्ता हे प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांचे आणि शर्माजींचे अजीबात चांगले नव्हते. शर्माजींना खूष करण्यासाठी त्यांनी गुप्ताजींच्यामागे काही खटल्यांचे लचांड लावून दिले. एखाद्याला अडचणींमध्ये पकडण्यासाठी ही युक्ती त्यांनी पुढे किती तरी वेळा वापरली. गुप्ताजींच्या मागे केवळ खटल्यांचे लचांड लावून बन्सीलालजी थांबले नाहीत तर त्यांना अटक करण्यात यावी अशी व्यवस्थाही त्यांनी केली, आपल्याला अटक होणार आहे या गोष्टीचा गुप्ताजींना सुगावा लागताच त्यांनी त्या वेळी केंद्रीय गृहमंत्रिपद सांभाळणाऱ्या यशवंतराव चव्हाणांकडे धाव घेतली. चव्हाण यांनी लगोलग नंदाजींना फोन केला आणि गुप्ता यांना अटक होणार नाही असे पाहावे असे सांगितले. नंदाजींनी सरीन यांना फोन केला आणि तातडीने हालचाल करण्यास सांगितले. नंदांचा हुकूम प्रमाण मानून सरीन यांनी हालचाल केली. बन्सीलालजींच्या पुस्तकामध्ये ताज्या पानावर आता नंदा नसून शर्मा आले आहेत आणि गुप्ता यांना अटक व्हावी अशी मुख्य मंत्र्यांचीच इच्छा आहे या गोष्टीचा सरीन यांना अजीबात पत्ताच नव्हता नंदा हे माझे गुरू आहेत आणि त्यांच्या आज्ञांची अंमलबजावणी झालीच पाहिजे हे मुख्य मंत्र्यांचे शब्द सरीनबाबूंच्या डोक्यात होते त्यांनी लगबगीने महेंद्रगढच्या पोलिससुपरिटेंडेंटला फोन लावला—गुप्ताजींना तेथेच अटक करण्यात येणार होती. फोन करून सरीन यांनी सांगितले—गुप्ता यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये अटक करू नये. निदान मुख्य मंत्र्यांची भेट घेतल्याशिवाय कोणतीही हालचाल करू नये. आता गोम अशी होती की, गुप्ता यांना अटक होईपर्यंत मुख्य मंत्रीच गायब झाले होते, तर एस. पी. साहेब मुख्य मंत्र्यांशी संपर्क साधणार कसा ? परंतु ज्या अर्थी सरीन यांच्यासारखा जबाबदार अधिकारी अटक करू नका असे स्पष्ट सांगतो त्या अर्थी त्याला तसेच काही कारण असले पाहिजे असे गृहीत धरून एस पी साहेबांनी गुप्ताजींना अटक करण्याचे टाळले. खूप तपास केल्यावर सरीन यांना समजले की, मुख्य मंत्री बन्सीलालजी हरियाना सरकारच्या कॅनाल-रेस्ट हाउसमध्ये मुक्काम ठोकून आहेत त्यांनी मुख्य मंत्र्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; परंतु मुख्य मंत्री बाहेर गेल्याचे त्यांना सांगण्यात आले. सरीनसाहेबांनी कोणत्या परिस्थितीमध्ये गुप्ताजींची अटक थांबविण्यात आली याचा खुलासा करणारी चिठ्ठी लिहून ठेवली. चिठ्ठी वाचल्यावर मुख्य मंत्री विलक्षण संतापले. सरीनच्या पापांची संख्या वाढत चालली होती. आता केवळ अखेरची काडी पडण्याचे बाकी होते. तेही काम सरीनसाहेबांनी लवकरच उरकले. एके दिवशी अनपेक्षितपणे त्यांना मुख्य मंत्र्यांचा काश्मीरहून फोन आला दिल्लीच्या टाइम्सच्या तसेच स्टेटस्‌मनच्या संपादकाबरोबर माझी मुलाखत नक्की करा असा आदेश मुख्य मंत्र्यांनी दिला. सर, कोणत्या स्वरूपाचे काम आहे ? मी त्यांना यायासाठी बोलवू काय ? पलीकडच्या बाजूने चिडक्या स्वरामध्ये मुख्य मंत्री पुटपुटले—तुम्ही फारच प्रश्न विचारता बुवा ! नाही, सर तसे नाही. सरीन यांनी खुलासा केला—मला फक्त इतकीच माहिती हवी आहे की, केवळ एक संपर्क-सौजन्य म्हणून आपण त्यांना भेटू इच्छिता की, आपले काही विशिष्ट स्वरूपाचे काम आहे ? संपादकांना ही माहिती आगाऊ पुरविणे आवश्यक आहे. रागीट स्वरात आणि खास हरियानी ढंगामध्ये मुख्य मंत्री म्हणाले, ‘ शिकायत करनी है ! त्यांचे प्रतिनिधी सतत माझ्याविरुद्ध लिहीत आहेत मी त्यांना ठिकाणी आणू इच्छितो.’ मुख्य मंत्र्यांचे हे विचार ऐकून सरीन अस्वस्थ झाले. त्यांच्यामधील पत्रकार पुन्हा जागा झाला. मुख्य मंत्र्यांची योजना फारशी चांगली नाही असा त्यांचा ग्रह झाला. हे असले काही मुख्य मंत्र्यांनी केले तर पत्रकारांचे त्यांच्याबद्दल अधिकच वाईट मत होईल. त्यात पुन्हा ज्या पत्रकारांचा संबंध होता ते श्री. सरीन यांच्या चांगलेच परिचयाचे होते. सरीन यांची खात्री होती की आपला पत्रकारितेचा व्यवसाय ते चोख बजावीत आहेत. त्यातूनही

वाट काढता येईल; परंतु अधिक हुशारीने हे प्रकरण हाताळणे जरूर आहे. सरीन यांनी एवढा विचार करून उत्तर दिले–' सर, कृपा करून मला या प्रकरणात ओढू नका! ' ' काय योग्य वाटेल ते करा ! ' असे ओरडून मुख्य मंत्र्यांनी फोन खाली ठेवला.

पुढे हरियाना राज्याच्या स्थापनेच्या निमित्ताने जशन–ए–हरियाना नावाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे वेळी मुख्य मंत्र्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून त्या वेळचे कॉंग्रेस अध्यक्ष निजलिंगप्पा यांना बोलाविले होते. निजलिंगप्पा यांनी अशी घोषणा केली की, ते अध्यक्ष असेपर्यंत बन्सीलाल यांच्या सरकारला पक्षाचा पूर्ण पाठिंबा राहील. या कार्यक्रमाला सरीन यांनी निवडक पत्रकार नेले होते आणि तरीही या कार्यक्रमाबाबत पुष्कळच वेड्यावाकड्या प्रतिक्रिया उमटल्या. निजलिंगप्पा यांनी केलेली घोषणा दिल्लीमधील वृत्तपत्रामध्ये पहिल्या पानावर प्रसिद्ध व्हावी असे मुख्य मंत्र्यांचे मत होते. ते तर होऊ शकले नाहीच वर नको ते वृत्त प्रसिद्ध झाले, मुख्य मंत्री विलक्षण संतापले– या सगळ्या प्रकारामागे सरीनचा हात आहे अशी त्यांची खात्री झाली. त्यांच्या हिशेबी सरीनच्या पापाचा घडा पूर्ण भरला होता. आता या माणसाला बन्सी–पद्धतीचा हिसका दाखवणे आवश्यकच होते. त्यांनी भल्या पहाटे सरीनच्या घरी फोन लावला. इतक्या सकाळी कोणाचा फोन असे पुटपुटत सरीन यांनी फोन उचलला– पलीकडच्या बाजूने कडकडाट झाला– पूर्ण बातमीलाच तू सुरुंग लावलास. चटकन संदर्भ लक्षात न आल्याने सरीन यांनी विचारले, ' कोण बोलताय तरी कोण ? '

मुख्य मंत्री : ' कोण ' कोण काय विचारतोस ? मी बन्सीलाल बोलतोय.

बन्सीलालचे नाव ऐकताच स्वारी भानावर आली. पहिला उपचार म्हणून सरीन म्हणाले– ' गुड मॉर्निंग सर ! '

मुख्य मंत्री : गुड मॉर्निंग का बच्चा, इतनी सारी खबर गोल कर दी तुमने.

सरीन : सर, माझं जरा ऐकून तर घ्या.

मुख्य मंत्री : मला खुलासे ऐकायची अजिबात सवय नाही.

सरीन . सर, वस्तुस्थिती अशी आहे की...

मुख्य मंत्री : वस्तुस्थिती ? कसली कपाळाची वस्तुस्थिती ? मला खरी वस्तुस्थिती चांगली माहीत आहे. हरियानाची दिल्लीमधील संपर्ककचेरी ही माझ्या विरुद्धच्या कटकारस्थानाचे केंद्र बनली आहे आणि या सगळ्या गोष्टीचा सूत्रधार तू आहेस !

सरीन : सर, कृपा करून माझे म्हणणे तर ऐकून घ्या, मी प्रत्येक गोष्टीचा खुलासा करतो. मी तुमचे पूर्ण समाधान करतो.

मुख्य मंत्री : माझे समाधान करणारा तू कोण मोठा दीडशहाणा लागून गेला आहेस.

सरीन : सर, जरा ऐकून तर घ्या...

मुख्य मंत्री : तुझ्या इंग्रजीची घमेंड माझ्यासमोर मिरवतोस काय ?

सरीन : (काहीसा गोंधळून) सर, मी हिन्दीमध्ये बोलू का इंग्रजीत बोलू ? मी आपल्याला इतकेच सांगू इच्छितो की...

मुख्य मंत्री : मला सांगू इच्छितो,– मला काही सांगणारे तुम्ही कोण ? (मुख्य मंत्र्याची गर्जना ऐकून सरीन चांगलेच हादरले– मुख्य मंत्र्यांना इतके चिडलेले त्यांनी प्रथमच पाहिले होते. प्रकरण सावरून घ्यावे असे त्यांनी ठरविले.)

सरीन · सर, आपण तर मालकच आहात...

मुख्य मंत्री : तो तर मी आहेच, आणि मी मालक असण्याशी तुझा काहीच संबंध नाही.

सरीन सर, आपण जी आज्ञा कराल ती...

मुख्य मंत्री आज्ञा ? मी तुला बडतर्फ करण्याची आज्ञा फर्मावीत आहे.

सरीन तसं असेल तर मी काय बोलणार सर ?

मुख्य मंत्री : तू गुस्ताखीचे बोलता है भडवे...

सरीन : (आता मात्र हे फारच झाले होते तरी स्वत ला सावरून सरीन म्हणाले,)सर, आपण मुख्य मंत्री आहात आणि एक अधिकारी म्हणून आपल्याबद्दल योग्य तो आदर दाखवणे हे माझे कर्तव्य आहे; पण सर, अशा प्रकारची भाषा ऐकण्याची मला अजिबात सवय नाही हे सारे ऐकून घेणे केवळ अशक्य होत आहे.

मुख्य मंत्री : अस्स्, मी तुला भडवा म्हणणारच, तू आहेसच भडवा !

सरीन : (आता मात्र सहन करण्याची मर्यादा संपली होती) आवाज चढवून ते म्हणाले– सद्गृहस्था, तू आहेस तरी कोण ? राज्याचा जबाबदार मुख्य मंत्री की रस्त्यावरचा चिडका कुत्रा ..

हे ऐकल्यावर मुख्यमंत्र्यांनी फोन खाडकन खाली ठेवला. दुसऱ्या दिवशी खास माणूस पाठवून सरीन यांना कामावरून काढून टाकण्यात आल्याचा हुकूम बजावण्यात आला. सरीन या निर्णयाविरुद्ध न्यायालयात गेले. न्यायालयाने आपल्या निकालपत्रामध्ये सरीन जास्त विश्वासार्ह असल्याचे नमूद करून बन्सीलाल हा न्यायालयामध्ये शपथ घेऊनही बेधडक खोटे बोलणारा माणूस असल्याचा शेरा मारला आहे. □


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**२०।८।७७ ते २६।८।७७**

## काँग्रेसच्या फाटाफुटीला जोराची चालना

काँग्रेसच्या मूळ कुंडलीत कन्याराशीचा चंद्र आहे. सध्या राहू कन्याराशीत आहे. तो अनपेक्षित असे काही घडवू शकेल. इंदिरा गांधी राजकारणात पुन्हा येत असल्या तरी त्यांचे पुनरागमन काँग्रेसला व खुद्द इंदिराजींनादेखील उपकारक नाही. श्री यशवंतराव चव्हाण प्रयत्नांची शिकस्त करून काँग्रेसला तारण्याच्या प्रयत्न करणार असले तरी यश कमीच आहे. इंदिराजी व ते स्वतः यांच्यातील दरी अधिकाधिक रुंदावत जाणे आता अपरिहार्य आहे. कारण आता काँग्रेसला शनीची प्रतिकूलता अधिक निर्माण होणार आहे व इंदिराजींना तर तो खूपच प्रतिकूल आहे. त्यांची मानसिक अवस्थाही फारशी, खंबीर वा आनंददायी राहील असे नाही. यशवतराव जनतापक्षात जाणार नसले तरी त्या पक्षाबरोबर त्यांची जवळीक निर्माण होणार आहे यात मुळीच शंका नाही. कदाचित वरून ते तसे दाखविणार नाहीत; पण मन काही वेगळाच व्यापार करणार आहे. त्याचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष पडसाद महाराष्ट्राच्या राजकारणात उठणार आहेत.

### मेष : समृद्धीकडे वाटचाल

राशिस्वामी मंगळाचे आजच मिथुनराशीत पदार्पण होत आहे तर शुक्र दि. २३ ला कर्कराशीत जात आहे. या ग्रहांची ही वाटचाल म्हणजे तुमची समृद्धीकडे वाटचाल होय. इंजिनियरिंग, खते, स्टेशनरी, कापड इत्यादि व्यवसायांत चांगलीच प्रगती होणार आहे. धंद्यात समृद्धिकारक घटना घडणार आहेत. आजवर प्रत्यक्षात न आलेली अशी एखादी योजना या वेळी प्रत्यक्षात येईल. नोकरीत बदली–बढतीची शक्यता आहे. शुभ २१–२४.

**महिलांना :** मनातील काळजी दूर होईल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात प्रगती होईल.

### वृषभ : धंद्यात यश

राशिस्वामी शुक्र दि. २३ पासून तिसरा होत आहे त्याचा भरपूर लाभ करून घ्या. धंद्याची क्षेत्रे वाढविण्यास काळ अनुकूल आहे. विस्तार होऊ शकेल. मंगळाचे छत्र थोडे कमी होत आहे. त्यामुळे कोणत्याही कामात यश निश्चित येईल. मित्राच्यामार्फत एखादी योजना प्रत्यक्षात आणू शकाल. पैशांची काळजी दूर होईल; मात्र अनपेक्षित खर्च होणार आहे. नोकरदारांना कामाचे श्रेय व योग्य मोबदला मिळेल. शुभ २३–२४.

**महिलांना :** संसारात मन अधिक रमेल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात आघाडी राहील.

### मिथुन : यश निश्चित

दि. २१ चे मंगळाचे तुमच्या राशीत पदार्पण म्हणजे तुमच्या यशाची नांदीच होय. आता साडेसातीचे शेवटचे खरकटे शिल्लक राहिले आहे ते पुढील महिन्यात दूर होईल. तोपर्यंत नव्या योजना प्रत्यक्षात उतरल्या नाहीत तरी पाऊल मागे येणार नाही. नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाच्या घडामोडी होतील. अचानक एखादा फायदा होण्याची शक्यता आहे. बेकारांना आता निश्चित स्वरूपाचे आश्वासन मिळेल. धंद्यात तुमच्या बुद्धीचे मोठे यश प्रतिबिंबित होणार आहे. शुभ २५–२६.

**महिलांना :** संसारात प्रसन्नता राहील.

**विद्यार्थ्यांना :** हुशारीचे फळ पदरात पडेल.

### कर्क : वेग मंदावेल

उद्यापासून मंगळ बारावा होत आहे. गुरु व मंगळ हे दोन्ही ग्रह बारावे आहेत. त्याकडे अगदीच दुर्लक्ष करू नका. अचानक स्वरूपाच्या अडचणी निर्माण होऊ पाहतील. खर्चावरची पकड ढिली होईल. नोकरीत डोक्यास त्रास होणारच नाही असे समजू नका सहकारी उगाच सतावतील. देणेकरी त्रास देतील, तरी पण राशीतील शुक्र शनी तुमचे पाऊल मागे पडू देणार नाहीत. आयत्या वेळी अडचणीवर मात करू शकाल. शुभ २३, २५.

**महिलांना :** स्तुतीवर भाळून जाऊ नका.

**विद्यार्थ्यांना :** नैराश्याची स्थिती संपेल.

### सिंह : संमिश्र फळे

तुमचा संघर्षाचा काळ अजून जरी पूर्ण संपला नसला तरी प्रगतीची पाउले रेंगाळणार नाहीत याची खात्री बाळगा. या वेळी कोणतेही काम दोन पावले पुढे– एक पाऊल मागे असे होणार आहे. राजकारणात तुमची थोडी सरशी तर थोडी माघार असे घडणार आहे. धंद्यात काही वेळा अनुकूल तर काही अंदाज चुकतील. नोकरीत चुका होतील; पण त्याचे परिणाम प्रतिकूल होणार नाहीत. बेकारांना सध्या तात्पुरती नोकरी मिळेल. तुम्हाला पैशाची टंचाई भासणार नाही; पण


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**। मॅक्झिम गॉर्की ।**

**। सुमती देवस्थळे ।**

मूल्य बहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३०

खर्च नियंत्रणाखाली ठेवणे आवश्यक आहे. शुभ २१, २३.

**महिलांना** नोकरीत साधारण अनुकूलता राहील.

**विद्यार्थ्यांना** : व्यसनापासून दूर राहावे.

### कन्या : दैवाची अनुकूलता

बाराव्या रवीची प्रतिकूलता सोडली तर सध्या तुम्ही बरेच आघाडीवर आहात असे म्हणायला हरकत नाही प्रामुख्याने पैसा व प्रतिष्ठा या दोन्ही बाबतीत तुम्ही बरेच आघाडीवर राहणार आहात अचानक तुमची लोकप्रियता वाढणार आहे तुम्ही लेखक असाल तर तुमच्या साहित्याला मागणी येईल. हातून चांगले लिखाण होईल. रेंगाळलेले काम गती घेईल. नोकरीत पाऊल पुढे पडेल. वरिष्ठांची मर्जी राहील. मागण्या पुढे मांडा. थोडेबहुत पदरात पडेल. आरोग्याची मात्र काळजी घ्या. शुभ २०, २५.

**महिलांना** : सार्‍या अडचणी दूर होतील.

**विद्यार्थ्यांना** : बुद्धीची चमक दिसेल.

### तूळ : भरपूर अनुकूलता

दैवाची एकदा कृपा मिळाली की माणसाचे मन वेगाने नव्या नव्या कल्पनांच्या मागे धावू लागते त्याला कुणीही अडवू शकत नाही. तुम्ही सध्या याच वातावरणातून जात आहात, त्यामुळे बारावा राहू तुमचे काही वाईट करू शकणार नाही या वेळी जो निर्णय घ्याल तो आगामी यशाची नांदी ठरणार आहे. नोकरी, धंदा, व्यापार, प्रवास, परदेशगमन, कल्पनाविलास या सर्वच बाबतीत तुमची घोडदौड लाभकारक ठरणार आहे. यश निश्चित मिळणार आहे. शुभ २४, २५.

**महिलांना** : नोकरीत मोठेपणा मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांना** : पैसा जपून खर्च करा

### वृश्चिक : धंद्यात बरकत

अंतरिक्षातील अनेक सामर्थ्यवान ग्रह सध्या तुम्हाला अनुकूल आहेत. याचा फायदा घेऊन इच्छित अशा कोणत्याही धंद्यात श्रम व पैसा खर्च करा. त्या धंद्यात यश येणार आहे. चालू धंदा सुधारेल. अडचणी व मंदी अशा दोन्ही प्रकारची परिस्थिती दूर होईल भांडवलगुंतवणूक होईल. नोकरीच्या दृष्टीने फायदेशीर अशा घटना घडणार आहेत. आजवर मागे पडत चाललेली एखादी मागणी एकदम मान्य होणार आहे. बढती–बदलीचे जमून जाईल. अर्थपरिस्थिती समाधानकारक राहील. शुभ २२–२४.

**महिलांना** : खूप दिवसांचे मनोरथ पूर्ण होतील.

**विद्यार्थ्यांना** अभ्यासाची गती वाढेल.

### धनू : भाग्य उजळेल

भाग्यस्थानी रवी, दशमस्थानी स्वगृही राहू आणि चंद्रासमोर गुरु–मंगळ हे सारे ग्रह तुमची सारी स्वप्ने साकार करणार आहेत तुमच्या अडचणी दूर करून प्रगतीच्या मार्गावर तुमची वाटचाल चालू ठेवणे हे या ग्रहांनी ठरविले आहे त्यामुळे तुम्ही आता उगाच मनात शंकाकुशंका काढीत बसू नका. झपाट्याने आलेल्या संधीचा फायदा घ्या. या वेळी तुमची कार्यक्षमता खूपच वाढणार आहे अनपेक्षित असे काही तरी नोकरीत घडू शकेल घडेल ते हितकारक असेल. आध्यात्मिक क्षेत्रात यश व आनंद मिळेल. साधुसंतांचे दर्शन होईल. शुभ २२–२५.

**महिलांना** . संसारातील अडचणीवर मात कराल

**विद्यार्थ्यांना** : मनाची चंचलता कमी होईल

### मकर : मोठ्या अपेक्षा नकोत

रवी आठवा तर मंगळ उद्यापासून दहावा होत आहे शनीचे सामर्थ्यही कमी होत आहे. यासाठी फार मोठ्या अपेक्षा बाळगण्यात काही फारसा अर्थ नाही मंगळामुळे विरोधकाशी दोन हात करण्यासारखी मनाची तयारी होईल; पण विरोधक निर्माण होणार आहेतच याची जाणीव ठेवून कोणतेही पाऊल उचलणे उचित ठरेल. मोठेपणा मिळेल नोकरीत फारशी उलाढाल नाही. आहे त्या परिस्थितीशी जुळवून घ्यावयास हवे. बाकी लोभही नको व बदलीही नको पैशासाठी फारसा त्रास पडणार नाही गरजा भागतील. बेकारांना शुभवार्ता शुभ२३–२४.

**महिलांना** : तब्येतीचा त्रास कमी होईल.

**विद्यार्थ्यांना** : प्रयत्नाला अनुकूल फळे येतील.

### कुंभ : पाऊल पुढे पडेल

भाग्यचक्र सतत परागतीकडे कधीच वळत नाही प्रगतीकडेदेखील त्याची गती सुरू होते आता तुमची प्रगतीची गती सुरू झाली तर तुम्ही आश्चर्य मानू नये मंगळाचे वरदान या वेळी तुम्हाला लाभले असून रवी बराच अनुकूल साथ द्यायला तयार झाला आहे. त्यामुळे या वेळी जे जे कराल ते ते उपकारक व यशस्वी ठरणार आहे धंद्यातील त्रास व अडचणी दूर होणार आहेत. नोकरीत अपेक्षासाफल्याचे नवे युग निर्माण होणार आहे. वरिष्ठाबरोबर चांगले संबंध जुळून येतील. प्रवासाचा बेत सफल होईल. सार्वजनिक कार्यात मानसन्मान मिळेल. शुभ २४–२५.

**महिलांना** : संसारी जीवनात आनंदयुग निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना** : नवनवीन विषयांत लक्ष केंद्रित होईल.

### मीन : नवी दिशा

राशिस्वामी गुरु चौथा आहे व त्याला आता मंगळ येऊन मिळाला आहे. त्यामुळे मन थोडेफार असमाधानी व उद्विग्न राहण्याची शक्यता आहे मात्र कोंडीत सापडलेल्या उद्योगाला व काही बाबतीत नोकरी-व्यवसायाला थोडी नवी दिशा मिळू शकेल. जर तुमच्या काही योजना असतील तर त्याला गती देण्याच्या दृष्टीने पाऊल टाकायला हरकत नाही एखादा नवा धंदा सुरू करायला परिस्थिती अनुकूल होत आहे. नोकरीत काही स्वतंत्र विचार वरिष्ठाकडे मांडल्यास त्याचा उपयोग होऊ शकेल. व्यावसायिक स्वरूपाचा प्रवास अचानक ठरू शकेल. शुभ २४–२६.

**महिलांना** : मनाची अस्वस्थता कमी-जास्त होईल.

**विद्यार्थ्यांना** : कलास्पर्धेत भाग घ्यावा.

□